

नानी पालखीवाला :
संविधानाची पालखी वाहणारा
निष्ठावान भोई
लक्ष्मीकांत देशमुख


संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
९ जानेवारी २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)


## जेनिफर डाउडना आणि इमॅन्युएल शापेंटी : रसायनशास्त्रातील नोबेल विजेत्या

तेजस्विनी देसाई




MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
www.mkcl.org
जर साथ असेल MS-CIT ची, तर खात्री उज्वल भविष्याची !
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
किंवा घरून आपल्या कंप्यूटरवर शिका
किंवा आपल्या स्मार्टफोनवरून शिका
MS-CIT करा आणि जॉब रेडी व्हा !
www.mkcl.org/join
या लिंकवरून आजच प्रवेश घ्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
९ जानेवारी २०२१
वर्ष ७३ / अंक – २१
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./ चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## अनुक्रम

४ **डेक्कन कॉलेज परिसरात केशवरावांची तिसरी मुलाखत**
...संपादकीय

७ **तत्त्वाग्रही मधु लिमये**
...अतुल देऊळगावकर

१३ **नानी पालखीवाला : संविधानाची पालखी वाहणारा निष्ठावान भोई**
...लक्ष्मीकांत देशमुख

१९ **जेनिफर डाउडना आणि इमॅन्युएल शापेंटी : रसायनशास्त्रातील नोबेल विजेत्या**
...तेजस्विनी देसाई

२५ **परिस्थितीला शरण न जाणाऱ्या आयानची कहाणी!!**
...संगीता नरके

२९ **समारोप : उत्तरार्ध**
...अपर्णा दीक्षित

३२ **तो माझा कथानायक**
...अब्दुल बिस्मिल्लाह

३५ **स्मृती का कोई अतीत नहीं होता...**
...महेश्वर लव्हेकर

३८ **प्रतिसाद**
...डॉ. धनंजय चव्हाण, उज्ज्वला देशपांडे,
...वासंती फडके, वृन्दाश्री दाभोलकर, प्रा.पुरुषोत्तम शेठ

संपादकीय

# डेक्कन कॉलेज परिसरात केशवरावांची तिसरी मुलाखत

प्रिय वाचकहो,

कालच्या ६ ऑक्टोबरला पुणे येथील डेक्कन कॉलेजने दोनशेव्या वर्षांत पदार्पण केले. त्या दिवशी पहाटे त्या परिसरात आम्ही फिरायला गेलो, तेव्हा अगदीच अनपेक्षितपणे दीडशे वर्षे वय असलेल्या केशवरावांची भेट झाली होती. शिवरामपंत परांजपे यांचे घनिष्ट मित्र अशी ओळख असलेल्या केशवरावांची त्यावेळी झालेली मुलाखत हे एक अफलातून प्रकरण होते. ती मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर साधना वाचकांचा आलेला प्रतिसाद पाहून नोव्हेंबर महिन्याच्या ६ तारखेलाही पहाटे आम्ही डेक्कन कॉलेज परिसरात गेलो होतो. आणि त्या वेळी झालेली मुलाखत त्यानंतरच्या आठवड्यात प्रसिद्ध केली होती. त्यालाही आता दोन महिने होत आलेत. पण केशवरावांचे व्यक्तिमत्त्व मनात घर करू लागले म्हणून, त्यांची तिसरी मुलाखत घेण्याचा विचार आमच्या मनात आला. मात्र गेल्या महिन्यात अशाच एका भल्या पहाटे तिकडे फेरी मारली तेव्हा केशवराव भेटले नव्हते. त्यानंतर ३१ डिसेंबरच्या पहाटे आम्ही तिथे गेलो तर नेहमीच्या जागेवर दिसले नाहीत. म्हणून आसपासच्या परिसरात (पहाटेच्या शांततेचा भंग होतोय हे कळत असूनही) केशवरावऽ केशवरावऽऽ केशवरावऽऽऽ अशा हाका मारल्या. त्या हाकांना कुठूनही ‘ओऽ’ मिळाली नाही. त्यामुळे, निराश होऊन परत निघताना नेहमीच्या त्या बाकड्याकडे नजर टाकली तर केशवराव नेहमीप्रमाणेच क्षितिजाकडे नजर लावून बसलेले दिसले. आश्चर्य वाटले. कारण ते कोणत्या बाजूने व कसे तिथे आले हे कळले नाही. पण त्यांना ते खोदून विचारण्यात अर्थ नव्हता. कारण मुळातच ते खूप कमी बोलतात, त्या बोलण्यात प्रश्नच जास्त असतात आणि स्वत:विषयीचे तपशील सांगायला तर ते पूर्णत: नाखूष असतात.

तर आम्ही त्यांच्या जवळ हळुवार जाऊन शांतपणे बसलो, काही क्षण गेले. मग त्यांना विचारले, ‘तुम्ही रोज इथे येता तर मागच्या वेळी कसे दिसला नाहीत? आणि मघाशीही इथे नव्हता, मग आता अचानक कसे व कुठून आलात?’ या प्रश्नाला उत्तर म्हणून त्यांनी केवळ स्मित दिले, त्याचा अर्थ ‘सोडून द्या, कशाला इतकी चौकशी करता?’ असा होता. त्यानंतर त्यांना असेही विचारले की, ‘तुम्हाला भेटण्याची तीव्र इच्छा आमच्या काही वाचकांनी व्यक्त केली आहे, त्यांना काय सांगू?’ या प्रश्नावर त्यांनी एकदाच पण इतक्या ठामपणे नकारदर्शक मान हलवली की, त्याचा अर्थ ‘मी कोणालाही भेटू इच्छित नाही आणि तुम्हीही भेटीसाठी मला गृहीत धरू नका’ असाच होता. म्हणून शिळोप्याच्या वा हवापाण्याच्या गप्पा न मारता, आम्ही थोडासा धूर्तपणा दाखवला आणि ते बोलते होतील अशा विषयाकडे वळलो. तेव्हा आमचा संवाद बऱ्यापैकी पुढे सरकला. मात्र एक ठळक गोष्ट यावेळी आमच्या लक्षात आली; ती अशी की– बहुश्रुत असलेले केशवराव साधना साप्ताहिकाचे अंक बऱ्यापैकी नियमितपणे नजरेखालून घालत असावेत. अर्थात, तसे थेटपणे त्यांना विचारण्याचे धाडस आम्ही केले नाही. कारण ‘तुमचे अंक आम्ही वाचत नाही, केवळ चाळतो’ असे उत्तर त्यांच्याकडून आले तर काय, अशी भीती आमच्या मनात गोळा झाली होती. असो. तर या तिसऱ्या भेटीतील संवाद पुढीलप्रमाणे...

**प्रश्न –** केशवराव, उद्याच्या ६ जानेवारीला पत्रकार दिन. मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस. वयाच्या विशीत 'दर्पण' हे साप्ताहिक आणि त्यानंतर सात वर्षांनी 'दिग्दर्शन' हे मासिक सुरू केले बाळशास्त्रींनी. आणि वयाच्या केवळ चौतीसाव्या वर्षी या जगाचा निरोप घेतला त्यांनी. असे सांगतात की– मराठी, गुजराती, बंगाली, कन्नड, हिंदी, संस्कृत, ग्रीक, इंग्लिश, फ्रेंच, फारसी, अरबी या डझनभर भाषांचे जाणकार होते ते! काय अलौकिक प्रतिभेचा माणूस असेल ना?

– आम्ही तारुण्यात पदार्पण केले, त्याच्या अर्धशतकभर आधी पराक्रम गाजवला त्यांनी...

**प्रश्न –** हो, ना! १८१२ मध्ये जन्म, म्हणजे आज हयात असते तर २०९ वर्षांचे झाले असते. काय कमाल आहे नाही; पावणेदोनशे वर्षांनतरही 'दर्पण' व 'दिग्दर्शन' हेच दोन शब्द पुरतात... 'माध्यमांचे कार्य काय वा कसे असले पाहिजे' हे सांगायला.

– संपादक, तुम्हाला अप्रिय वाटणार नसेल तर एक सांगू का?

**प्रश्न –** केशवराव, असे काय विचारताय? अप्रिय सत्य सांगणे हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो तुम्ही बजावलाच पाहिजे. नाही पटले आम्हाला तरी ऐकून घेऊ आणि मुख्य म्हणजे रागावणार नाही, तुमच्यावर तरी! कारण उत्तम श्रोते आहोत आम्ही आणि तसेही संपादकाला रोज अप्रिय सत्य व अप्रिय असत्यही ऐकण्याची सवय असतेच की!

– तर मग सांगतोच. तुम्ही भूतकाळातून जरा बाहेर पडा, वर्तमानात या, भविष्याचा वेध घ्या... म्हणजे व्यक्तिगत तुमच्याबाबत नाही म्हणत मी, तुमच्या साप्ताहिकाबाबत सांगतोय...

**प्रश्न –** केशवराव, तुम्ही म्हणताय त्यात तथ्य आहे. भूतकाळात डोकावणारे, पुन:पुन्हा डोकावणारे आशय व विषय अलीकडच्या काळात जास्त आलेत खरे! पण त्यासाठी सभोवतालची परिस्थिती जास्त कारणीभूत आहे. वर्षानुवर्षांचे जुने विषय पुन्हा पुन्हा उकरून काढले जातात, चव्हाट्यावर आणले जातात, इतिहासाची मोडतोड केली जाते, तेव्हा त्याचा प्रतिवाद होईल असे लेखन जास्त येते आणि वाचकांनाही ते जास्त अपिल होते.

– असे म्हणून तुम्ही आपले अकर्तृत्व झाकत तर नाहीत ना? 'लेखकानुनय आणि वाचकानुनय यांचा अतिरेक व्हायला लागला तर ते नियतकालिक ऱ्हासमार्गाने चालू लागते,' असे तुम्हीच सांगत आलात ना सातत्याने?

**प्रश्न –** हो, पण आपले सार्वजनिक चर्चाविश्व गोल गोल फिरत राहणारे आहे. त्याच त्या विषयांभोवती, त्याच त्या घटनांभोवती, त्याच त्या व्यक्तींभोवती, त्यामुळे...

– बरोबर! पण तुम्हीच एकदा उद्धृत केलेले एक विधान आठवतेय? ''महान व्यक्ती विचारांचा परामर्श घेत असतात, सामान्यजन घडून गेलेल्या घटनांवर भाष्य करीत राहतात आणि छोट्या मनाचे लोक व्यक्तींवर चर्चा करीत बसतात.''

**प्रश्न –** हेही खरे आहे. पण आजचे वर्तमान इतके गुंतागुंतीचे, व्यामिश्र व संभ्रमित करणारे आहे की, ते उकलून दाखवणेच भल्याभल्यांना शक्य होत नाहीये. तर मग भविष्याचा वेध कोण घेणार आणि कसा?

– याला मराठीत 'पलायनवाद' असे म्हणतात! 'आज'कडून 'उद्या'कडे जाणाऱ्या समाजाला दिशादर्शन करण्याचे काम वैचारिक नियतकालिकांनी नाही करायचे तर मग कोणी?

**प्रश्न –** तत्त्वत: सहमत आहे तुमच्या या म्हणण्याशी! तशा सुधारणा करण्यासाठी प्रयत्नशील आहोत आम्ही. पण परिस्थिती कठीण होत चालली आहे. त्यातच भर म्हणजे, २०२० या वर्षात कोविड–१९ ने आख्ख्या जगाला वेठीस धरले. त्यात सर्वाधिक फटका बसला माध्यमांना आणि त्यातही प्रिंट मीडियाने तर हाय खाल्ली आहे.

– काहीच कारण नाही गर्भगळीत होण्याचे. आम्ही पाहिलाय मागील सव्वाशे वर्षांचा कालखंड. हे खरे की, आताचे संकट शतकातून एखादे म्हणावे असे, पण अशी परिस्थिती यापूर्वी अनेक वेळा आली आणि गेली. त्यातून जग सावरलेच ना!

**प्रश्न –** तुम्हाला काय वाटते, आताच्या या संकटातून प्रिंट मीडिया पुन्हा उभारी घेऊ शकेल? विशेषत: या डिजिटल युगात?

– का नाही घेणार? प्रिंट मीडियाची अशी काही बलस्थाने आहेत की नाहीत? पण आपोआप नाही उभारी घेता

येणार! त्यासाठी मुळाशी जाऊन विचार करावा लागेल. आपापली बलस्थाने व मर्यादा यांची कठोर चिकित्सा करावी लागेल प्रत्येक नियतकालिकाला. आणि मग उत्तरांच्या दिशेने कठोर पावले टाकावी लागतील.

**प्रश्न** – आम्हाला हे माहीत आहे की, एका मर्यादेनंतर अंकाचा दर्जा हा व्यवस्थापन, वितरण व अर्थकारण यावरच अवलंबून असतो, पण याबाबत मराठी नियतकालिकांची स्थिती फार सुधारत नाही आणि तशी ती सुधारण्यासाठी प्रयत्नही होत नाहीत, तशी गरज वाटणाऱ्यांची संख्याही अत्यल्प असते.

– हे बघा, तुमच्या या मुद्द्याशी वाचकांना, लेखकांना आणि टीकाकारांना काहीही देणे-घेणे नाही. तुम्ही स्वत:हून हा वसा घेताय ना, वारसा चालवण्याचे ठरवलेय ना? मग काय व कसे करायचे हे तुमचे तुम्ही ठरवा. अपयशाची कारणमीमांसा ऐकण्यात कोणाला रस नसतो. आम्ही तुमच्यावर टीका करू वा तुमचे कौतुक करू, ते केवळ तुम्ही काय व कसे वाचायला देता यासाठीच!

**प्रश्न** – हरकत नाही. तुम्ही इतक्या ठामपणे सांगतच आहात तर हेही सांगून टाका की, आमच्यासारख्या वैचारिक नियतकालिकांनी आशय विषयांच्या बाबतीत काय करायला हवे?

– संपादकांना सूचना व सल्ला देऊन उपयोग होतो असे वाटत नाही आम्हाला. पण तरीही एक पंचसूत्री घोळते आहे मनात तुमच्यासाठी....

**प्रश्न** – सांगा की... अर्थात तुमची पंचसूत्री पटली तरी कितपत राबवता येईल याची खात्री नाही देता येणार. कारण वाचक समजतात तितके संपादक सर्वाधिकारी नसतात, सर्वव्यापी नसतात आणि सर्वज्ञ तर नसतातच नसतात!

– ऐका तर मग... सूत्र क्रमांक- १. पुढील वर्ष-दोन वर्षे लेखमाला किंवा सदरे शक्यतो चालवू नका. २. दीर्घ लेख कमीत कमी असतील याची काळजी घ्या. ३. भूतकाळ व इतिहास उगाळणाऱ्या लेखनाला जास्त जागा देऊ नका. ४. अतिगंभीर व क्लिष्ट, ठोकळेबाज व पोथीनिष्ठ लेखनाला तडकाफडकी नकार द्या. ५. जे आशय/विषय अलीकडच्या काळात तुम्ही किंवा अन्य माध्यमांनी हाताळले आहेत, त्यांना स्थान देण्याचे शक्य तितके टाळा.

**प्रश्न** – केशवराव, तुम्ही आमच्यावर पाळत ठेवून आहात, असे वाटायला लागलेय आता...

– छे! छे! आम्ही असे काही करण्यात वेळ दवडत नाही. आम्ही केवळ परिघावरून दिसते तेवढे सांगतो. फरक असेल तर एवढाच की, सतत केंद्रस्थानी वावरणाऱ्यांना परिघावरून दिसतात ती दृश्ये पाहायची सोय नसते.

**प्रश्न** – कळले आम्हाला, पण तुमच्या म्हणण्याचे सार एवढेच आहे की, वाचनीयता हाच मुख्य निकष बनवा आणि दर्जा व वेगळेपण काटेकोरपणे वाढवत चला... बरोबर?

– हो! आणि आणखी एक लक्षात असू द्या. संपादक जेव्हा संपादकासारखे वागत नाहीत तेव्हा अनेक घटक त्याचा गैरफायदा घेऊ लागतात.

**प्रश्न** – अरेच्चा! आम्ही तसे वागत नाही, असे म्हणायचेय का तुम्हाला?

– चला, उशीर झालाय निघतो मी...

---


## १ जानेवारीपासून साधनाच्या वर्गणीत वाढ

साधना साप्ताहिकाचे वर्षभरात मिळून ४८ अंक प्रकाशित होतात, त्यात तीन दिवाळी अंक (बालकुमार, युवा, मुख्य) आणि अन्य पाच विशेषांक असतात. हे सर्व अंक दर आठवड्याला वर्गणीदार वाचकांना पोस्टाने पाठवले जातात. वर्षभरातील या घरपोच अंकांसाठी वार्षिक, द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी भरण्याची सोय असते. प्रत्येक दोन किंवा तीन वर्षांनंतर या वर्गणीत थोडी वाढ केली जाते. त्यामुळे १ जानेवारी २०२१ पासून साधनाची वार्षिक द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी अनुक्रमे ९०० रुपये, १८०० रुपये, २७०० रुपये अशी आहे. ही वर्गणी चेक, कॅश, बँक ट्रान्सफर इत्यादी मार्गाने भरता येते, त्यासाठी आवश्यक तपशील साधनाच्या प्रत्येक अंकात अनुक्रमणिकेच्या पानावर असतात.

स्मरण

अतुल देऊळगावकर

# तत्त्वाग्रही मधु लिमये

काही वर्षांपूर्वी, ‘राजकारण हे समाज बदलण्यासाठीचं साधन आहे’, असं मानणाऱ्यांची पिढी चौफेर तळपत होती. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र यांचा गाढा अभ्यास असणारे समाजवादी विचारवंत मधुकर रामचंद्र ऊर्फ मधु लिमये (१ मे १९२२ – ८ जानेवारी १९९५) हे त्यांपैकी एक! वयाच्या अठराव्या वर्षी शिक्षण सोडून ते ‘छोडो भारत’ चळवळीत सामील झाले आणि चार वर्षे तुरुंगात गेले. पुढे ते गोवा मुक्तिसंग्रामातही सहभागी झाले. त्या वेळी त्यांना १२ वर्षे कारावासाची शिक्षा झाली होती. ते समाजवादी पक्षाचे (त्या काळातील) चिटणीस व अध्यक्ष होते. बिहारमधील मुंगेर व बांका मतदारसंघातून तीन वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आणखी चार महिन्यांनी सुरू होत आहे. मात्र या आठवड्यात त्यांचा २६ वा स्मृतिदिन आहे.

गांधीजींच्या व समाजवादी विचारांच्या प्रभावामुळे आपल्या गरजा अतिशय मर्यादित ठेवण्याचं तत्त्व अंगीकारणारे त्या काळी अनेक जण होते, परंतु आयुष्यभर त्या मूल्यांची जपणूक करणारे हाताच्या बोटावर मोजता येऊ शकतील एवढेच नेते होते. मधु लिमये हे त्यांपैकी एक! दिल्लीचा भयंकर उन्हाळा सहन करताना त्यांची लाही-लाही होत असे. तरीही त्यांच्या घरात शीतकपाट वा वातानुकूलन यंत्र आलं नाही. घर निम्न स्तरांतील मध्यमवर्गीयासारखंच होतं. ते गरीब जनतेचे अस्सल प्रतिनिधी होते. गांधीजींचा, ‘कोणतंही कृत्य करताना सर्वांत दरिद्रीनारायणाचा चेहरा समोर आणा’ – हा सल्ला शिरोधार्य मानून त्याचं कठोर पालन केलं आणि आयुष्यभर कमालीचा साधेपणा जपला. कोणत्याही पदावर गेले तरी कुठलेही विशेष लाभ पदरात पाडून घ्यायचे नाहीत, असा त्यांचा निग्रह होता. त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेऊन कारावास भोगला, परंतु स्वातंत्र्यसैनिकांना मिळणारी एकही सवलत वा लाभ त्यांनी घेतला नाही. इतकंच काय, त्यांनी निवृत्त खासदारांना मिळणाऱ्या निवृत्तिवेतनाचासुद्धा स्वीकार केला नाही. सार्वजनिक निधीचा उपयोग हा वंचित व गरिबांसाठीच झाला पाहिजे, यासाठी सदैव आग्रही असणारे मधुजी स्वत:बाबतही विलक्षण कठोर राहिले. पुढे प्रकृती-अस्वास्थ्यामुळे त्यांनी राजकीय जीवनातून निवृत्ती घेतली. तेव्हा त्यांनी लेखन-वाचनावर लक्ष केंद्रित केलं आणि लेखनातून मिळणाऱ्या मानधनाचाच त्यांना आधार होता.

स्कूटरवर पाठीमागे बसून लोकसभेत जाणाऱ्या दुर्लभ व्यक्तींमध्ये त्यांचे नाव घेतलं जातं. संसदेच्या ग्रंथालयात अधिकाधिक काळ व्यतीत करणारे संसदपटू अशी त्यांची ख्याती होती. ते लोकसभेतील जागरूक सदस्य होते. त्यांच्यामुळे शिक्षण-आरोग्य-ग्रामविकास या क्षेत्रांतील अनेक धोरणांनी आकार घेतला, तर कित्येक तकलादू धोरणांची गच्छंती झाली.

दिल्लीच्या पंडारा रोडवरील अतिशय छोट्या व साध्या घरात त्यांचं अनेक वर्षे वास्तव्य होतं. त्या घरांच्या भिंती या ग्रंथांच्याच होत्या. कपाटं पुरत नसल्यामुळे फरशीपासून छतापर्यंत पुस्तकांचं राज्य होतं. त्यानंतर शास्त्रीय संगीताच्या फिती (त्या काळातील कॅसेट) दिसायच्या. इथे राजकीय धुरंधर, साहित्यिक, पत्रकार, शास्त्रीय संगीत व नृत्य क्षेत्रातील दिग्गज, चित्रकार अशी विविध पैलूंच्या महनीय व्यक्ती चर्चा करण्यासाठी व सल्ला घेण्यासाठी येत असत. कुमार गंधर्व, भीमसेन जोशी, किशोरी आमोणकर, बिरजूमहाराज, सोनल मानसिंग अशा श्रेष्ठ कलावंतांशी त्यांचा सहज संवाद होत असे. मधुजींचं मुक्त चिंतन ऐकणं ही त्यांच्यासाठी एक पर्वणी असे.

पत्रमहर्षी अनंतराव भालेराव यांनी अनेकांना लिहितं केलं आहे. त्यांचा आदेशच होता- ''जाशील तिथून 'मराठवाडा'साठी लिहीत जा.'' त्यानुसार १९९२ च्या मे महिन्यात मी दिल्लीला गेलो असता, मधुजींची फोनवर वेळ घेतली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी वेळेआधी १५ मिनिटे पोहोचलो. तिथे त्या काळातील जनता दलाचे नेते मुलायमसिंह यादव आधीच येऊन बसले होते. मला पाहताच मधुजी त्यांना म्हणाले, ''हे पाहा, मी याला अकराची वेळ दिली आहे. त्या वेळी मी त्याच्याशी बोलणं चालू करेन. तुम्हीही बसू शकता किंवा कुठे जाऊन यायचं असेल, तर तसं पाहा.'' त्यानंतर मधुजी माझ्याशी दीड तास बोलत होते.

**प्रश्न –** डावे व समाजवादी विचाराचे पक्ष व संघटना या वर्षानुवर्षे शोषित-पीडितांना एकत्र आणण्यासाठी झटत आहेत, परंतु उत्तरोत्तर ते त्यांच्यापासून झपाट्याने दूर जाताना दिसतात. याची कारणं काय वाटतात?

– डावे पक्ष व संघटना यांची विचारसरणी ही अतिशय जुनाट आहे. ते बुरसटलेल्या विचारांनाच कवटाळून बसले आहेत. शेतमजूर व असंघटितांच्या संघटना बांधत असताना मध्यमवर्गीय व कोरडवाहू शेतकरी आपल्या विरोधात गेले तर... दलितांना एकवटताना सवर्ण विरोधात गेले तर... असा विचार करीत बसलेल्या या पक्ष व संघटनांनी कधीही, कोणतीही स्वच्छ भूमिका घेतली नाही. परिणामी, संख्येने मोठा असलेला वर्ग ह्या पक्षांपासून दूर होत गेला. दुसरं असं की- समाजवाद म्हणजे राष्ट्रीयीकरण, यावर नको तितका भर दिला. आज त्याच राष्ट्रीयीकृत बँकांत बचतीचे पैसे ठेवणाऱ्या लोकांना मानाची दूरच, तुच्छतेची वागणूक मिळते.

समाजाचं बदलतं स्वरूप लक्षात घेतलंच पाहिजे. त्यानुसार वेळोवेळी विचारमंथन हवं. एकाच वेळी सर्व वर्गांशी वैर पत्करून चालणार नाही. काही प्रश्न सामोपचारानं सुटू शकतात. उदा.- छोट्या शेतकऱ्यांच्या उत्पादनवृद्धीसाठी प्रयत्न करावेत. त्यातूनच शेतमजुरांची मजुरी वाढेल, अशी भूमिका घ्यायला पाहिजे.

त्यांत नवे प्रश्न उभे राहत आहेत. संघटित कामगारवर्ग अर्थवादी होत चाललाय. त्यांच्या मागण्या पाहा, त्यांचे चोचले लक्षात येतील. आम्ही पूर्वी असं मानून चाललो होतो की- संघटित कामगार स्वतःचे प्रश्न सुटल्यावर असंघटितांना मदत करतील, वर्गबंधुत्व ठेवतील. पण असं काही घडताना दिसत नाही.

**प्रश्न –** सार्वजनिक उद्योगांच्या अकार्यक्षमतेबद्दल आपण कोणती भूमिका घ्याल?

– अकार्यक्षमता सर्वत्र आहे. खासगी, सार्वजनिक उद्योगात अर्धी कामे बाहेरून केली जातात. त्या कारखान्यातील मजुरांना भरमसाट पगार मिळताना बाहेरच्या कामगाराला किती वेतन मिळते, हा मुद्दाही कामगार संघटनांनी विचारात घ्यावा. परंतु सार्वजनिक उद्योगाच्या अपयशाचं महत्त्वाचं कारण- कामगार व अधिकारी यांच्यात सार्वजनिक वृत्तीचा असलेला अभाव हे आहे. मग त्याला पब्लिक सेक्टर का म्हणायचं?

**प्रश्न –** अतिशय तोट्यातील सार्वजनिक उद्योगांचं काय करावं? उदा. स्कूटर उद्योग... तो बंद केला तर...?

– मी १९७३ मध्ये म्हणालो होतो, प्राधान्यता ठरवा. सगळीकडे सरकारने का जावं? छोटे-मध्यम खासगी उद्योजक जाऊ शकतात तिथं सरकारनं जाण्याची गरज नाही. पुढे ते तोट्यात येणारच. आधी ऊर्जेसारखा महत्त्वाचा प्रश्न पाहावा. आधीच उत्पादन कमी, त्यात ६० टक्के विजेची चोरी! त्यातून पैसा उपलब्ध होत नाही. इकडे जास्त लक्ष द्यावं.

**प्रश्न –** गांधी, लोहियांनी आर्थिक विकेंद्रीकरणासाठी छोट्या यंत्राचा, पर्यायी तंत्रज्ञानाचा आग्रह धरून प्रयत्नही केले. त्यानंतर याकडे लक्ष दिलं गेलं नाही. यामुळे समाजवादी चळवळीची हानी झाली, असं वाटतं?

– जोरदार अशी समाजवादी चळवळ शिल्लकच राहिली नाही. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पक्षातले मतभेद वाढत गेले. ज्या उत्साहाने काँग्रेसमधून बाहेर पडून

समाजवादी पक्ष स्थापन केला, त्या जोमाने पक्ष बांधला नाही. परदेशातल्या समाजवादी चळवळींनी ३०-४० वर्षे कामं केली, मग त्यांना सत्ता मिळाली. आम्ही फक्त १९४६ ते ५२ एवढाच काळ काम केलं. पण चार-पाच वर्षांत काम होणार ते किती, याचा विचार न करता अवाजवी अपेक्षा केल्या. तरीदेखील १०-११ टक्के मतं मिळाली. पण आमचं नेतृत्व हबकलं. मग काँग्रेसमध्ये परत जावं की सहकार्य करावं, का सर्वोदयात जावं- हे विचार सुरू झाले. दुफळीनं पक्ष क्षीण झाला. विचारसरणीचाही समग्र विकास हा काही हवेतून होत नाही, चळवळीमधून साकार होतो. अशी चळवळ कधीच बांधली गेली नाही.

**प्रश्न** – अंतर्गत दुफळी हाच कमकुवतपणा ठरला?

– दुफळी काही वैयक्तिक हेव्यादाव्यातून नव्हती, वैचारिक मतभेदांतून होती. 'बाहेर पडल्यावर आता काँग्रेसशी सहकार्याचं प्रयोजन नाही' असं मानणारा डॉ.लोहिया व मी हा एक गट होता. दुसऱ्या बाजूला अशोक (मेहता) सारखे 'काँग्रेससह सत्तेत सहभागी व्हावं' म्हणत होते. सत्तेच्या राजकारणातून परिवर्तन होत नाही, ते सर्वोदयातून होईल, असं मानून जयप्रकाश तिकडे गेले. सर्वोदयातून काही होत नाही, हे लक्षात आल्यावर पुन्हा राजकारणात आले. पण तोवर समाजवादी चळवळीचं खूप नुकसान झालं होतं. त्या वेळी डॉ.लोहियांसारखे विचारक, संघटक आचार्य नरेंद्र देव यांसारखे उत्तुंग नेते असले तरी जनतेकडून जयप्रकाश यांनाच नेता मानलं गेलं होतं. त्यांनीच मोर्चा सर्वोदयाकडे वळवला. अशोकनीसुद्धा त्या काळी अनेक आघाड्यांवर कामं केली. मुंबईत मजूर संघटना, तरुण-नागरी आघाडी, प्रशिक्षण वर्गसाहित्य चळवळ असं सर्वांगीण काम होतं. समाजवादी पक्ष नगरपालिकेत प्रबळ होता, पण पुढे राहिला नाही. तेव्हा डॉ.लोहियांना वाटायला लागलं की, बिगरकाँग्रेस पक्षांची आघाडी हवी. अमुक राष्ट्रविरोधी, हा लोकशाहीविरोधी हे शिक्के न मारता जवळ येऊन निश्चित कार्यक्रम ठरवावा. हा बिगर काँग्रेसवाद पुढे आला. पण त्यातूनही पक्ष वाढला नाही. १९६७ व १९७७ ला असे प्रयोग होऊन सरकारसुद्धा बनले. त्यात १९७७ ला पक्षच विलीन झाला. आता पुन्हा काही जण पक्ष स्थापायचा म्हणत आहेत. पण आता वातावरण बदललंय, एवढं सोपं राहिलं नाही. म्हणजे 'साईन बोर्डवाली' पार्टी बनेलही, परंतु जनतेचा आधार असलेला पक्ष बनवणं कठीण आहे. मी कुणाला निरुत्साही



करू इच्छित नाही, मला फक्त त्यातले धोके सांगायचे आहेत.

अल्पप्रमाण यंत्र-तंत्राबद्दल बोलायचं तर- जनता सरकार असताना आर्थिक धोरणास दिशा देण्यासाठी समिती बनवली होती. चरणसिंह त्याचे अध्यक्ष होते. मी सदस्य होतो. खऱ्या अर्थाने अर्थरचना बदलण्यासाठी खोलवर विचार त्यात केला गेला. कुटीर, लघु, मध्यम उद्योगांचं महत्त्व ओळखून त्यांच्यासाठी क्षेत्रं राखीव ठेवली होती. रोजगारवाढीसाठी कुटीर, छोट्या उद्योगांना जास्त प्राधान्यता दिली. विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने या धोरणाची अंमलबजावणी हे महत्त्वाचं पाऊल ठरलं असतं. पण दुर्दैवाने अडीच वर्षांत सरकार कोसळलं. नंतर त्याचा विचारच झाला नाही. आजही ते विचार मोलाचे आहेत, पण कुणी लक्ष देत नाही. आर्थिक धोरणाला विरोध म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्या, नाणेनिधी, जागतिक बँकांना विरोध- असंच स्वरूप दिसतं. पण भीक मागायची गरज का पडते, हे कुणी बोलत नाही.

१९८० नंतर इंदिरा गांधी, पुढे राजीव गांधी सत्तेवर आले आणि समाजाची उपभोगवादाकडे झपाट्याने वाटचाल सुरू झाली. 'मारुती'वर अब्जावधी परकीय चलन खर्च केलं. हाच प्रकार टीव्ही, व्हिडिओवर होऊ लागला. जनतेला हे 'मनोरंजन' मिळवण्याची तहान लागली. हा चंगळवाद-उपभोगवाद काही केवळ उच्च मध्यमवर्गीयांपुरता नव्हता, तर ते लोण खालपर्यंत पोचलं होतं. म्हणून काँग्रेसच्या आर्थिक धोरणावरील टीका ही अपुरी व नकारात्मक आहे. काय करावं, हे कुणी बोलत नाही? मला मात्र आजही जनता पक्षाचं आर्थिक धोरण महत्त्वाचं वाटतं.

**प्रश्न** – तुम्ही स्वातंत्र्यापूर्वी स्वराज्याविषयी केलेली कल्पना आणि आज- यात तफावत कुठे जाणवते?

– इतक्या अफाट प्रमाणात लोकसंख्यावाढ होईल, असं वाटलं नव्हतं. महाराष्ट्रात संततिनियमन हा विषय होता, पण तो समाजसुधारणेचा भाग मानला जात होता. भारताची लोकसंख्या दुपटीपेक्षा अधिक होईल, त्याचे परिणाम काय होतील याची जाणीव नव्हती, आजही नाही.

दुसरी बाब म्हणजे- देशाची झपाट्याने आर्थिक प्रगती होईल. शेती प्रक्रिया उद्योग, छोटे उद्योग वाढून रोजगार वाढेल, असं वाटलं होतं. प्रत्यक्षात प्रशासकीय कामावर प्रचंड खर्च तर विकासकामाला निधीच नाही, असं आर्थिक स्वरूप सतत दिसतंय. नोकरशाहीला नेहमीच मोठमोठ्या योजना हव्या असतात. अशा रीतीने विकास कसा होणार?

तिसरा मुद्दा उपभोगवाद आणि लोकसंख्यावाढ हा आहे. त्यातून संपूर्ण समाजाचं अपराधीकरण होत आहे. याचा काही अंदाजच तेव्हा बांधता आला नाही. विकास धड होत नसल्यामुळे दर वर्षी ४०-५० लाख हाडामांसाचे तरुण रोजगारासाठी बाजारात येतात. हे काय करतात? तेच माफियाच्या हाताशी लागतात. मुंबईचं पाहा. भाजप-काँग्रेस दोघांचा 'बॉम्बस्फोटामागे पाकिस्तान आहे,' हे दाखवण्याचा प्रयत्न चालला आहे आणि तसंच आहे, हे मीही मानतो. पण स्फोट घडवणारे सर्व भारतीय नागरिक आहेत ना? धर्मांध मुसलमान आणि आत्मा विकलेले हिंदू आहेत. कस्टमचे लोक कोण आहेत. चार लाखांची लाच घेऊन सोने-चांदीची तस्करी होऊ देणारे अधिकारी- तिथे आरडीएक्स आहे, हे समजताच १० लाख रुपये मागू लागले. शेवटी त्यांनी ७ लाख घेऊन आरडीएक्स सोडून दिलं. त्यातून स्फोट घडवले. पश्चिम किनाऱ्यावरच्या अनेक दशकांच्या तस्करीचाच हा परिपाक आहे. ३० वर्षांचं स्मगलिंग आणि अयोध्या यातून आरडीएक्स तयार झालंय.

**प्रश्न** – सगळ्या मोठ्या विकासयोजनांनी केन्द्रीकरण होत जातं, त्यातून भ्रष्टाचार वाढतो; म्हणून त्यांना सरसकट विरोध करणं योग्य वाटतं का?

– माझ्या म्हणण्याचा हेतू तसा नाही. पण मोठ्या योजना घेतल्या म्हणजे प्रचंड खाता येतं, हा नोकरशाहीचा दृष्टिकोन कायमच असतो. कोणत्याही योजनेचा विचार हा गुणवत्तेनुसारच व्हावा. नर्मदा धरणाचं उदाहरण घ्या. त्याच्यापासून वीजनिर्मिती व सिंचनाचे आकडे अतिरंजित आहेत. दुसरं- विस्थापितांच्या मानवी दुःखाचं मूल्यांकन कुणी करत नाही, तसंच पर्यायी योजनांकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. काही मोठ्या योजनांची गरज आहे. रेल्वेचं पाहा. परदेशाच्या मानाने आपल्याकडे रेल्वेजाळे सर्वदूर आहे, असं नाही. रेल्वेने रोजगार वाढतो. विकासाला वेग येतो. आपण मोठ्या प्रमाणावर क्रूड ऑईल आयात करून बस वाहतूक वाढवतो. वस्तुतः छोट्या शहरात ट्रामचा सुंदर, सुयोग्य पर्याय आहे. पाच-सात लाखांच्या शहरात ट्राम चालते. जिनेव्हा, हेलसिंकीत ट्राम आहे. इंग्रजांनी ट्राम काढून टाकली की लागलीच आपणही काढली. वास्तविक ट्राम ही इको-फ्रेंडली आहे. एका बाजूला कारखाने, दुसरीकडे निवासी वसाहत व मध्यवर्ती भागात व्यापारी केंद्र, अशी शहराची रचना केल्यास संपूर्ण शहरवाहतूक ही एक-दोन ट्राम मार्गांनी जोडता येईल. त्यामुळे अनेकांची पायपीट वाचेल. इंधन व परकीय चलन वाचेल. प्रदूषण कमी होईल. या योजनेविषयी मी अनेकांशी बोललो आहे, कुणीही ऐकत नाही.

देशभरात रेल्वे व शहरात ट्रामवाढीला प्रचंड वाव आहे. गोवा रेल्वेसारखी उपयुक्त योजना जॉर्ज फर्नांडिस, दंडवतेंमुळे साकार झाली. त्यातही अडथळे आणणे चालूच होते.

**प्रश्न** – आपण बिगर काँग्रेसवादाबद्दल बोलत होता. स्वातंत्र्यानंतर २८ वर्षे लोकांनी काँग्रेसलाच पसंत केलं. याची कारणं काय होती?

– स्वातंत्र्य चळवळीच्या काळात ब्रिटिश सत्तेचं उच्चाटन हीच जनतेची प्राधान्यता होती. सामजिक, आर्थिक या प्रश्नांना तेवढं महत्त्व नव्हतं. ब्रिटिशांची हकालपट्टी या अग्रक्रमापुढे प्रदेश, भाषा या समस्या थिट्या ठरल्या होत्या. त्याकडे लोक पाहायला तयार नव्हते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परिस्थिती बदलली. राष्ट्रीय एकता व स्वातंत्र्य या उदात्त

भावनांचं प्रतीक म्हणून जनतेनं काँग्रेसला मन:पूर्वक स्वीकारलं होतं. त्यामुळे काँग्रेसची पाळेमुळे देशभर रुजली होती. काँग्रेस कार्यकर्त्यांची खादी, शिक्षण, रुग्णालयं अशी रचनात्मक कामेही चालू होती. त्यामुळे खेडोपाडी काँग्रेसचं लोण गेलं होतं. अशा काँग्रेसला देशभर पर्याय उभं करणं, हे काम सोपं नव्हतं. काँग्रेस संघटनांमधील वजनदार कार्यकर्ते व अनुभवी नेत्यांचा सार्वजनिक जीवनावर विलक्षण प्रभाव होता. तो स्वातंत्र्यानंतर ३५ वर्षे उलटल्यानंतरही टिकून आहे.

**प्रश्न –** बिगरकाँग्रेसवाद हा नेमका कोणत्या विचारांचा परिपाक आहे?

– समाजवादी पक्षातील लोहिया, जयप्रकाश व अशोक मेहता हे तिघे तीन दिशांना गेले. अशोक मेहता काँग्रेससोबत गेले. लोहियांनी काँग्रेसविरोध स्वीकारला, तर जयप्रकाश हे सर्वोदय व पक्षविरहित समाजकारणाकडे गेले. समाजवादी चळवळीच्या अशा त्रिभाजनामुळे देशातील प्रतिगामी व संप्रदायवादी शक्ती फोफावत गेल्या. समाजवादी आंदोलनास खीळ बसली. त्या पोकळीत प्रतिक्रियावादी शक्ती वाढू लागल्या. काँग्रेस सोडताना एक विचाराधिष्ठित पर्यायी पक्ष उभा करण्याचं स्वप्न घेऊन लोहिया व जयप्रकाश बाहेर पडले होते. तसा पक्ष त्यांना निर्माण करणं जमलं नाही. काँग्रेसच्या एकाधिकारशाहीला आव्हान देण्यासाठी लोहियांनी बिगरकाँग्रेसवाद आणला. पुढे जयप्रकाश यांनीही तेच केलं. परंतु बिगरकाँग्रेसवाद हा विविध छटांच्या काँग्रेसजनांचा मेळावाच झाला आहे. सत्ताप्राप्तीसाठी पक्षांतर करणारेच बिगरकाँग्रेसवादात सामील होत आहेत.

वस्तुत: लोहिया यांच्या बिगर काँग्रेसवादी धोरणाला मी बराच काळ विरोध केला होता. 'स्वतंत्र पार्टी, जनसंघ, कम्युनिस्ट, प्रादेशिक पक्ष व असंतुष्ट काँग्रेसी यांच्या एकत्रीकरणातून साधणार काय?' असा प्रश्न विचारत राहिलो. शेवटी लोहिया यांच्या आग्रहाला बळी पडलो.

**प्रश्न –** काँग्रेस ही जमीनदार व बड्या लोकांचीच आहे, ही टीका गांधीजींनीही केली होती; तरीही काँग्रेस ही कडवे डावे व कट्टर उजवे यांचं मिश्रण होत गेली. काँग्रेसमध्ये आता जे अनेक दुर्गुण जाणवत आहेत, ते सत्ताप्राप्तीनंतर आले की आधीही जाणवत होते?

– स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकारण हे मूल्याधिष्ठित होते. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी हे 'राष्ट्रीय सभा ही राष्ट्राची पार्लमेंट आहे', असंच मानत होते व पाहत होते. राष्ट्रीय सभेमध्ये सर्व विचारांचे लोक असावेत, कोणाचीही मक्तेदारी असू नये, असंच त्यांना वाटत होतं. त्यामुळे तिथे मुस्लिम लीग, हिंदू महासभा, नॅशनलिस्ट पार्टीचेही नेते येत असत. कोणालाही मज्जाव नव्हता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसचे लोकसेवक संघात रूपांतर करावे, सत्ताकांक्षी न होता जनसेवेला वाहून घ्यावे– असंच गांधीजींनी सांगून ठेवलं होतं. परंतु गांधीजींच्या हत्येमुळे ते स्वप्न विस्कटून गेलं. त्याचबरोबर अनेक मूल्यंही लाथाडली गेली.

वारेमाप पगार आणि जमीनदारी थाटाच्या नोकरशाहीला गरीब भारताच्या समस्या समजूच शकत नाहीत, अशी टीका राष्ट्रीय सभा वारंवार करीत असे. त्यामुळेच १९३१ च्या कराची अधिवेशनात 'मंत्री असो वा सनदी अधिकारी त्यांच्या वेतनाची मर्यादा ही दरमहा ५०० रुपये असावी' असा ठराव करण्यात आला होता. गांधीजींनी काँग्रेसच्या मंत्र्यांना हे धोरण राबवायला भाग पाडलं होतं. परंतु काही जणांना बडेजाव हवा होता. हळूहळू घरभत्ता व प्रवासभत्ता या मार्गातून खर्च वाढू लागला. त्या काळात कन्हैयालाल मुन्शी हे मुंबईचे गृहमंत्री होते. त्यांचा खर्च पाहून गांधीजींनी त्यांना थेट सुनावलं होतं. तरीही त्यांच्यावर परिणाम झाला नाही. मग अशी संख्या वाढत गेली. दुसरीकडे पक्षवाढीचं भरघोस कार्य चालू असल्याचं भासविण्याकरता खोटी सभासद नोंदणी सुरू झाली. श्रीमंतांकडूनच देणग्या घेऊन वर्गणी दाखविण्याचे प्रकार सुरू झाले. याची कल्पना येताच गांधीजींनी 'हरिजन'मधून टीका केली होती. स्वातंत्र्यानंतर नेते, प्रशासन व समाज सगळ्यांध्ये बदल होत गेले. आदर्श लुप्त होत गेले. मूल्यांची बूज राहिली नाही. काँग्रेसच्या मंत्र्यांनी जमीनदारी थाट चालू केला. गांधीजींना एका पिढीला स्वखुषीने दारिद्र्याचा स्वीकार करायला लावला होता. त्याचा विसर पडत गेला. ही प्रक्रिया इतक्या गतीनं घडत गेली की आता राजकारणातून सत्ता आणि सत्तेतून 'कुटुंबाचा विकास' ही स्थिती आली आहे.

**प्रश्न –** गेल्या काही वर्षांत भ्रष्टाचार हा राजकीय मुद्दा ठरत नाहीय?

– (तोडत) माझ्यामते आर्थिक विकासाचा तो मोठा अडसर आहे. भ्रष्टाचारामुळेच उद्योग व कृषिविकास मंदावत आहे. राजकीय पक्षांनी हा मुद्दा सोडला तरी तो महत्त्वाचा आहे.

पण सध्या भ्रष्टाचाराविषयी कुणीच काही बोलत नाही.

सगळे त्यात सहभागी आहेत. मोजक्याच व्यक्तींचे अपवाद करता येतील. परंतु सगळे राजकीय पक्ष सारखेच आहेत. लोकांनी सगळ्यांची सरकारं पाहिली आहेत. भाजपच्या बाबतीत तीच स्थिती आहे. काँग्रेसला भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत न्हाऊन निघण्यास ३० वर्षे लागली असतील, तर बाकीचे पाच-दहा वर्षांत तयार होतील.

**प्रश्न –** या परिस्थितीत काळ्या ढगांना रुपेरी किनार वगैरे आहे असं वाटतं?

– लोकमत! लोकात काम करणारेच काय ते करू शकतील. (थांबून) दुसरं असं की, हा समाज अनेक शतकांपासून मेलेला समाज आहे. स्वतःची सुधारणा घडवून आणण्याची आंतरिक शक्तीच आपल्याकडे दिसत नाही. लोक तुलनेसाठी इटलीचे उदाहरण देतात. पण तो औद्योगिक दृष्ट्या सुधारलेला, पाश्चिमात्त्य आधुनिक विचारांचा प्रभाव असलेला देश आहे. मुख्य म्हणजे त्या लोकांमध्ये अजूनही दम आहे. कॅथॉलिक चर्चने विरोध करून विवाहसंस्था 'स्कँडल' ठरविल्यावर २० लाख जोडपी तरीही विवाहाशिवाय जगत होती. त्यांची संतती बेकायदा ठरवली. तरीही चर्चला कुणी जुमानलं नाही. शेवटी सार्वमत घ्यावं लागलं आणि त्या मतदानात लोकांनी चर्चला धुडकावून लावलं. अशी धमक लोकांमध्ये असते तो समाज जागृत असतो.

तसंच लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांचं लोकशाहीकरण झाल्याशिवाय ती अर्थपूर्ण होऊच शकत नाही. आज अडवाणी, तेलगु देशम हे पक्ष निवडणुकीत प्रिफरेंशियल रेफरंडम, स्टेट फंडिंगची मागणी करतात. पण पक्षांतर्गत लोकशाहीचं पथ्य कुणी पाळतं का? उलट यातून शासनाचा खर्च अतोनात वाढेल. शिवाय सध्याचा निवडणुकीतील वाममार्गाचा पैसा, काळा पैसा हादेखील कमी न होता वाढतच जाईल.

**प्रश्न –** सध्याच्या व्यवस्थेत बहुसंख्य कायम प्रबळ राहणार, असं दिसतं. या रचनेत काही बदल करता येतील?

– अल्पसंख्य, बहुसंख्य हा विचार निराळ्या तऱ्हेने करायला हवा. हिंदू बहुसंख्य आहे, हे राजकीय सत्तेच्या व निवडणुकीच्या दृष्टीने फक्त तणावाच्या वेळी आढळणारं सत्य आहे. तेव्हा हिंदू-हिंदू म्हणून देतो; एरवी तो वर्गीय, जातीय, क्षेत्रीय हित पाहून मत देतो. म्हणूनच धर्माच्या आधारावर मत मागणारे सतत वातावरण तप्त-तणावपूर्ण ठेवावं, या निर्णयाला आले आहेत.

पण या देशात खरं बोलणं, भाकीत वर्तवणं महान पाप आहे. शिव्या ऐकाव्या लागतात. जनता पक्षाच्या वेळी जनसंघ व संघाच्या खोल अध्ययनानंतर दुहेरी निष्ठेचा मुद्दा मी उपस्थित केला. कुणी ऐकलं नाही. जनसंघ स्वायत्त नाही, तो संघपरिवाराचा भाग आहे. जोवर जनसंघ संघापासून अलग होत नाही तोवर जनता पक्ष एकसंध होऊन विकासणार नाही, असं मत व्यक्त केले. पण हा प्रश्न सर्वांनी एकाच वेळी उठवला नाही. आज सत्तेनं मदांध झालेला भाजप स्वतःला संघपरिवाराचा भाग म्हणवतो. मला पूर्वी हे सिद्ध करावं लागत होतं.

**प्रश्न –** विरोधकांच्या 'मनमोहनसिंग देश विकायला निघाले आहेत' या टीकेविषयी आपण काय म्हणाल?

– देशापुढील संकट हे काही आजचं नाही. हा सापळा हळूहळू आवळत गेला आहे. त्याची १९८० पासून सुरुवात झाली. राजीव काळात विश्वनाथ प्रताप हे अर्थमंत्री होते. मग चंद्रशेखर पंतप्रधान असताना आणि मनमोहनसिंग ह्या काळात परिस्थिती उत्तरोत्तर बिकट होत गेली. सगळे जण त्यांच्या परीने परदेशी साह्यासाठी धाव घेत होतेच. मग जाचक डंकेलसारखी बंधनं ही स्वाभाविकपणे येतात. आधी आपण आपले खर्च वाढवायचे, मग भीक मागायला जायचं; याचा ते गैरफायदा घेणारच. विकसित राष्ट्रंही आपल्यापेक्षा चारशे वर्षे पुढे आहेत. त्यांना आता तिसऱ्या जगाला राजकीय रीत्या लुबाडता येत नाही, मात्र आर्थिक दृष्ट्या लुटता येतं. नुसता आरडाओरडा करून काय होणार? अंतर्गत परिस्थिती सुधारण्यावर भर दिला पाहिजे.

**प्रश्न –** सध्याच्या अस्थिर व अशांत राजकीय वातावरणातून बाहेर पडण्यासाठी राजकीय पक्षांनी काय करावं, असं आपल्याला वाटतं?

**प्रश्न –** त्यासाठी प्रदीर्घ काळ कार्य करण्याची तयारी पाहिजे. १५-२० वर्षे लागली तरी जातीयवादी, धर्मवादी वा प्रदेशवादी विचारांच्या पक्षांची मदत घेणार नाही, असं ठामपणे ठरवून संघटना उभी केली पाहिजे. लोकांच्या लक्षात येतं, पण त्याला वेळ लागतो. तेवढा संयम आपल्यात पाहिजे. फ्रान्समध्ये समाजवादी नेते मितराँ या मार्गाने जाऊन यशस्वी झाले.

**अतुल देऊळगावकर,** लातूर
Mob. 9422071905

(साधना प्रकाशनाकडून पुढील महिन्यात येणाऱ्या 'ऐकता दाट' या पुस्तकात पाच पूर्वप्रसिद्ध मुलाखती आहेत, त्यातील ही एक.)

लक्ष्मीकांत देशमुख

# नानी पालखीवाला : संविधानाची पालखी वाहणारा निष्ठावान भोई

**प्रास्ताविक**

स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वोच्च न्यायालयापुढे संविधानाच्या कलमांचे व उद्देशिकांमधून व्यक्त होणाऱ्या तत्त्वज्ञानाचा युक्तिवाद करताना मूलभूत मांडणी करणारे आणि त्याद्वारे भारतीय संविधानाच्या सैद्धान्तिक कक्षा वाढविणाऱ्या मोजक्याच वकिलात नानी पालखीवालांना अग्रणाचा मान द्यावा लागेल. कारण केशवानंद भारती या आजवरच्या सर्वांत मोठ्या तेरा न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे सुमारे महिनाभर त्यांनी जो युक्तिवाद केला तो ग्राह्य मानून सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना 'संविधानाचा मूलभूत गाभा सिद्धांत' म्हणजेच बेसिक स्ट्रक्चर थिअरी ऑफ कॉन्स्टिट्युशन मांडून संसदेला त्याविरुद्ध कोणतेही कायदे करता येणार नाहीत, असे प्रतिपादन केले. या सिद्धांताच्या आधारे २०१६ मध्ये 'नॅशनल ज्युडिशियल अपॉईंटमेंट कमिशन' हा संसदेने संमत कायदा सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल केला.

हे नानी पालखीवालांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे आणि आज त्यांना आठवावं लागत आहे, ते नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९ ला सर्वोच्च न्यायालयात सदर कायद्याने सेक्युलॅरिझम या संविधानाच्या मूलभूत गाभ्याचा भंग होतो, म्हणून आव्हानित करण्यात आले आहे. जेव्हा हे प्रकरण अंतिम सुनावणीस येईल तेव्हा याचिकाकर्त्यांचे विधिज्ञ निश्चितपणे नानी पालखीवाला यांच्या केशवानंद भारती प्रकरणात केलेल्या युक्तिवादाचा व मांडलेल्या गाभा सिद्धांताचा अभ्यास करून उचित संदर्भ देतील. अनेक ज्येष्ठ विधिज्ञ अणि माजी न्यायमूर्तींचे असे मत आहे (ज्याच्याशी मी पण एक छोटा अभ्यासक म्हणून सहमत आहे) की, सेक्युलॅरिझम हा भारतीय संविधानाचा एक मूलभूत गाभा आहे. आणि नागरिकत्व सुधारणा कायदा २०१९ हा धर्माच्या आधारे करीत मुस्लिमांना वगळणारा आहे, म्हणून तो रद्द होऊ शकतो. तसे झाले तर पालखीवालांच्या धारदार

स्पष्ट रणनीती आणि ठाशीव युक्तिवाद– त्यांची वकिली युक्तिवादाची वैशिष्ट्यपूर्ण अशी ठामपणे मुद्दा प्रतिपादनाची पद्धत होती. ते काळजीपूर्वक प्रकरणातील घटनांचे पृथ्थ:करण करायचे, त्यावर आधारित कायदेशीर मुद्दे बनवायचे व दोन्हींचा सुयोग्य मेळ घालत युक्तिवाद करायचे. तो युक्तिवाद करताना जर त्यांना मुद्दा न्यायालयाने स्वीकारला नाही तर ते काय होईल हे पण सांगायचे. प्रतिस्पर्ध्यांच्या युक्तिवादातील फोलपणा दाखवायचे. त्यामुळे काय अनर्थ घडू शकतो, हे पण ते प्रतिपादन करायचे. ते कोर्टात बोलताना कधीही आवाज चढवायचे नाहीत वा आपला तोल जाऊ द्यायचे नाहीत. न्यायमूर्ती छगलांच्या मते नानींपेक्षाही अनेक विद्वान वकील होते, तरीही त्यांचा युक्तिवाद हा बिनतोड व न्यायसंगत असायचा. त्यांच्या भाषा प्रभुत्वामुळे नानी पालखीवालांचे युक्तिवाद हे जिवंत असायचे व इतर वकील ती आवर्जून ऐकायचे.

व विचक्षण सांविधानिक तर्कशुद्ध प्रतिपादनाचा व मांडलेल्या सांविधानिक तत्त्वज्ञानाच्या मूलभूततेचा विजय असेल. म्हणूनच जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने पालखीवालांचा जीवनपरिचय आणि त्यांनी लढलेल्या सांविधानिक प्रकरणांचा इतिहास आणि विषद केलेल्या सांविधानिक नैतिकतेचा संक्षेपाने आढावा घेणे आवश्यक आहे. तो घेण्याचा हा एक प्रयास आहे.

एक

**द कोर्टरूम जिनिअस**

पारशी लोकांची आडनावे ते करीत असलेल्या व्यवसायावरून पडलेली आहेत. पालखीवालांचे पूर्वज हे घोडागाडी पूर्व काळात पालखी तयार करणारे व्यापारी होते, म्हणून हे पालखीवाला. नानींची घटनात्मक प्रकरणातली वकिली पाहिली, तर त्यांनी आपलं आडनाव सार्थक केलं असं म्हणता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक स्वरूपाच्या निकालपत्रांचा इतिहास नानी पालखीवालांविना पूर्ण होऊ शकत नाही. केशवानंद भारती केस असो वा सेंट झेवियर, मिनर्व्हा प्रकरण असो वा मंडल प्रकरण... या सर्व सांविधानिक प्रकरणात नानी पालखीवालांचा घटनात्मक अभ्यास व युक्तिवाद न्यायाधीशांनी स्वीकारून घटनेची स्वतंत्रता राखणारे अनेक निकालपत्र दिले आहेत. म्हणून 'संविधानाची पालखी निष्ठेनं वाहणारा भोई' असं नानी पालखीवालांचं एका वाक्यात कार्यकर्तृत्व अधोरेखित करता येईल.

प्रख्यात न्यायमूर्ती एम.सी. छगलांच्या पीठापुढे पालखीवालांनी अनेक केससमध्ये युक्तिवाद केला होता. त्यांनी पालखीवालांबद्दल खालीलप्रमाणे प्रशंसोद्गार काढले आहेत, ते त्यांच्या वकिली व्यवसाय व बुद्धिमत्तेचा सार्थ मूल्यांकन करणारे आहेत.

'नानी पालखीवाला हे भारताचे नि:संशय सर्वाधिक बुद्धिमान वकील आहेत. इंग्रजी भाषेवर असणाऱ्या अद्वितीय प्रभुत्वाचा ते कौशल्याने वापर करीत युक्तिवाद करायचे. कायद्याचे असीम ज्ञान आणि तर्कशुद्ध अफाट शक्ती त्यांच्या प्रतिपादनात आहे.'

न्यायमूर्ती एच.आर. खन्नांनी तर छगलांच्या पुढे जात नानी पालखीवालांचा गौरव करताना, 'जर जगातील सर्वोत्कृष्ट दहा विधिज्ञांची यादी केली, तर त्यात नानी पालखीवालांचे नाव असणार, याबाबत माझ्या मनात तिळमात्रही शंका नाही. त्यांचा वकिली युक्तिवाद हा अत्युच्च पातळीवर गेल्याचे अनेक प्रसंगी आम्ही अनुवभले आहे. त्यांचे शब्द दीर्घकाळ स्मरणात सुखद अनुभूती देत निनादत राहिले आहेत' असे म्हटले आहे.

भारताचे माजी ॲटर्नी जनरल सोली जे. सोराबजी आणि मद्रास हायकोर्टाचे ज्येष्ठ विधिज्ञ अरविंद पी. दातार यांनी पालखीवालांच्या कोर्ट केसवर आधारित 'नानी पालखीवाला – दी कोर्टरूम जिनिअस' हे पुस्तक लिहिले आहे. भारताने २६ जानेवारी १९५० रोजी संविधान स्वीकारले, तेव्हापासून १९९० च्या पूर्वार्धापर्यंत सुमारे चार दशकांहून अधिक काळ पालखीवालांनी अनेक सांविधानिक प्रकरणे हाताळली आणि अनेक महत्त्वाचे घटनात्मक न्यायनिवाडे झाले. आज सर्वोच्च न्यायालयावर भारतीय नागरिकांच्या जो अभंग असा विश्वास आहे, त्याचे कारण सर्वोच्च न्यायालयाने या काळात निर्भयपणे त्यांच्यावर सोपवलेली संविधानाच्या रक्षणाची जबाबदारी केवळ निभावलीच नाही, तर सत्ताधीशांवर जो न्यायिक अंकुश ठेवला आहे, त्यामुळे आहे. कुशाग्र बुद्धीचे व घटनेचे पूर्ण ज्ञान असलेल्या अनेक न्यायाधीशांनी दिलेल्या अनेकविध ऐतिहासिक व लँडमार्क ठरलेल्या निकालामुळे न्यायालये हा भारतीयांसाठी आशेचा व विश्वासाचा दीपस्तंभ बनला आहे. न्यायमूर्तींचे घटनात्मक निकाल देताना जे स्वतंत्र भारतातले सर्वाधिक महत्त्वाचे दहा सांविधानिक स्वरूपांचे निकालपत्र काढले तर त्यात पालखीवालांच्या व प्रभावी युक्तिवादाचा मोठा सहभाग आहे हे स्पष्टपणे दिसून येते. म्हणून ते जसे 'कोर्टरूम जिनिअस' होते, तसेच ते सांविधानिक प्रभुता प्राप्त भारतातले सर्वाधिक प्रभावी विधिज्ञ होते. प्रस्तुतचे पुस्तक त्यांच्या 'सांविधानिक कायदा प्रकरणां'वर सविस्तरपणे प्रकाशझोत टाकते. म्हणून केवळ न्यायमूर्ती व वकिलांसाठीच नाही तर राज्यकर्ते, विचारवंत व सर्व संविधान अभ्यासक व प्रेमीसाठी हे पुस्तक 'ए मस्ट रिड' बनले आहे.

**दोन –**

**'नानी कॉस्टींग स्पेल वुईथ पॉवर ऑफ हिज वर्ड्स!'**

नानाभाई अर्देशर पालखीवाला ऊर्फ नानी यांचा जन्म १६ जानेवारी १९२० चा. त्यांच्या वडिलांचा लाँड्रीचा व्यवसाय होता. पण अर्देशर व शेरू या दांपत्याने नानी व इतर दोन भावंडांना केवळ उत्तम शिक्षण दिलं नाही, तर संस्कारही दिले. उच्च कोटीची नैतिकता हा नानी पालखीवालांचा गुण

घरातून आलेला आहे. म्हणून ‘दि लॉ ॲण्ड प्रॅक्टिस ऑफ इन्कमटॅक्स’ हा ग्रंथ नानींनी आई-वडिलांना अर्पण करताना त्यांच्या हातून जे काही चांगलं काम घडून आलं, त्याचं श्रेय त्यांनाच आहे, अशा आशयाची हृद्य अर्पणपत्रिका लिहिली आहे. आपल्या साऱ्या यशाचं श्रेय नानींनी किती हृद्य शब्दांत आई-वडिलांना दिलं आहे!

नानी हे बालपणापासून अभ्यासू व वाचनवेडे होते. ते नेहमीच शाळेच्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण व्हायचे. अभ्यास व वाचनाखेरीज त्यांना व्हायोलिन व पियानो वादन, ज्योतिष, फोटोग्राफी, चित्रकला व सुतारकामाचा छंद होता. खेळात मात्र त्यांची गती शून्य होती, पण क्रिकेटचा खेळ पाहण्याची आवड होती. पहा काय गंमत आहे, ज्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर क्रिकेटपटू मैदान गाजवायचे, त्याच स्टेडियमवर पालखीवाला वर्षानुवर्षे अर्थसंकल्प सादर झाल्यावर त्याचे विश्लेषण करण्यासाठी व्याख्यान द्यायचे व त्यावेळी स्टेडियम पूर्ण भरले जायचे! त्याचे कारण त्यांचं अर्थसंकल्पावरचं चिकित्सक व मार्मिक विवेचन जसं होतं, तसंच त्यांची प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारी वक्तृत्वशैलीही कारणीभूत असायची. आणखी एक आश्चर्याची बाब म्हणजे बालपणी ते बोलताना अडखळायचे, पण त्या व्यंगावर त्यांनी परिश्रमपूर्वक मात केली. त्यांच्या वक्तृत्वशैलीबाबत जस्टीत खन्नांची ही पावती पहा,

‘पीठासीन न्यायाधीशांना नानी पालखीवाला युक्तिवाद करताना आपल्या शब्दप्रभुत्वानं जे संमोहन निर्माण करायचे, त्यातून बाहेर यायला किमान आठवडा तरी लागायचा.’

किंवा भारताचे माजी ॲडव्होकेट जनरल गुलाम इ.वहानवटी यांचं खालील विधान पहा, त्यातून नानी आपल्या शब्दप्रभुत्वाने साऱ्यांनाच कसे मंत्रमुग्ध करीत हे प्रत्ययास येतं.

‘जेव्हा ते न्यासपीठास संबोधित करायचे, तो त्यांचा संवाद करीत लक्ष वेधून घेणं असायचं. न्यायमूर्तींच्या मेंदूवर ते पूर्ण प्रभुत्व मिळवायचे, असे होते नानी पालखीवाला.’

नानी मास्टर्स ट्युटोरियल हायस्कूलमध्ये शिकले, त्या वेळी ते अकौंटन्सीच्या वर्गातही बसायचे. त्याचा पुढे त्यांना फायदा आयकर प्रकरणात वकिली करताना झाला. त्यांचं तोतरेपणावर (स्टॅमरिंग) मात करीत मिळवलेलं वाक्‌पटुत्व व त्यांची तर्कशुद्ध विचारपद्धत पाहून वडील म्हणायचे, ‘बेटा, तू कायद्यासाठीच जन्मला आहेस, तर वकील हो.’ पण नानींना प्रारंभी इंग्रजीचे प्राध्यापक व्हायचे होते. म्हणून



सेंट झेविअर कॉलेजमधून बी.ए. ऑनर्स ही पदवी इंग्रजी भाषेत त्यांनी मिळवली. पुढे त्यांनी इंग्रजीतच एम.ए. केलं. त्यांची मैत्रीण-सहाध्यायी व पुढे पत्नी झालेली नर्गेस त्यांना आय.सी.एस. होण्याचा आग्रह करीत होती. पण दिल्लीत त्या वर्षी रोगराई पसरल्यामुळे त्यांना परीक्षा देता आली नाही. त्यामुळे त्यांनी कायद्याची पदवी घेतली. त्या वेळी ‘ओरिजिनल साईड’ला प्रॅक्टिस करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठीण अशी ‘ॲडव्होकेट (ओ.एस.) परीक्षा’ पास होणं आवश्यक असायचं. ती परीक्षा पालखीवाला यांनी प्रथम क्रमांकानं केवळ उत्तीर्णच केली नाही, तर प्रत्येक पेपरला त्यांनी सर्वाधिक गुण मिळवले.

नानींनी १९४४ मध्ये सर जमशेटजी कांगा यांच्याकडे वकिली सुरू केली. कांगा हे मुंबई प्रांताचे ॲडव्होकेट जनरल तसेच मुंबई हायकोर्टाचे काही काळ न्यायमूर्तीही होते. कांगांनी दिलेल्या पहिल्याच प्रकरणात नानींनी अवघ्या दोन दिवसांत ब्रीफ तयार केलं आणि त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिलं नाही. प्रथम त्यांनी आयकराच्या (इन्कमटॅक्स) केसेस प्रामुख्याने हाताळल्या व हायकोर्टात कांगाचे ज्युनिअर म्हणून अनेक प्रकरणात युक्तिवादही केला

आणि वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी १९५३ मध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रथम त्यांनी युक्तिवाद केला आणि ती केस ते जिंकलेही.

न्यायमूर्ती यशवंत चंद्रचूड हे नानीच्या पुढे एक वर्ष विधी महाविद्यालयात होते. त्यांच्या सूचनेमुळे त्यांच्यासोबत त्यांनी लॉ कॉलेजला अर्धवेळ व्याख्यात्याची नोकरीही १९४९ ते १९५२ या काळात केली. दोघेही विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. स्वतंत्रपणे वकिली सुरू केल्यानंतर अवघ्या तीन वर्षांतच त्यांची वार्षिक कमाई साठ हजार रुपयांपर्यंत पोचली, जी आजच्या मानाने पन्नास लाख रुपये होईल. याच काळात त्यांनी मरीनड्राईव्हला पाच हजार स्वेअर फुटाचा अलिशान असा फ्लॅट कॉमनवेल्थ इमारतीत खरेदी केला व तिथेच शेवटपर्यंत राहिले. १९७० पर्यंत ते भारताचे प्रमुख 'मोस्ट वाँटेड' वकील होते. १९७० नंतर त्यांनी काम कमी केलं आणि १९९५ पर्यंत ते केवळ महत्त्वाची प्रकरणे हाताळायचे. पण शेवटपर्यंत ते टाटा ग्रूप ऑफ कंपनीच्या विधी सल्लागाराच्या कामात मग्न होते. अखेरीस त्यांचे ११ डिसेंबर २००२ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

तीन

**नानी पालखीवाला म्हणजे वकिली क्षेत्रातले डॉन ब्रॅडमन!**

'प्रतिभा अधिक पूर्वतयारी म्हणजे यश.'

'एकदा केलेल्या सरावाने तुम्ही चांगले बनत नाही. सातत्याने सराव केलाच तर तुम्ही सर्वोत्तम बनू शकता.'

माल्कम ग्लॅडवेल यांच्या 'आऊट लायर्स – द स्टोरी ऑफ सक्सेस' या २००८ साली प्रसिद्ध झालेल्या व बेस्ट सेलर ठरलेल्या पुस्तकातील वरची दोन अवतरणे महत्त्वाची आहेत. या पुस्तकात ग्लॅडवेल यांनी यशाचं रहस्य सांगताना काही प्रश्न उपस्थित केले होते. ते म्हणजे – १. सफलतेसाठी केवळ जन्मजात प्रतिभा व बुद्धिमत्ता पुरेशी आहे का? २. तयारी व कठोर परिश्रमाचा यशस्वी होण्यात किती वाटा असतो? ३. विशिष्ट प्रकारचे वातावरण यशासाठी किती आवश्यक आहे? खरं तर या तीनही गोष्टींचा माणसाच्या यशस्वीतेमागे वाटा असतोच, फक्त त्याचे प्रमाण व्यक्तिगणिक बदलत राहते एवढेच. नानी पालखीवालांच्या असाधारण वकिली यशामध्ये हे सर्व घटक होते!

'नानी पालखीवाला – द कोर्टरूम जिनिअस' या पुस्तकात नानींच्या यशाची कारणमीमांसा करताना त्यांचे खालील गुणवैशिष्ट्ये आणि कौशल्ये लेखकद्वयींनी अधोरेखित केली आहेत. ती वास्तविक कोणत्याही क्षेत्रात हिमालयाची उंची गाठणाऱ्या सर्वच यशस्वी माणसांना लागू पडतात. येथे त्यांचा आढावा पालखीवालांच्या संदर्भात पाहू या.

१. यश प्राप्तीची दुर्दम्य आकांक्षा– यशस्वी होण्यासाठी अर्जुनाला लक्ष्यभेद करताना केवळ माशाचा डोळा दिसायचा. तशी नानींची दुर्दम्य आकांक्षा सदैव राहिली होती. ते वक्तृत्वस्पर्धेत नेहमी प्रथम यायचे. त्यांना दुसरे स्थान रुचायचे नाही. ते एल.एल.बी. परीक्षेतही सर्वप्रथम आले होते.

२. कठोर परिश्रम घेण्याची अफाट क्षमता– नानींकडे कठीण परिश्रम करण्याची अमर्याद क्षमता होती. दिवसभर कोर्टात काम, मग रात्री साडेनऊपर्यंत नवीन प्रकरणांचा अभ्यास, त्यानंतर इन्कमटॅक्स ट्रिब्युनलच्या प्रकरणांची पहाटे दोनपर्यंत तयारी, असा त्यांचा दिनक्रम असायचा. त्यांना वेळोवेळी दिल्लीला सर्वोच्च न्यायालयात जावे लागायचे. ते पहाटे चार वाजता विमानतळावर जायचे, त्यामुळे तातडीच्या प्रकरणात अशीलांना रात्री तीन किंवा साडेतीनची अपॉईंटमेंट ते द्यायचे. असे अखंड परिश्रम नानींनी सुमारे चार दशके केले, त्यामुळे तर ते भारताचे सर्वश्रेष्ठ वकील म्हणून नावाजले गेले.

३. निरंतर स्व–विकास– या मंत्रावर पालखीवालांचा दृढ विश्वास होता. ते व्यवस्थापन गुरू पीटर ड्रकरची पुस्तके नेहमी वाचायचे व स्वत:च्या कामात वेळोवेळी सुधारणा करत बदल घडवून आणायचे. या अर्थाने तो अखंड विद्यार्थी होते असेच म्हणले पाहिजे.

४. स्पष्ट रणनीती आणि ठाशीव युक्तिवाद– त्यांची वकिली युक्तिवादाची वैशिष्ट्यपूर्ण अशी ठामपणे मुद्दा प्रतिपादनाची पद्धत होती. ते काळजीपूर्वक प्रकरणातील घटनांचे पृथ्थ:करण करायचे, त्यावर आधारित कायदेशीर मुद्दे बनवायचे व दोन्हींचा सुयोग्य मेळ घालत युक्तिवाद करायचे. तो युक्तिवाद करताना जर त्यांना मुद्दा न्यायालयाने स्वीकारला नाही तर ते काय होईल हे पण सांगायचे. प्रतिस्पर्ध्याच्या युक्तिवादातील फोलपणा दाखवायचे. त्यामुळे काय अनर्थ घडू शकतो, हे पण ते प्रतिपादन करायचे. ते कोर्टात बोलताना कधीही आवाज चढवायचे नाहीत वा आपला तोल जाऊ द्यायचे नाहीत. न्यायमूर्ती छगलांच्या मते नानींपेक्षाही अनेक विद्वान वकील होते, तरीही त्यांचा

युक्तिवाद हा बिनतोड व न्यायसंगत असायचा. त्यांच्या भाषा प्रभुत्वामुळे नानी पालखीवालांचे युक्तिवाद हे जिवंत असायचे व इतर वकील ती आवर्जून ऐकायचे.

फली नरिमन यांनी क्रिकेटची परिभाषा वापरत पालखीवालांना 'ब्रॅडमन क्लास'मध्ये (आजच्या तेंडुलकर क्लासमध्ये) बसवले होते. जगात दोन प्रकारचे फलंदाज असतात. एक– 'हॉब्स क्लास'चे, तर दुसरे– 'ब्रॅडमन' क्लासचे. अनेक वकिलांना नानींप्रमाणे कठोर परिश्रम करून 'हॉब्स' क्लास गाठता आला असेल, तर केवळ मोजक्यांनाच नानींप्रमाणे अभिजात अशा 'ब्रॅडमन क्लास'मध्ये सामील होता आलं आहे. त्यात जसे आज फली नरिमन आहेत, तसेच सोली सोराबजी आहेत.

वरील गुण–वैशिष्ट्यांमुळे नानी पालखीवाला अव्वल वकील बनले. पण ही गुण–वैशिष्ट्ये सर्वच क्षेत्रातील यशस्वी माणसांना लागू पडतात. ती नव्या पिढीसाठी उद्‌बोधक व मार्गदर्शक नक्कीच ठरू शकतात.

चार

**सांविधानिक अवकाश बदलणारे ऐतिहासिक प्रकरण**

नानी पालखीवाला हे आयकर प्रकरणे चालवणारे अत्यंत निष्णात असे वकील होते. त्यांच्या करिअरची सुरुवातच मुळी आयकर प्रकरणांनी झाली. त्यात त्यांनी एवढी पारंगतता मिळवली, की त्यांनी 'द लॉ अँड प्रॅक्टिस ऑफ इन्कमटॅक्स' हे पुस्तक सर जमशेटजी कांगा यांच्यासह लिहिले. त्याच्या असंख्य आवृत्त्या, त्याही ताज्या कायद्यातील सुधारणा व केसलॉसह निघाल्या. त्यासाठी पालखीवालांनी अपार परिश्रम घेतले व प्रचंड अभ्यास केला. सर्व उपलब्ध निकालपत्रे त्यांनी अभ्यासलीच, पण इतर देशातील कायदे व केस लॉज मिळवून त्यांचाही अभ्यास या पुस्तकासाठी केला होता.

पालखीवालांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्याती आहे ती सांविधानिक तज्ज्ञ वकील म्हणून. १९६० ते १९९० या काळातील सर्व महत्त्वाच्या सांविधानिक प्रकरणातील निकालपत्रामध्ये पालखीवालांचे योगदान मोलाचे राहिले आहे. चांगला अभ्यासू व संविधानाचा समतोल व परिपूर्ण अभ्यास असणारा वकील सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना निकालपत्र देताना मदत करीत असतो. पालखीवाला हे अशा सांविधानिक तज्ज्ञ वकिलांचे पितामह शोभतात.

गोलकनाथ विरुद्ध पंजाब सरकार ही १९६७ ची केस. त्यामध्ये अकरा न्यायमूर्ती असलेल्या मोठ्या खंडपीठाने घटनेतील नवव्या परिशिष्टाचा होणाऱ्या गैरवापराची समीक्षा केली. संसदेला घटना कशीही बदलण्याचा कलम ३६८ प्रमाणे आहे का? घटनेने प्रत्येक नागरिकांना जे अधिकार बहाल केले आहेत, त्या मूलभूत अधिकारांचा संकोच घटना दुरुस्तीच्या नावाखाली संसदेला करता येतो का? या प्रश्नांची चर्चा या निकालपत्रात खंडपीठाने केली.

प्रस्तुत प्रकरणाच्या तपशीलात न जाता पालखीवालांनी जो युक्तिवाद खंडपीठापुढे केला तो पाहणे अधिक उचित राहील. त्यांनी युक्तिवाद करताना प्रथम खंडपीठाने न्यायालयाचा पूर्वीचा दृष्टिकोन हा संसदेला घटनादुरुस्तीचे अमर्याद अधिकार आहेत, ही जी भूमिका घेतली होती. तिचा पुनर्विचार करण्याची विनंती केली. जर संसदेवर त्यासाठी वाजवी निर्बंध घातले नाही, तर त्याचे किती गंभीर परिणाम होऊ शकतात, हे सांगताना संसद घटनादुरुस्तीने सर्व मूलभूत कायदे रद्द करू शकतो का? किंवा देशाचा संघीय (फेडरल) ढाचा बदलू शकतो का? किंवा असा काही घटनेचा मूळ गाभा (core area) आहे, ज्याला संसदेला घटनादुरुस्तीने धक्का लावता येणार नाही? असे प्रश्न उपस्थित केले. त्यामागे संविधाननिर्मात्यांनी अत्यंत काळजीपूर्वक बनवलेल्या घटनेमध्ये संसदेने चुकीचे बदल करू नयेत, अशी पालखीवालांची उच्च नैतिक कळकळ होती. याच अनुषंगाने एम.के. नांबियार या वकिलांनी नानींच्या युक्तिवादाला पुष्टी देताना एक जर्मन विधिज्ञ डायटर कोनार्ड यांच्या 'द इंप्लाईड लिमिटेशन ऑफ अमेंडिंग पॉवर' (अधिकार बदलाची अनुस्यूत मर्यादा) या लेखाचा संदर्भ दिला होता. पण न्यायमूर्ती वांछू यांनी या दोघांची युक्तिवाद हा 'अर्ग्युमेंट ऑफ फिअर' आहे असे निकालपत्रात नमूद केले. 'संसद त्यांना दिलेल्या अधिकाराच्या गैरवापर करेल, अशी भीती बाळगायचे काही कारण नाही.' असेही त्यांनी म्हणले होते. (दुर्दैवाने आणीबाणीतील घटनादुरुस्त्यांनी व २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा कायद्यानं नानींनी १९६५ मध्ये व्यक्त केलेली भीती किती खरी होती, हे सिद्ध झाले आहे.)

परंतु या खंडपीठाने निकाल देताना घटनेने बहाल केलेले मूलभूत अधिकार हे एवढे महत्त्वाचे आहेत की– ते संसद बदलू शकत नाही, असा दृष्टिकोन स्वीकारला. पूर्वीच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पण मूलभूत अधिकारांना पवित्र (सॅक्रोसॅट) मानले होते. म्हणून प्रस्तुत खंडपीठाने

बहुमताने असा निर्वाळा दिला की, संसदेला जरी सर्व व्यक्त (एक्स्प्रेस) किंवा अंतर्निहित (इंप्लाईड) अधिकार असले तरी घटनेचा भाग तीन (मूलभूत अधिकार) बदलता येणार नाही.

या निकालानं सर्वोच्च न्यायालयाचा त्यांचा पूर्वीच्या शंकरी प्रसाद केस मधला निकाल, जो मूलभूत अधिकाराचा संकोच करण्यासाठी संसदेला पूर्ण वाव किंवा मुभा देणारा होता, तो मर्यादित अर्थाने बदलला आणि पूर्वलक्षी प्रभाव (रिट्रॉस्पेक्टिव) ऐवजी भविष्यलक्षी (प्रॉसपेक्टिव) पद्धतीने लागू राहील असा निर्वाळा दिला. पण घटना दुरुस्ती क्रमांक एक, चार व सतरा अन्वये जे भू-सुधार कायदे संसदेने पास करून नवव्या परिशिष्टात टाकले, त्याबाबत न्यायालयात अपील करता येणार नाही हा भाग कायम ठेवला. पण तरीही या प्रकरणातले मूलभूत अधिकाराबाबतचे निरीक्षण पुढील सांविधानिक न्यायिक इतिहासाच्या वाटचालीसाठी दिशादर्शक ठरले असं निश्चित म्हणता येईल.

मूलभूत अधिकाराचा कलम १३(२) किंवा ३६८ चा वापर करून कोणत्याही प्रकार संकोच करता येणार नाही, असा अकरा न्यायमूर्तींच्या खंडपीठाचा बहुमताचा गोलकनाथ विरुद्ध पंजाब सरकारचा निकाल हा पहिला महत्त्वाचा सांविधानिक निकाल आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय हे संसदेच्या घटनादुरुस्तीचे 'न्यायिक पुर्ननिरीक्षण' अर्थात 'ज्युडिशियल रिव्ह्यू' करू शकते हा पुढील प्रकरणांसाठी महत्त्वाचा ऐतिहासिक स्वरूपाचा केस लॉ ठरला गेला. त्यात पालखीवालांचा वाटा छोटा असला तरी महत्त्वाचा होता. ही त्यांच्या सांविधानिक वकालतीची उत्तम म्हणता येईल अशी सुरुवात झाली होती, असंच म्हटलं पाहिजे.

पाच

**द सेविंग ऑफ इंडियाज् कॉन्स्टिट्यूशन**

२४ एप्रिल १९७३ रोजी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सिक्री व इतर बारा न्यायाधीशांच्या सर्वांत मोठ्या खंडपीठानं केशवानंद भारती प्रकरणात ७ विरुद्ध ६ असा निसटत्या बहुमतानं निकाल दिला, त्यानं भारतीय गणराज्याचं भविष्य कायमसाठी सुरक्षित केलं गेलं असं आता सर्वमान्य झालं आहे. ही एक प्रकारे फोटोफिनीश केस होती. सहा न्यायाधीशांनी संसदेच्या घटनादुरुस्तीचा अमर्यादित अधिकार मान्य केला, तर सहा न्यायाधीशांनी तो मर्यादित असून संसदेला संविधानाचा मूलभूत ढाचा किंवा अत्यावश्यक वैशिष्ट्ये बदलता येणार नाही असा निर्वाळा दिला. न्यायमूर्ती खन्ना यांनी पहिल्या गटाच्या न्यायमूर्तींच्या विचारांशी सहमती दर्शवत स्वतंत्र निकालपत्र लिहिताना शेवटी विचार बदलून दुसऱ्या गटांच्या न्यायमूर्तींशी सहमती दर्शवली आणि ७ विरुद्ध ६ असा निसटत्या बहुमतानं निकाल दिला गेला. त्यानं भारताची लोकशाही वाचवली आणि पुढे भविष्यात कधीही एका पक्षाची एकाधिकारशाही येणार नाही याची दक्षता घेत आपली घटनेप्रतीची कटिबद्धता दर्शवली. आज सर्वोच्च न्यायालयात नागरिकत्व सुधारणा कायद्याला याच दृढ झालेल्या 'संविधानाचे मूलभूत स्वरूप' सिद्धांताच्या आधारे आव्हानीत केले असून अनेक ज्येष्ठ विधिज्ञ व माजी न्यायमूर्तींच्या मते या कायद्याने या सिद्धांताच्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचे उल्लंघन झाले आहे. मला स्वत:ला पण जो माझा थोडा अभ्यास आहे, त्या आधारे वाटते.

पालखीवालांना केवळ एका प्रकरणासाठी कायमचं आठवायचं म्हणलं तर ते हे प्रकरण- जे मूलभूत अधिकाराची केस या नावानंही ओळखलं जातं आहे असं म्हटलं पाहिजे. हा नानींच्या सांविधानिक वकिलीचा युक्तिवादाचा अत्युच्च सुवर्णक्षण होता. संसदेला घटना दुरुस्तीचा अमर्यादित अधिकार नाही व तिला ३६८ कलमाचा अधिकार वापरून संविधान वा घटनेच्या मूलभूत वैशिष्ट्यात, ढाच्यात बदल करता येणार नाही, हे या निकालानं अधोरेखित केले.

खरं तर दुसरे प्रसिद्ध विधिज्ञ एच.एम. सिरवाई हे संसदेला घटना दुरुस्तीचे अमर्यादित अधिकार आहेत, या मताचे पुरस्कर्ते होते. पण नंतर त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रमााणिकतेनं हे कबूल केलं की, जर (या निकालानं) घटनेचा मूलभर्धी गाभा सिद्धांत म्हणजेच 'बेसिक स्ट्रक्चर डॉक्टरीन' घालून दिलं नसतं, तर त्याचे परिणाम गंभीर झाले असते आणि भारत देश हा एकाधिकारशाही व पोलीस राज्यात बदलला जाण्याचा धोका टांगत्या तलवारीप्रमाणे नेहमीच राहिला असता. पुढे १९७५ साली लागू झालेल्या आणीबाणीनं ते दाखवून दिलं. जर हा निकाल नसता तर निश्चितपणे संसदेनं संविधानाला भविष्यकाळात विद्रूप (डिफेस) व संकीर्ण (डिफाईल) केलं असतं.

**लक्ष्मीकांत देशमुख**, पुणे
Mob. : 9325297509/9823533128
laxmikant05@yahoo.co.in

तेजस्विनी देसाई

# जेनिफर डाउडना आणि इमॅन्युएल शापेंटी

## रसायनशास्त्रातील नोबेल विजेत्या

डोरोथी हॉजकिननंतर प्रथमच दोन महिला शास्त्रज्ञांनी (पुरुष शास्त्रज्ञाशिवाय) रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिकावर आपल्या नावाची मोहोर उमटवली– जेनिफर डाउडना (अमेरिका) आणि इमॅन्युएल शापेंटी (फ्रान्स). हजारो किलोमीटर अंतरावरील प्रयोगशाळेत काम करत असूनही त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे ही दूरी दूर करून एकमेकांच्या सहयोगाने– नव्हे, एकत्रित काम करून शास्त्रीय वर्तुळात एक नवी क्रांती घडवून आणली. त्यांचे संशोधन जैवरसायन व सूक्ष्म जीवशास्त्राला नवा आयाम देऊन एकूणच मानवी जीवनात मूलगामी परिणाम करणारे ठरेल. त्या दोघींचा व त्यांनी केलेल्या संशोधनाचा थोडक्यात व शक्य तितका सोपा परिचय करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

जेनिफर डाउडना हे डोरोथी जेन् आणि मार्टिन कर्क डाउडना यांचे कन्यारत्न. जेनिफरचा जन्म १९ फेब्रुवारी १९६४ रोजी वॉशिंग्टन डी.सी. येथे झाला. तिचे वडील इंग्लिश साहित्यामध्ये पीएच.डी., तर आई शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर पदवीधर. जेनिफर सात वर्षांची असताना तिच्या वडिलांना हिलो येथील हवाई विद्यापीठात संधी मिळाली आणि डाउडना परिवार हवाईला रवाना झाला. तेथे जेनिफरच्या आईने आशियाई इतिहासाची पदवी संपादन केली आणि त्या तेथीलच एका महाविद्यालयात रुजू झाल्या. हवाई बेटाचे एकूणच सौंदर्य, तेथील जैवसंपदा मोहून टाकणारी होती. निसर्गाच्या सगळ्या करामतींविषयी जेनिफरच्या मनात कुतूहल जागृत झाले. आई–वडिलांनीही तिच्या जिज्ञासू वृत्तीला खतपाणी घातले. ती सहावीत असतानाच वडिलांनी तिला जेम्स वॉटसनचे ‘दि डबल हेलिक्स’ हे पुस्तक दिले. डीएनए रचनेचा शोध सांगणाऱ्या गोष्टीचे हे पुस्तक वाचल्यानंतर गूढ, विलक्षण अशा जैविक प्रक्रियांचा अभ्यास करण्याचा ध्यास तिने घेतला. हिलो येथे शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर कॅलिफोर्निया राज्यातील क्लेरमॉण्ट येथील पोमोना महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिने जैवरसायनशास्त्र या विषयाची निवड केली. तेथील अध्यापकांनी तिला नेहमी उत्तेजन दिले. आपल्या संशोधनाची सुरुवात शेरॉन यांच्या प्रयोगशाळेतून केली. ती म्हणते, ‘‘शेरॉनसारख्या एक स्त्री मार्गदर्शक आपल्या पाठीशी असणं, हे दुसऱ्या स्त्रीच्या यशासाठी अतिशय महत्त्वाचं असतं आणि या बाबतीत मी खूपच भाग्यवान आहे.’’ जैवरसायनशास्त्रातील पदवी १९८५ मध्ये घेतल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ती ‘हार्वर्ड मेडिकल स्कूल’मध्ये दाखल झाली. तिने ‘जैवरसायनशास्त्र आणि रेण्वीय औषधनिर्माणशास्त्र’ या विषयात १९८९ मध्ये पीएच.डी. पदवी संपादन केली. तिच्या प्रबंधाचा विषय ‘उत्प्रेरित आरएनएची स्वप्रतीकरण क्षमता’ असा होता.

नोबेल विजेते शास्त्रज्ञ जॅक झोस्तेक (Dr. Jack Szostak) हे तिचे मार्गदर्शक होते. जेनिफर आणि झोस्तेक यांनी आरएनए जोडणी (स्प्लिसिंग) या प्रक्रियेविषयीची निरीक्षणे मांडली. या प्रक्रियेत आरएनएला दोन ठिकाणी छेद जाऊन मधला भाग एन्ट्रॉन (यावर सांकेतन नसते) काढून टाकला जातो व बाजूचे दोन भाग (एक्सवण) पुन्हा जोडले जातात. या प्रक्रियेत रायबोन्यूक्लिओप्रोटिन एन्ट्रॉनला बांधले जातात व ते बाजूला करतात. (बाजूची आकृती पाहा). अशा तऱ्हेने पूर्व आरएनएचे प्रगल्भ आरएनएमध्ये रूपांतर होते. हा शोध खूपच महत्त्वपूर्ण होता. कारण आरएनए पॉलिमरेजचेही काम करतात, असा निष्कर्ष निघत होता. तिने १९८९ ते १९९१ या कालावधीत 'मॅसॅच्युसेट्स जनरल हॉस्पिटल' आणि 'हार्वर्ड मेडिकल स्कूल' येथे संशोधन केले. तिला प्रामुख्याने 'रेण्वीय जीवशास्त्र' आणि 'अनुवंशशास्त्र' या विषयात रस होता. 'युनिव्हर्सिटी ऑफ ऑफ कॉलोराडो', बॉल्डर येथे १९९१ ते १९९४ या काळात तिने संशोधन केले.

जेनिफरने सुरुवातीला रायबोझाइम्सची (रायबोन्यूक्लिक सिड एन्झाईम) रचना आणि कार्य यांचा अभ्यास केला. रायबोझाइम्स हे आरएनए रेणू, आरएनए जोडणीसारख्या विशिष्ट जैवरासायनिक अभिक्रियांमध्ये उत्प्रेरकाचे काम करतात. त्यांना उत्तप्रेरित आरएनए असेही म्हणतात. मग १९८२ असे लक्षात आले की, आरएनए केवळ जनुकीय पदार्थाच्या रूपात नसून जैविक प्रक्रियांमध्ये उत्प्रेरकाचे काम करणाऱ्या विकाराच्या रूपातही असतात, या विकारांनाच रायबोझाइम्स म्हणतात. जेनिफरचे लक्ष रायबोझाइम्सच्या कार्यपद्धतीवर होते. पण त्यासाठी रेण्वीय पातळीवर रायबोझाइम्सचे निरीक्षण करणे आवश्यक होते. म्हणून ती 'युनिव्हर्सिटी ऑफ कॉलोराडो' बोल्डर येथील थॉमस चेक (Thomas Cec) यांच्या प्रयोगशाळेत दाखल झाली. जेनिफरने प्रथम रायबोझाइम्सच्या स्फटिकांच्या त्रिमितीय रचनेचा अभ्यास केला. तिने या प्रकल्पाची सुरुवात चेक यांच्या प्रयोगशाळेत १९९१ मध्ये केली आणि १९९६ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला. दरम्यान १९९४ मध्ये ती येल विद्यापीठातील जैवभौतिक व जैवरसायनशास्त्र विभागात सहायक प्राध्यापक म्हणून रुजू झाली.

येल येथे जेनिफरचा चमू टेट्राहायमेन या आदिजीवांतील रायबोझाइम्सचे स्फटिक मिळवण्यात यशस्वी झाला आणि त्याची त्रिमितीय रचनाही त्यांनी मांडली. या अभ्यासातून असे निदर्शनास आले की, आरएनएला विशिष्ट रचना असते. याच चमूमध्ये जेमी कॅट होता. पुढे जेमी व जेनिफर विवाहबद्ध झाले. काविळीच्या विषाणूमधील रायबो-झाइम्सचाही त्यांनी अभ्यास केला. सन २००० मध्ये जेनिफरला हेन्री फोर्ड सेकंड हे प्राध्यापकपद मिळाले. त्याचबरोबर हार्वर्ड विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात अभ्यागत प्राध्यापक म्हणूनही ती जात असे. जेनिफरने एका विशिष्ट प्रकारच्या रायबोन्यूक्लिओप्रोटिन (आरएनपी-आरएनए व आरएनए बाधित प्रथिनांचे बनलेले असते)चे परीक्षण केले. त्यास सिग्नल रेकॉग्निशन पार्टिकल (एसआरपी) म्हणतात. एसआरपी रचनेचाही जेनिफर व तिच्या सहकाऱ्यांनी अभ्यास केला.

जेनिफरचा भर विषाणूमधील आरएनएच्या अभ्यासावर होता. तिच्या प्रयोगशाळेत विषाणूंच्या आरएनएमधील एका विशिष्ट भागावर लक्ष केंद्रित केले. या भागांना रायबोझोमअंतर्गत प्रवेशिका म्हणतात. हा भाग बाधित पेशीमधील रायबोझोमचा ताबा घेऊन अक्षरशः त्यामधील प्रथिननिर्मिती प्रणाली बळकावतो व तिचा वापर स्वप्रथिन निर्मितीसाठी करतो. हिपॅटायटीस सी मधील विषाणूंचा जेनिफरच्या चमूने अभ्यास केला. त्यांनी असे प्रतिपादन केले की, इतर विषाणूंमध्येही अशी प्रणाली असेल.

सन २००२ मध्ये 'युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया', बर्कले येथे 'जैवरसायनशास्त्र व रेण्वीयजीवशास्त्र' या विषयातील प्राध्यापक म्हणून तिची नियुक्ती झाली. तेथे प्राध्यापक म्हणून तिचे यजमान कार्यरत होते. लॉरेन्स बर्कले प्रयोगशाळेतील सिन्क्रॉट्रॉन वापरण्याची संधी तिला मिळाली. बर्कले येथे आल्यानंतर तिने आपले रायबोझोमअंतर्गत प्रवेशिकाविषयीचे संशोधन पुढे चालू ठेवले. या रेणूंच्या रचना व कार्याचा अभ्यास करून त्या विषाणूवरील उपचारांची दिशा मिळू शकली असती. पण जेनिफर एवढ्यावरच समाधानी नव्हती. तिला रायबोझाइम्स व इतर सामान्य विकारांच्या रासायनिक प्रक्रियांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात विशेष रस होता. यातून 'जीवसृष्टीचा उगम कसा झाला?' या मूलभूत प्रश्नावर प्रकाश टाकण्यास मदत झाली असती. काही शास्त्रज्ञांनी असे गृहीतक मांडले होते की, प्राचीन काळी आरएनए रेणूंचे जग होते. त्यासाठी 'विविध प्रकारच्या रासायनिक अभिक्रियांमध्ये आरएनए उत्प्रेरक म्हणून काम करतात का?' या प्रश्नाचे उत्तर शोधणे आवश्यक होते. या प्रश्नाचे उत्तर 'होय' असेल, तर वरील गृहीतकाला पुष्टी मिळते.




तिने आता आरएनए- इंटर्फरन्स अभ्यास करण्यास सुरुवात केली. या प्रक्रियेमध्ये आरएनएचे रेणू विशिष्ट एम आरएनए निष्क्रिय करून जनुकीय गुणधर्म प्रकट होण्यास प्रतिबंध करतात. त्याच वेळी काही आरएनए रेणू पेशीमधील जनुकीय कार्ये नियंत्रित करतात, असे काही शास्त्रज्ञांनी दाखवून दिले. जेनिफरच्या एका सहकाऱ्याने तिला या नव्या संशोधनाची माहिती दिली. जीवाणूंमधील जनुकांचा अभ्यास केला असता असे आढळले की, त्यांच्या डीएनएमध्ये काही विशिष्ट जनुकीय क्रमाची पुन: पुन्हा पुनरावृत्ती झाली होती. हे म्हणजे ठरावीक शब्द प्रत्येक वाक्यानंतर पुन्हा लिहिण्यासारखे होते. या पुनरावृत्त झालेल्या जनुकीय क्रमाला क्लस्टर्ड रेग्युलरली इंटर्सपेस्ड शॉर्ट पॅलिनड्रोमिक रिपीट्स (क्रिस्पर- CRISPER - Clustered Regularly Interspaced Short Palindromic Repeats) असे म्हणतात. हे एक प्रकारचे नियामक आरएनए होत. विशेष गमतीचा भाग म्हणजे, दोन पुनरावृत्त झालेल्या जनुकीय क्रमांमधला जनुकीय क्रम विषाणूमधील जनुकीय क्रमाशी जुळत होता. यातून असा निष्कर्ष काढला की, विषाणूंच्या बाधेतून मुक्त झालेले जिवाणू विषाणूंच्या जनुकाचा काही भाग आपल्या जनुकीय घटकांमध्ये मिसळून त्यांची स्मृती जतन करतात. पण यामागची कार्यप्रणाली माहीत नव्हती. जेनिफरच्या सहकाऱ्यांच्या मतानुसार जीवाणूंनी विषाणूला निष्क्रिय करण्यासाठी वापरलेली पद्धत जेनिफरच्या आरएनए-इंटर्फरन्ससारखी असली पाहिजे. ही बातमी अतिशय महत्त्वपूर्ण तसेच उत्तेजित करणारी होती. जीवाणूंमध्ये प्राचीन प्रतिरक्षाप्रणाली असते का? तसे असेल, तर ती खूपच मोठी गोष्ट होती.

या बातमीमुळे जेनिफरमधील जिज्ञासेला नवी चेतना मिळाली आणि तिने क्रिस्परचा सर्वंकष अभ्यास करण्याचे ठरवले. क्रिस्परबरोबरच संशोधकांनी एक नवे विशिष्ट जनुक शोधले होते आणि त्या जनुकास त्यांनी क्रिस्पर-असोसिएटेड- केस (cas) असे संबोधले. जेनिफरला केसमध्ये विशेष रस वाटला, कारण ही जनुके डीएनएची सर्पिल रचना उलगडून त्यास छेद देणाऱ्या प्रथिनांच्या जनुकीय आज्ञावलीशी मिळती-जुळती होती. याचा अर्थ, केस विषाणूच्या डीएनएचे विभाजन करण्याचे काम करते का? तिने आपल्या सर्व गटांना कामाला लावले. काही वर्षांच्या अथक प्रयत्नांनंतर अनेक प्रकारच्या केस प्रथिनांचे कार्य शोधण्यात त्यांना यश मिळाले. त्याच वेळी इतर विद्यापीठांमधूनही काही संशोधक या विषयावर काम करत होते. यावरून असते लक्षात आले की, जीवाणूंमधील प्रतिरक्षाप्रणालीचे अनेक प्रकार होते. जेनिफरने अभ्यासलेली क्रिस्पर/केस ही वर्ग-१ या प्रकारातील होती.

ही एक संयुक्त प्रकारची यंत्रणा असते, ज्यामध्ये विषाणूंना नि:शस्त्र करण्यासाठी अनेक प्रकारच्या केस प्रथिनांची आवश्यकता असते. याउलट वर्ग-२ या प्रकारातील यंत्रणा अगदी थोड्या प्रथिनांनिशी काम करते.

योगायोग असा की, अगदी त्याच वेळी पृथ्वीच्या दुसऱ्या भूभागावर इमॅन्युएल शार्पेंटी यांनी अशाच यंत्रणेचा अभ्यास केला होता. इमॅन्युएल या फ्रान्समधील संशोधक-प्राध्यापक. सूक्ष्म जीवशास्त्र, अनुवंशशास्त्र व जैवरसायन-शास्त्र हे तिचे संशोधनाचे विषय. इमॅन्युएलचा जन्म ११ डिसेंबर १९६८ रोजी पॅरिसजवळील एका छोट्या शहरात झाला. आपल्याला आयुष्यात काय करायचे आहे, याविषयी तिच्या कल्पना लहानपणापासूनच स्पष्ट होत्या. तिला वैद्यकीय क्षेत्रात काही तरी भव्य-दिव्य करून दाखवायचे होते. आई-वडील सामाजिक क्षेत्रात कार्यरत होते. त्यांनी तिला कुठलीही दिशा दिली नाही, पण तिच्या स्वप्नांना नेहमीच पाठिंबा दिला. वैद्यकीय क्षेत्रातील रुचीनेच तिला जीवशास्त्रात आणले. पदवी आणि पदव्युत्तर पदवी तिने पॅरिस येथील पिएर आणि मेरी क्युरी विद्यापीठ (आता सोर्बोन विद्यापीठ) येथे घेतली. पाश्चर इन्स्टिट्यूटमध्ये संशोधन केले. पीएच.डी.साठी प्रतिजैविकांना प्रतिबंध करणाऱ्या रेण्वीयप्रणालीचा अभ्यास केला. पदवीचे शिक्षण घेत असतानाच तिने पाश्चर इन्स्टिट्यूटमधून पीएच.डी. करण्याचे ठरवले होते. मूलभूत विज्ञान संशोधन क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणून ती उदयास आली होती. तसेच त्या संस्थेत प्रतिजैविकांना प्रतिबंध करण्याच्या जीवाणूंच्या क्षमतेवर संशोधन चालू होते. तिचा विभाग हा 'तरुण आणि मजेशीर' म्हणून ओळखला जायचा. याच संस्थेतील एका प्रयोगशाळेचे नेतृत्व करण्याची मनीषा तिने बाळगली होती. यासाठी संशोधनाचा चांगला अनुभव असण्याची गरज होती. तिने १९९३ ते १९९५ या काळात पिएर व मेरी क्युरी विद्यापीठात अध्यापन सहायक म्हणून काम केले आणि त्यानंतर १९९५-१९९६ मध्ये पाश्चर इन्स्टिट्यूटमध्ये संशोधक म्हणून काम केले. इमॅन्युएलने अमेरिकेतील पन्नासएक प्रयोगशाळांना पत्रे लिहिली आणि उत्तरादाखल तिला अनेक ठिकाणांहून नियुक्ती करणारी पत्रे मिळाली. त्या सर्व पत्रांमधून तिने रॉकफेलर विद्यापीठ, न्यूयॉर्क येथील डॉ.एलेन टूमानेन यांच्या प्रयोगशाळेची निवड केली. ती अमेरिकेस १९९६ ला रवाना झाली. तेथे तिने स्ट्रेप्टोकॉकस न्युमोनिया (streptococcus pneumonia) या जीवाणूंचा अभ्यास केला. न्युमोनिया, मेंदूदाह यांसारख्या आजारांना हा जीवाणू कारणीभूत ठरतो. या जीवाणूंच्या जनुकीय पदार्थांमध्ये एक अस्थिर घटक असतो, जो सतत फिरत असतो. जीवाणू या घटकावर कसे नियंत्रण ठेवतो, हे अभ्यासण्यासाठी इमॅन्युएलने खूप परिश्रम घेतले. अनेक प्रयोगानंतर जीवाणू वेन्कोमायसिन या अतिशय प्रभावी प्रतिजैविकांवर कसा विजय मिळवतात, याचा उलगडा झाला. टूमानेनने आपली प्रयोगशाळा दुसरीकडे हलवल्यानंतर न्यूयॉर्क विद्यापीठातील 'स्कूल ऑफ मेडिसिन' येथील डॉ.पामेला कोविन (Dr. Pamela Cowin) यांच्या प्रयोगशाळेत इमॅन्युएल दाखल झाली. तिथे तिने सस्तन प्राण्यांतील गुणसूत्रांचा अभ्यास केला. पामेलाच्या आठवणीप्रमाणे, 'इमॅन्युअलकडे विशेष लक्ष द्यावे लागत नसे. आपल्या निरीक्षणांबाबत बाबतीत ती अतिशय दक्ष असे. तसेच अतिशय तपशीलवार निरीक्षण नोंदवत असे.'

इमॅन्युएलला आता 'आपली स्वतंत्र प्रयोगशाळा असावी', असे वाटू लागले. तिने युरोपात परतण्याचा निर्णय घेतला. २००२ मध्ये व्हिएन्ना विद्यापीठातील 'इन्स्टिट्यूट ऑफ मायक्रोबायोलॉजी अँड जेनेटिक्स' या संस्थेत प्रयोगशाळा-प्रमुख व अभ्यागत प्राध्यापक म्हणून रुजू झाली. एका तेथे तिने सात वर्षे काम केले. तिच्यासाठी तो काळ भारलेला होता. जनुक नियंत्रणामध्ये आरएनएचे महत्त्व समजले होते. त्यासाठी तिला निधीही मिळाला. जीवाणूंची घातकता (दुसऱ्या जीवास संसर्गित करण्याची क्षमता) ठरवणाऱ्या घटकाची निर्मिती करणाऱ्या आरएनए रेणूचा तिने शोध लावला. हे तिचे संशोधन २००४ मध्ये प्रकाशित झाले. इमॅन्युएलला स्ट्रेप्टोकॉकस पायोजेनेस या जीवाणूंमधील नियामक आरएनएची निर्मिती करणारे जनुकीय स्थान शोधण्यात रस होता. या कामे तिने जैव सूचना तंत्रज्ञानाची (Bioinformatics) मदत घेण्याचे ठरवले. यासाठी तिने जर्मनीतील 'मॅक्स प्लॅन्क इन्स्टिट्यूट फॉर इन्फेक्शन बायोलॉजी' येथील सूक्ष्म जीव शास्त्रज्ञ डॉ.जॉर्ग वोगेल (Dr.Jorg Vogel) यांच्याशी संधान बांधले. त्यांनी पायोजेनेसमधील सर्व आरएनए रेणूंचा आराखडा २००८ मध्ये तयार केला. सन २००४ ते २००६ या काळात तिने 'सूक्ष्म जीवशास्त्र व प्रतिरक्षा विज्ञान' विभागात प्रयोगशाळा प्रमुख व प्राध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर २००९ पर्यंत 'मॅक्स एफ पेरूट्झ लॅबोरेटरी'मध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. स्वीडनमधील उमेअ विद्यापीठातील 'लॅबोरेटरी फॉर

मॉलेक्युलर इन्फेक्शन मेडिसिन'मध्ये प्रयोगशाळा प्रमुख व प्राध्यापक म्हणून तिची २००९ मध्ये नियुक्ती झाली आणि ती तेथे दाखल झाली.

व्हिएन्नात असतानाच ती क्रिस्परविषयी विचार करू लागली. त्या काळी हा विषय फारसा प्रचलित नव्हता. अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच सूक्ष्म जीवशास्त्रज्ञ या संशोधनात गुंतलेले होते. इमॅन्युएलच्या गटास असे निदर्शनास आले की, विशिष्ट प्रकारचे आरएनएचे रेणू विपुल प्रमाणात असतात. त्यांना त्यांनी ट्रान्स ॲक्टिव्हेटिंग क्रिस्पर आरएनए (ट्रॅकआर-आरएनए) असे नाव दिले. इमॅन्युएलच्या सूचना तंत्रज्ञानानुसार या रेणूंचा क्रम आणि जनुकीय स्थान क्रिस्परशी साधर्म्य दाखवणारे होते. त्यांच्या लक्षात आले की, हे नवे आएनएसुद्धा क्रिस्पर प्रणालीशी संबंधित आहेत. हे जिगसॉ पझलचे तुकडे एकमेकांशी जुळल्याप्रमाणे होते. ही प्रणाली वर्ग-२ या प्रकारची होती, ज्यामध्ये एकाच प्रकारचे केस-९ प्रथिन आवश्यक असते. आता इमॅन्युएलच्या गटाने अनेक प्रयोग केले आणि या प्रणालीमध्ये तीन घटक असतात, याचा त्यांना शोध लागला. ट्रॅकआर-आरएनए, क्रिस्पर-आरएनए आणि केस-९ प्रथिन. हे संशोधन विस्मयकारी होते. कारण आत्तापर्यंतच्या क्रिस्पर प्रणालीमध्ये फक्त एक आरएनए रेणू आणि अनेक प्रथिने गुंतलेली असत. इमॅन्युएलने असे गृहीतक मांडले की, हे दोन प्रकारचे आरएनए रेणू एकत्रितपणे केस-९ प्रथिनास मार्गदर्शन करण्याचे काम करतात. पण ही कल्पना क्रांतिकारक आणि मूलगामी होती, त्यामुळे स्वीकारण्यास जड होती. कारण तोवरच्या अभ्यासानुसार अशा प्रकारची संघभावना प्रथिनांमध्ये दिसून येते व आरएनए सांघिक पद्धतीने काम करताना दिसले नव्हते. पण इमॅन्युएल चाकोरीबाहेरचा विचार करण्यासाठीच मशहूर होती. एक दिवस हे एक अतिशय प्रभावी साधन म्हणून विकसित होईल, आणि हे घटक योग्य प्रकारे नियंत्रित केल्यास विशिष्ट ठिकाणी डीएनएला छेद देऊन त्यामध्ये इच्छित बदल करणे शक्य होईल असा तिचा होरा होता. इमॅन्युएलला आपली कल्पना विद्यार्थ्यांच्या गळी उतरवणे आणि या दोन्ही आरएनए रेणूंची आंतरप्रक्रिया अभ्यासण्यासाठी प्रयोगाची रचना करणे खूप अवघड गेले. पण एलिट्झा डेल्टचेव्हा (Eltiza Deltcheva) हे शिवधनुष्य पेलण्यास तयार झाली. २००९ च्या उन्हाळ्यात एके दिवशी संध्याकाळी आठ वाजता एलिट्झाने तिला फोन केला आणि आपला प्रयोग यशस्वी झाल्याची बातमी दिली. या बातमीने सहाजिकच इमॅन्युएल उत्तेजित झाली. तिने ही बातमी जॉर्गला सांगितली. त्यांना कल्पना होती की, त्यांचे हे संशोधन क्रांतिकारक होते. पण आणखी बऱ्याच प्रश्नांची उत्तरे शोधायची होती. त्यांनी जवळजवळ वर्षभर अनेक प्रयोग केले आणि त्यानंतरच आपले संशोधन प्रकाशित केले.

क्रिस्परच्या छोट्या वर्तुळात इमॅन्युएल अगदीच अपरिचित होती. ऑक्टोबर २०१० मध्ये वागेनिंगेन (Wageningen) नेदरलँड्स येथे भरलेल्या क्रिस्पर सभेत तिने आपले संशोधन सादर केले. या सभेचे आयोजक डॉ.जॉन वान दर उस्ट (Dr. John van der Oost) यांनी तिच्या संशोधनाचे खूप कौतुक केले.

आता तिच्यापुढे प्रश्न होता- ही द्वि आरएनए प्रणाली डीएनए विभाजनाची प्रक्रिया नेमकी कशी पार पाडते? तिला सूक्ष्म जीवशास्त्राचा प्रचंड अनुभव होता आणि ती त्यामध्ये तज्ज्ञ होती. पण आता क्रिस्पर/केस-९ प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी जैवरसायनशास्त्रज्ञाची आवश्यकता होती. सहाजिकच तिच्यासमोर पहिलं नाव होतं जेनिफर डाउडना.

'अमेरिकन सोसायटी फॉर मायक्रोबायोलॉजी'ने पुएर्तो रिको येथे २०११ मध्ये आयोजित केलेल्या परिषदेत आपले संशोधन सादर करण्यासाठी इमॅन्युएलला निमंत्रित केले गेले. तेव्हा हे निमंत्रण स्वीकारण्यामागे जेनिफरची भेट घेणे हेही तिचे उद्दिष्ट होते. अगदी योगायोगाने एकदा कॅफेमध्ये त्या दोघींची भेट झाली. जेनिफरच्या सहकाऱ्याने त्या दोघींची ओळख करून दिली. त्या दोघींनी दुसऱ्या दिवशी एकत्र त्या शहराची सफर करण्याचे ठरवले. रस्त्यावरून फेरफटका मारत असतानाच त्यांनी आपल्या संशोधनाविषयी चर्चा केली. क्रिस्पर/केस-९ या वर्ग दोन प्रकारातील तुलनेने साध्या प्रणालीचा अभ्यास करण्यात जेनिफरला कितपत रस असेल, याविषयी इमॅन्युएल साशंक होती. पण सहयोगाच्या कल्पनेनेच जेनिफर उत्तेजित झाली.

जेनिफर व तिचा चमू कॅलिफोर्निया येथून आणि इमॅन्युएल व कंपनी स्वीडन येथे- अशा या आगळ्यावेगळ्या गटाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने दूरदृश्य पद्धतीने अनेक वेळा चर्चा करून आपल्या प्रयोगाची योजना आखली. त्यांच्या तर्कानुसार क्रिस्पर-आरएनए विषाणूचा डीएनए ओळखतो आणि केस त्याचे विभाजन करतो. पण त्यांनी केलेल्या प्रयोगांमध्ये अपेक्षित परिणाम दिसला नाही. विषाणूचा डीएनए- बापुडा अगदी सुरक्षित होता. आता दोन शक्यता

होत्या. एक- त्यांच्या प्रयोगात काही तरी दोष असला पाहिजे. किंवा दुसरी शक्यता अशी की- केस-९ चे कार्य वेगळे असले पाहिजे. अनेक प्रयोगांची अपयशी मालिका आणि प्रचंड चर्चा व वाद-विवादानंतर त्यांनी आपल्या प्रयोगांमध्ये ट्रॅकआर-आरएनएचा समावेश केला आणि त्यांना अपेक्षित यश मिळाले. हे संशोधन आश्चर्यकारक होते. जीवाणूने विषाणूविरोधी विकसित केलेले शस्त्र म्हणजे जनुकीय कात्री प्रभावी तर होतेच, पण हुशारसुद्धा होते.

एवढ्यावरच थांबले, तर ते संशोधक कसले! आता त्यांनी नव्या क्रांतिकारी प्रयोगाची रचना केली. ट्रॅकआर-आरएनए आणि क्रिस्पर-आरएनए यांच्या एकत्रीकरणातून एकच रेणू तयार केला आणि त्याला मार्गदर्शक-आरएनए (Guide RNA) असे संबोधन दिले. आता या कात्रीचा वापर करून डीएनएला निवडक ठिकाणी छेद देता येईल का, हे पाहायचे होते. थोडक्यात, जनुकीय कात्रीचे कार्य नियंत्रित करायचे होते. त्यासाठी त्यांनी जेनिफरच्या प्रयोगशाळेत उपलब्ध असलेल्या एका जनुकाची निवड केली आणि छेद देण्यासाठी त्यावरील पाच ठिकाणे निश्चित केली. आता कात्रीच्या क्रिस्पर भागामध्ये बदल करून ज्या ठिकाणी छेद द्यायचा आहे, त्या भागाच्या जनुकीय सांकेतनाशी पूर्णपणे जुळणारे क्रिस्परचे सांकेतन केले आणि त्यांना जबरदस्त यश मिळाले. डीएनएला बरोबर निवडक ठिकाणी छेद गेला होता. मार्गदर्शक- आरएनए डीएनएशी जोडला जाऊन जेथे छेद द्यायचा आहे, ते स्थान ओळखतो आणि केस-९ हे विकर बरोबर त्या ठिकाणी देतो. जेनिफर आणि इमॅन्युएलने क्रिस्पर/केस-९ जनुकीय कात्रीविषयीचे संशोधन २०१२ मध्ये प्रकाशित केले. या संशोधनासाठी जेनिफर डाउडना आणि इमॅन्युएल शार्पेटी यांना २०२० च्या रसायनशास्त्र विषयाचे नोबेल पारितोषिक जाहीर झाले.

जेनिफर आणि इमॅन्युएल यांनी आपले संशोधन प्रकाशित केल्यानंतर अनेक संशोधक याकडे वळले आणि त्यांनी उंदिर व मानवामधील जनुकांमध्ये बदल करता येईल, हे दाखवून दिले. यापूर्वी जनुकांमध्ये बदल करणे खूपच वेळखाऊ आणि बऱ्याचदा अशक्य कोटीतील प्रकरण होते. पण या नव्या कात्रीमुळे काम सोपे झाले. हव्या त्या ठिकाणी डीएनएला छेद द्यायचा आणि जखम भरून काढण्याच्या पेशीच्या क्षमतेचा वापर करून नवे जनुक किंवा जनुके त्या ठिकाणी समाविष्ट करून संपादित जनुके निर्माण करणे शक्य झाले. हे साधन वापरण्यास सुलभ असल्याने त्याचा खूप लवकर प्रसार झाला. वनस्पतीमधील सदोष जनुके काढून टाकण्यासाठी याचा वापर करता येतो. याचा वापर करून संशोधकांनी तांदळातील मातीतून जड धातू शोषून घेण्याची क्षमता देणाऱ्या जनुकात बदल केला. त्यामुळे घातक कॅडमियम, आर्सेनिकचे प्रमाण कमी असणाऱ्या चांगल्या दर्जाच्या तांदळाची निर्मिती झाली. तसेच या तंत्राचा वापर करून कोरड्या व उष्ण हवामानात टिकणारी पिके तसेच कुठल्याही किडीला बळी न पडणारे वाण विकसित करणे शक्य झाले आहे. त्यामुळे घातक कीडनाशकांचा वापर कमी होईल. वैद्यकीय क्षेत्रासाठीही हे संशोधन खूप महत्त्वाचे आहे. रोगकारक जनुके काढून टाकून अनेक आनुवंशिक रोगांवर उपचार व प्रतिबंध करण्यासाठी या तंत्राचा उपयोग होऊ शकतो. त्या दिशेने आता संशोधन चालू आहे.

या तंत्राचा गैरवापर होण्याचाही धोका आहे. जनुकीय संपादनाच्या या प्रक्रियेने शास्त्रीय वर्तुळात नैतिकतेचे अनेक मुद्दे उपस्थित झाले आहेत. हे तंत्र वापरून संपादित बाळ (डिझाइनर बेबी) जन्माला घालण्याचा प्रकार होऊ शकतो. (चीनचे वैज्ञानिक जीआनकुई यांनी हा प्रयोग २०१८ मध्ये करून संपादित बाळ जन्माला घातले व त्यावर जगभरातून टीका झाली होती). जनुकीय अभियांत्रिकीचा मानवावर वापर करण्यावर नियंत्रण करणारी नियमावली आहे. त्यानुसार पुढच्या पिढीत संक्रमित होणारे जनुकीय बदल करण्यावर बंदी आहे.

जेनिफरने क्रिस्परसंबंधी नैतिकतेवर टेड टॉक (TED Talk) मध्ये २०१५ ला व्याख्यान दिले. नोबेल पारितोषिक जाहीर झाल्यानंतर तिने 'या तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या कारणासाठी व्हावा आणि मानवाला त्यातून लाभ व्हावा', अशी अपेक्षा व्यक्त केली. क्रिस्परचे फायदे आणि दोष यांचे विवेचन करणाऱ्या 'अ क्रॅक इन क्रिएशन' या पुस्तकाची ती सहलेखिका आहे.

जेनिफर व इमॅन्युएलने केलेल्या संशोधनकार्याची दखल म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. टाइम मॅगझिनने जेनिफर व इमॅन्युएलचा २०१५ मध्ये जागतिक शंभर प्रभावशाली व्यक्तींमध्ये समावेश केला.

संशोधन क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या तरुण महिला संशोधकांसाठी जेनिफर आणि इमॅन्युअलचे कार्य प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याला सलाम.

**तेजस्विनी देसाई,** कोल्हापूर
tejaswinidesai1970@gmail.com /Mob.9421200644

संगीता नरके




# परिस्थितीला शरण न जाणाऱ्या आयानची कहाणी!!

हे पुस्तक वाचून खाली ठेवलं, त्याला आज दोन दिवस उलटले; पण अजूनही 'आयान'ने मनाला घातलेला वेढा काही सुटत नाही.

इतर धर्मांतील स्त्रियांपेक्षा मुस्लिम स्त्रीचं आयुष्य खूपच बंदिस्त असतं, हे माहीत होतं. पण 'आयान'सोबत तिचं आयुष्य वाचताना मन विदीर्ण होतं. हे वादळी आयुष्य घोंघावत आपल्यावर आदळतं.

जातीय, धार्मिक परंपरांच्या ताणतणावांनी भरलेले लहानपण, धार्मिक रूढींच्या अधीन गेलेले तरुणपण यांमधून स्वतःशीच झगडत, धर्माची चिकित्सा करत, स्वतःलाच प्रश्न विचारत प्राप्त केलेल्या आत्मिक बळानं तिला बंड करण्याचं साहस मिळवून दिलं.

आयान लहानाची मोठी झाली ती इस्लामच्या रूढी–परंपरांच्या सावटाखाली. पण सुस्पष्ट विचारांना अमलात आणण्याचे धाडस तिच्या अंगी आले ते हॉलंडमध्ये भेटलेल्या जोहाना, ॲलन, मार्को व इतर डच स्वावलंबी, मुक्त व स्वतंत्र आचार–विचार असलेल्या लोकांमुळे. तसेच इंग्रजी पुस्तकांच्या माध्यमांतून प्रकर्षाने जाणवलेल्या 'सभ्यता आणि व्यक्तिस्वातंत्र्य' या दोन मूल्यांमुळे.

आयानचा जन्म आफ्रिकेतील अत्यंत गरीब, मागास अशा सोमालिया देशातला. तिचे अबेह (वडील) सोमालियाचा तेव्हाचा हुकूमशहा 'सय्यद बारी' याच्या विरोधातील बंडाचे 'सोमाली मुक्ती संघटने'चे एक अग्रणी! म्हणून कायम दूरच राहिलेले. कधी तुरुंगात, तर कधी भूमिगत, तर कधी देशाबाहेर. त्यामुळे आयानचे कुटुंब सौदी अरेबिया, इथिओपिया आणि केनिया असं फिरस्तीवर राहिलं. तीन मुले व आजी या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या चिंतेने आयानची आई कायम ग्रासलेली. आई व आजी दोघी धार्मिक, रूढी–परंपरेच्या जाळ्यात अडकलेल्या. त्यामुळे आयानचं बालपण करपलेलं. त्यात भर म्हणून आजीने दोघी बहिणींची (आयान व छोटी हवेया) केलेली सुंता (FGM -

आयानने डच लोकसभा निवडणूक जिंकून राजकारणात प्रवेश केला. तिला तीन गोष्टी साध्य करायच्या होत्या. एक म्हणजे– डच लोकांमध्ये हॉलंडमधील मुस्लिम स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविषयी जागृती निर्माण करणे, त्यांना सरकारी संरक्षण मिळवून देणे आणि अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा करणे. दुसरी गोष्ट– म्हणजे इस्लाममध्ये सुधारणा घडवण्याच्या दृष्टीने चर्चा, वादविवाद सुरू करणे. तिसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे– मुस्लिम स्त्रीला तिच्या कोशातून बाहेर काढून, आपल्या अधिकारांसाठी लढा द्यायला प्रवृत्त करणे, प्रतिकार करण्यास शिकविणे. पण हे काम सोपे नव्हते, कारण मुस्लिम स्त्री अत्याचारासंबंधीची आकडेवारीच उपलब्ध नव्हती. खूप मेहनतीने हा मुद्दा तिने सभागृहात मांडला. पुष्कळ चर्चा आणि वादविवादानंतर मुस्लिम स्त्री अत्याचारासंबंधीची नोंद पोलिसांनी करावी, असा ठराव लोकसभेने मंजूर केला.

female genital mutilation). त्याचं वर्णन मनाचा थरकाप उडवणारं, सुन्न करणारं. इस्लाममध्ये हा पावित्र्याचा संस्कार मानला जातो. या वेळी आयान व हवेया होत्या अनुक्रमे अवघ्या पाच व चार वर्षांच्या.

आयानचा संघर्ष सोपा नव्हता. तिचा झगडा जसा इतरांशी होता, तसाच तो स्वतःशी पण होता. नैरोबीमधील मुस्लिम गर्ल्स स्कूलमध्ये 'धर्मशिक्षण' हा अनिवार्य विषय होता. हा विषय शिकविणाऱ्या सिस्टर अजीजांमुळे शाळेतील मुलींमध्ये धार्मिक पुनरुज्जीवनाची एकच लाट उसळली होती. याच्या प्रभावाखाली आयान 'सच्ची' मुस्लिम बनली. ती पायघोळ काळा बुरखा वापरू लागली, रोज प्रार्थना म्हणू लागली, कुराणाचे पठण करू लागली, इतर धर्मीय मुलींना नरक-यातनांपासून वाचविण्यासाठी त्यांना मुस्लिम बनविण्याचा- सच्च्या धर्माचा संदेश देण्याचा प्रयत्न करू लागली. 'स्वर्गप्राप्ती व नरकद्वार' या संकल्पनांनी तिला कब्जात घेतलं होतं. अल्लाहला शरण जाण्याचा हा जणू राजमार्ग तिला सापडला होता.

अशातच आयानला समजलं की, तिच्या वडिलांनी दुसऱ्या बाईशी लग्न केलंय. आयान हादरली. कारण प्रत्येक वेळी लग्न केल्यावर वडिलांनी आधीच्या बायको-मुलांना वाऱ्यावर सोडलं होतं. आयानची आई ही तिच्या वडिलांची दुसरी बायको होती. आता त्यांनी तिसरी बायको केली होती. पण तिला उद्विग्न करणारी गोष्ट ही होती की- तिच्या वडिलांना कोणीही दोष देणार नव्हतं, त्यांना अनेक लग्नं करण्याची मुभा होती. आयाननं ठरवलं, काहीही झालं तरी आपल्या बाबतीत असं काही आपण घडू द्यायचं नाही. धर्मातील ज्या 'आज्ञापालन व शरणागती' या संकल्पनांनी आयानला भुरळ घातली होती, त्यावरच आता प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं. पवित्र कुराणातील नियम आणि रोज नजरेला पडणारं वास्तव यात जमीन-आस्मानाचा फरक आहे, हे आयानला दिसू लागलं होतं. कुराणानुसार कुठल्याही मुस्लिम स्त्रीला प्रेमाचा अधिकार नव्हता, तिला कशाचाही ताबा मिळत नव्हता, तिला निर्णयप्रक्रियेत स्थान नव्हते, तिच्या शब्दाला पुरुषाच्या शब्दाच्या अर्धीच किंमत होती. ती पुरुषाची गुलाम होती. तिच्यासाठी कुराणाशिवाय इतर पुस्तके (कथा, कादंबऱ्या) वाचणे हा धर्मद्रोह होता. स्वतंत्र व्यक्ती म्हणून तिला काहीच स्थान नव्हते, ती केवळ मुलांना जन्म देणारी उपभोग्य वस्तू होती. हदिसच्या म्हणण्यानुसार, अगदी उंटावर स्वार असतानादेखील स्त्रीने नवऱ्याला शरीरसुख दिलं पाहिजे. यात कुठेही प्रेमाची देवाण-घेवाण दिसत नव्हती. ही सगळी वास्तविकता स्त्री-पुरुष समान नाहीत, हेच दर्शवीत होती. या जाणिवांनी आयान भडकून उठली, संतापली. आणि आपल्या धार्मिक श्रद्धांना तर्कांचा आधार आहे का, इस्लामला सत्याचा आधार आहे का- याचा शोध सुरू झाला.

केनियातील सोमाली व पाकिस्तानी तरुणांच्या 'मुस्लिम बंधुभाव चळवळी'शी आयाननं स्वतःला जोडून घेतलं, जे धर्माचा खरा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करीत होते. पण तिथेही तिच्या पदरी निराशाच आली. तिथल्या चर्चाकेंद्रात दैनंदिन जीवनात कसे वागावे- तेही फक्त स्त्रीने, याचे नियम सविस्तरपणे सांगितले जात असत. उदा. समाजातील अनाचार टाळायचा असेल, तर स्त्रीने स्वतःला संपूर्ण झाकून घेतले पाहिजे. तिचे केस, ओठ, डोळे, हनुवटी, नाक, बोटे- इतकेच नाही, तर तिच्या उंच टाचांच्या चप्पल-बुटांच्या आवाजाने, तिने वापरलेल्या साबण/शॅम्पूच्या सुगंधानेसुद्धा पुरुषांची मनं विचलित होऊ शकतात. म्हणून स्त्रीने नेहमी घरातच बसावे. पुरुषांच्या मनात पापभावना निर्माण झाली, तर त्याला सर्वस्वी स्त्रीच जबाबदार असते. आणखी एक गोष्ट तिच्या लक्षात आली होती.

या चळवळीतील सर्वांची खात्री पटली होती की, इस्लामला नष्ट करण्यासाठी जगभरातल्या दुष्ट शक्तींनी (ज्यू व पश्चिमी देश) युद्ध पुकारलं असून, इस्लामचं रक्षण करायचं असेल तर जिहादमध्ये सामील झालंच पाहिजे. 'संपूर्ण जगात इस्लामचं राज्य निर्माण करायचं' या ध्येयाने सारे प्रेरित झाले होते. तिला जाणवले की, धर्माच्या चिकित्सेपेक्षा- तर्कशुद्धतेपेक्षा सोईस्करपणाला अधिक महत्त्व दिलं जातंय. म्हणून तिनं या चर्चासत्रांना जाणं सोडून दिलं.

प्रेमविवाह म्हणजे मूर्खपणा, शरीरसंबंध वाईट, प्रेमभावना जागृत होणे म्हणजे पाप- या किशोरवयीन आयानच्या धारणा पक्क्या होत्या. पण त्याच वेळी ती वाचत असलेल्या इंग्रजी कादंबऱ्यांमधील नायिका प्रेमात पडायच्या, प्रेमाखातर त्या घरच्यांशी लढायच्या. आर्थिक व सामाजिक भेद त्यांच्या गावीही नव्हते आणि महत्त्वाचे म्हणजे, त्या आपल्या पसंतीच्या पुरुषाबरोबर लग्न करायच्या. आयान म्हणते- या पुस्तकांमधील नैतिक पेच रोचक तर होतेच, पण त्यांची उत्तरेही तर्कसंगत होती. हदिस वाचण्यापेक्षा ही पुस्तके वाचणे तिला आवडत होते.

तारुण्यसुलभ प्रेमभावना आयानलाही खुणावत होतीच.

तिच्या धार्मिक धारणा आणि तिचे विचार यात द्वंद्व सुरू झाले. ती म्हणते– माझं मनोविश्व जणू दुभंगल्यासारखं झालं होतं. तिला आई–वडिलांनी निवडलेल्या अनोळखी पुरुषाबरोबर लग्न करायचं नव्हतं. तिलाही प्रेमात पडायचं होतं– जो तिला समजून घेईल, जो तिच्यावर मनापासून प्रेम करेल, ती वाचत असलेल्या पुस्तकातील नायकाप्रमाणे प्रियाराधन करेल, अशा नायकाची तिला ओढ होती. आस होती. तिच्या लक्षात आलं, आपली सुंता जरी झाली असली तरी शरीरसुखाविषयीची आपली इच्छा कमी वा नष्ट झालेली नाही. महमूदबद्दल तिला वाटणारी ओढ म्हणजे केवळ शारीरिक आकर्षण होते आणि तेवढ्यासाठीच तिने महमूदशी चोरून लग्न केले. महमूदने प्रणयाराधन केले नाही. तिने असे करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा महमूदने 'तुला याचा पूर्वानुभव आहे का?' असे विचारले. आपण 'पाक' नाही असा महमूदने गैरसमज करून घेऊ नये, म्हणून तिने माघार घेतली. सगळा एकतर्फी मामला झाला होता. तिची घोर निराशा झाली होती. तिची सुंता झालेली असल्याने तिला मरणप्राय वेदना सहन कराव्या लागल्या होत्या. तिला या संबंधातून काही आनंद वा सुख अजिबात मिळाले नव्हते. दुसऱ्या दिवशी महमूद नोकरीकरता रशियाला निघून गेला तो कायमचाच.

अंतर्गत यादवी युद्धाने सोमालिया धुमसत असताना, तिथून स्वतःची सुटका करून घेऊन केनियाच्या सरहद्दीवर आलेल्या निर्वासितांना केनियात प्रवेश करण्यास मदत करणारी आयान... एकट्या–दुकट्या निर्वासित स्त्रीवर केनियन सैनिकांकडून होणाऱ्या अत्याचाराने पिळवटून निघणारी आयान... मरणासन्न बाळाला वाचविण्यासाठी झटणारी आयान... आईचा विरोध डावलून आपल्या अनौरस मुलाला एकटीने सांभाळणाऱ्या फौजियाला जिला सर्व सोमालींनी बहिष्कृत केले होते, तिला निग्रहाने घरी आश्रय देणारी आयान खूपच भावते.

धर्मानुसार स्त्री ही चंचल वृत्तीची असते, तिला तर्कनिष्ठ राहता येत नाही. तिच्या मनावर अदृश्य शक्तींचा ताबा असतो म्हणून ती योग्य निर्णय घेऊ शकत नाही आणि म्हणूनच मुलीचे लग्न ठरविण्याचा अधिकार फक्त तिच्या वडिलांना किंवा घरातील इतर पुरुषांनाच होता, हे आयान जाणून होती. परंतु आपल्या वडिलांनी केवळ दोन तासांपूर्वी मशिदीत भेटलेल्या कॅनडाच्या ओसमान मुस्साशी आपलं लग्न ठरवलंय, हे ऐकून ती भयंकर घाबरली. तरीही तिने 'हे लग्न मला करायचं नाही, मी निकाहला येणार नाही' असं आपल्या वडिलांना ठासून सांगितलं. वडील शांतपणे म्हणाले, 'तुझी गरज नाही.' आणि इस्लामी कायद्यानुसार आयानच्या अनुपस्थितीत तिचा निकाह पार पडला.

लग्नानंतर ओसमान मुस्सा कॅनडाला निघून गेला. आयानकडे कॅनडियन व्हिसा नव्हता. तो मिळायलाही फार वेळ लागणार होता. म्हणून तिने जर्मनीमार्गे कॅनडाला जावे, असे ठरले. जर्मनीत आपल्या चुलत्यांकडे आल्यावर तिने पाहिलं– तिथं कसल्याच प्रकारचं सामाजिक बंधन नव्हतं. स्त्री–पुरुषांच्या वागण्या–बोलण्यात खुलेपणा होता. स्त्रियांनी तोकडे कपडे घातले म्हणून त्यांना कोणी वेश्या म्हणत नव्हतं, की कोणी पुरुष लंपटपणा करत नव्हता, की अनाचारही माजला नव्हता आणि मुख्य म्हणजे, तरीही तिला तिथं सुरक्षित वाटत होतं. इथंच तिला नको असलेल्या लग्नातून सुटका करून घेण्याचा मार्ग सापडला. तो म्हणजे, हॉलंडला जाण्याचा मार्ग.

हॉलंडच्या निर्वासितांच्या छावणीत असताना धर्ममार्तंडांना शांत पण निर्भीडपणे तोंड देत तिच्या अनुपस्थितीत तिच्या मनाविरुद्ध झालेला निकाह नाकारत, धर्माच्या बेड्या तोडत तिनं घेतलेला 'स्व'चा शोध आणि केवळ स्त्री म्हणून नव्हे तर माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळविण्यासाठी दिलेला लढा असामान्य तर आहेच, पण तितकाच प्रेरणादायीही आहे. अवघ्या बाविसाव्या वर्षी आयाननं आपल्या नव्या आयुष्याकडे झेप घेतली. जर्मनीतून थेट हॉलंड गाठलं. हॉलंडमधील निर्वासितांच्या छावणीत प्रवेश मिळविला. डच भाषा शिकून घेतली. दुभाष्याचं काम करता–करता विद्यापीठातून राज्यशास्त्राची पदव्युत्तर पदवी मिळवली, इतिहासाचा अभ्यास केला.

आयानवर हॉलंडमधील सामाजिक–सांस्कृतिक वातावरणाचा खूप मोठा प्रभाव आहे. ती म्हणते, ''हॉलंड म्हणजे 'मुक्त विचारांचे माहेरघर' होते, प्रत्येक व्यक्तीला समान सामाजिक दर्जा आणि विचारस्वातंत्र्य बहाल करणाऱ्या या देशात ईश्वराच्या अस्तित्वाला आव्हान देण्याची वा धर्माची तर्कशुद्ध चिकित्सा करण्याची मुभा होती.'' इथल्या शांत, सुखी आयुष्याने आयानला भुरळ तर घातलीच; पण धर्माने लादलेल्या वेदना, छळ, दुःख, अत्याचार आणि अज्ञानाचे होणारे भयंकर परिणाम यांची तीव्र जाणीवही करून दिली. हॉलंडमधील स्त्रिया शिकत होत्या, नोकरी करीत होत्या, स्वतःच्या मनाप्रमाणे खर्चही

करित होत्या, प्रवास करीत होत्या, मालमत्ता खरेदी करीत होत्या आणि आवडीच्या पुरुषाशी लग्नही करीत होत्या. पण हॉलंडमध्ये राहणारी मुस्लिम स्त्री यापैकी काहीही करू शकत नव्हती, याचे तिला दुःख होते. त्यासाठी तिची तगमग होत होती.

अशा स्थित्यंतराच्या काळात तिला एका कौटुंबिक दुःखाला सामोरे जावे लागले– हवेया या तिच्या लहान बहिणीचा मृत्यू. हुशार, प्रामाणिक, लढाऊ बाण्याची, कणखर, बुरख्याला हिडीस समजणारी. आईच्या इच्छेपुढे मान न तुकवणाऱ्या हवेयाच्या अकाली जाण्याने आयानचा पूर्वायुष्याचा उरलासुरला धागाही तुटला होता. हवेयाच्या मानसिक आजाराचं कारण लहानपणी भोगलेल्या यातना, दुःख यामध्येच असावं, असं आयानला वाटतं.

कुराणाच्या अभ्यासांती अखेर आयानने 'ईश्वर आणि त्याची सत्ता' या संकल्पनेलाच छेद दिला. ती इस्लाम व कुराणावर चिकित्सक लेख लिहू लागली. धार्मिक मूलतत्त्ववाद, इस्लाम व स्त्रियांचे अधिकार यावर स्फोटक भाषणे देऊ लागली. तिला टीव्ही व वृत्तपत्रांतून प्रसिद्धी मिळू लागली. स्त्री–पुरुष समानतेचे मूल्य रुजवायचे असेल, तर कुराणावर आधारित शाळा बंद करून त्यांची सरकारी मदत बंद करण्याचे आवाहन करू लागली. फक्त मुस्लिम शाळा बंद करणे हे भेदाभेद केल्यासारखे होईल, म्हणून सर्वच धर्माधारित शाळांची सरकारी मदत बंद करण्याबाबत व घटनेचं संबंधित कलमच रद्द करण्यात आलं पाहिजे, अशी भूमिका तिने मांडली.

आयानने डच लोकसभा निवडणूक जिंकून राजकारणात प्रवेश केला. तिला तीन गोष्टी साध्य करायच्या होत्या. एक म्हणजे– डच लोकांमध्ये हॉलंडमधील मुस्लिम स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविषयी जागृती निर्माण करणे, त्यांना सरकारी संरक्षण मिळवून देणे आणि अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा करणे. दुसरी गोष्ट– म्हणजे इस्लाममध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने चर्चा, वादविवाद सुरू करणे. आणि तिसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे– मुस्लिम स्त्रीला तिच्या कोशातून बाहेर काढून, तिला आपल्या अधिकारांसाठी लढा द्यायला प्रवृत्त करणे, प्रतिकार करण्यास शिकविणे. पण हे काम सोपे नव्हते, कारण मुस्लिम स्त्री अत्याचारासंबंधीची आकडेवारीच उपलब्ध नव्हती. खूप मेहनतीने आपला मुद्दा तिने सभागृहात मांडला. पुष्कळ चर्चा आणि वादविवादानंतर मुस्लिम स्त्री अत्याचारासंबंधीची नोंद पोलिसांनी करावी, असा ठराव लोकसभेनं मंजूर केला; पण प्रायोगिक तत्त्वावर फक्त दोनच पोलीस विभागांत तो लागू झाला. (हॉलंडमध्ये एकूण पंचवीस विभाग आहेत). आकडेवारी प्रसिद्ध होताच आयानला देशभरातून पाठिंबा मिळाला. (अर्थात त्यातील बहुसंख्य डच होते).

आता आयानने आपली मोहीम आणखी धारदार बनविली. आपले प्रत्येक म्हणणे तिने कुराणातील दाखले देऊन सिद्ध केले होते. 'प्रेषित मुहम्मद कोण होते?' या तिच्या लेखाने मुस्लिम जगात खळबळ माजली. तिला जीवे मारण्याच्या धमक्या येऊ लागल्या. तिचे चारित्र्यहनन केले जाऊ लागले. धर्माने स्त्रियांवर लादलेली गुलामी, दडपशाही, जुलूमशाही याचे पुरावे मांडून ती धर्माची कठोर चिकित्सा करू लागली. अशा वातावरणात तिने याच विषयावर थिओ व्हॅन गॉग या डच निर्माता–दिग्दर्शक मित्राच्या मदतीने एक लघुपट तयार केला शरणागती (Submission). याची किंमत थिओला आपल्या मृत्यूने चुकवावी लागली. मुस्लिम जिहादींनी त्याची क्रूर हत्या केली. डच सरकारने आयानला दिलेल्या कडक सुरक्षा–व्यवस्थेमुळेच ती सुरक्षित राहिली होती.

इस्लामिक मूलतत्त्ववादाला तिनं दिलेलं खुलं आव्हान व त्यामुळे 'थिओ व्हॅन गॉग' या मित्राची अतिरेक्यांनी केलेली हत्या, आपल्या राजकीय अस्तित्वाला निर्माण झालेला धोका आणि नागरिकत्व रद्द होण्याची समोर उभी ठाकलेली भीती– या सगळ्याला तिनं धीराने तोंड तर दिलंच; पण पाशवी रूढी, परंपरावादी इस्लामनं स्त्रीच्या स्वातंत्र्यावर, तिच्या तन–मनावर ठोकलेल्या बेड्या तोडण्यासाठीचा आपला लढा आयाननं निर्धाराने पुढे चालूच ठेवला.

आयानची लेखनशैली प्रवाही आहे. तिचा सुन्न करणारा जीवनप्रवास थेट काळजाला भिडतो. कुठेही आत्मप्रौढी जाणवत नाही. आयान आपल्या चुकाही प्रांजळपणे कबूल करते. आपल्या परिघाबाहेर जाऊन आपल्या वैचारिक कक्षा रुंदावण्यास हे आत्मचरित्र मोलाची मदत करते.

**संगीता हरी नरके,** पुणे
sangitanarke@gmail.com

**इन्फिडेल : माझी जन्मकहाणी**
लेखिका : आयान हिरसी अली । अनु. नीला चांदोरकर
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,
पृष्ठे ४६६, किंमत रु. ४१०/–

अपर्णा दीक्षित

# समारोप : उत्तरार्ध

स्त्रियांची भाषा असं म्हणत असताना इतर जेन्डर आयडेन्टिटीचे प्रश्नही त्यात सामावलेले असतात. विविध प्रकारच्या वंचितपणाला सामोरं जावं लागणाऱ्या सगळ्यांच्या भाषेचे ते प्रश्न असतात, हे आपण मागच्या लेखात पाहिलं. त्याचबरोबर, स्त्रियांचा म्हणवला जाणारा गटही एकसंघ नसतो, हे लक्षात घेतलं पाहिजे.

स्त्रिया आणि भाषा यांचे काही बाबतीत चक्रावून टाकणारे नाते आहे. बहुतेक स्त्रिया अशी भाषा वापरतात जी त्यांच्या समाजात, वर्तुळात 'सभ्य', 'सन्माननीय' समजली जाते. स्त्रीने 'असभ्य', 'अश्लाघ्य' भाषा वापरणे हे एक प्रकारचे चारित्र्यहनन समजले जाते. भाषेच्या बाबतीत बरोबर काय व चूक काय; याचे नियम जिथे ठरले आहेत, तिथे स्त्रिया बहुतेकदा 'बरोबर' पर्यायाची निवड करतात. त्यामुळे पठडीतली भाषा वापरण्याकडे स्त्रिया जास्त कल दाखवतात, असे अनेक अभ्यासातून समोर आले आहे. मात्र ज्या गोष्टींसाठी भाषेचे नियम नाहीत, तिथे स्त्रिया जास्त सर्जनशीलपणे व चतुराईने भाषा वापरताना दिसतात. त्याचबरोबर वैशिष्ट्यपूर्ण, आगळ्या-निराळ्या शब्दांची जास्तीत जास्त भर भाषेत स्त्रियांकडूनच घातली जाते, असंही दिसून येतं. ज्या स्त्रियांचा भाषेचा वापर मर्यादित आहे (सभ्य, नियमाला धरून) त्यांनीच भाषा सर्जनशील, प्रवाही ठेवावी (नवे शब्द, नवे नियम) याला Gender-paradox in language म्हणून ओळखलं जातं. विल्यम लोबव या सामाजिक भाषातज्ज्ञाने मांडलेले हे सूत्र खूप गाजले आणि आजही ते महत्त्वाचे मानले जाते.

स्त्रियांच्या भाषेचा वापर त्यांच्या चारित्र्याशी, खाजगी आयुष्याशी जोडला जाणे हे toxic masculinity चाच एक आविष्कार आहे. मोकळं-ढाकळं बोलणारी, मोकळेपणानं आपलं मत मांडणारी स्त्री, संभाषणात 'पुरुषी' म्हणून ओळखली जाते. तर कधी त्यापुढे जाऊन बोलण्यातला स्पष्टपणा, मोकळेपणा याची स्वभावाशी गल्लत केली जाते.

भाषेची स्थित्यंतरं शेकडो वर्षांपासून होत आलेली आहेत, पुढची शेकडो वर्षे होणार आहेत. आपल्याला उपलब्ध असलेली भाषा त्या भाषेचे केवळ एक प्रारूप (version) आहे. ज्या शुद्ध-अशुद्ध च्या संकल्पनांना कवटाळण्यात इतकी ऊर्जा खर्च होते आहे, ते संदर्भ काही काळाने अप्रस्तुत ठरणार आहेत. अर्थात पैसा, मालमत्ता, नावलौकिक या सगळ्यांप्रमाणे भाषाही एक सत्तेचं रूप आहे. त्यामुळे भाषेबद्दलची कितीही व्यापक समज अंगिकारली तरी हे सत्तासंघर्ष अटळ आहेत. विशेषत: कोणते तरी एक वंचितपण ज्यांच्या वाट्याला आले आहे, त्यांना या लढाईत भाग घेण्याशिवाय पर्याय नाही. आज स्त्रिया आणि पुरुष यांच्या भाषेच्या वापराचे, त्यातल्या सूक्ष्म फरकांचे अभ्यास करणाऱ्या पहिल्या पिढीतल्या स्त्री-अभ्यासकांचा प्रवास पाहिल्यावर हे लगेच लक्षात येते.

मोकळेपणाने बोलणारी म्हणजे अवेलेबल, चारित्र्यहीन इथपर्यंत समज करूनही घेतले जाते. आपल्या सगळ्यांना असे प्रसंग पहायला, अनुभवायला मिळत असतात. अनेकदा, संभाषणात इतर सर्व पुरुष असतील तर अशी स्त्री अडचणीची वाटते. बायकांनी शिव्या देणे, शिवराळ बोलणे तर फारच चूक मानले जाते. असे बोलणे केवळ रागाचा स्फोट होत असेल तरच स्त्रिया वापरताना दिसतात. ज्याबद्दल नंतर अनेकदा त्यांना कमीपणा वाटतो, किंवा अपमानित वाटते, वा अनेकदा भाषेचा असा उग्र वापर केल्याने संभाषणातून सपशेल माघार घ्यावी लागते. अशा स्पष्ट बोलणाऱ्या स्त्रियांमुळे आपल्या बोलण्यावर, व्यक्त होण्यावर मर्यादा येतात, असंही वाटून घेणारे पुरुष आहेत.

या सर्व गुंतागुंतीच्या सांस्कृतिक-सामाजिक परिस्थितीत स्त्रिया शब्दांची, वाक्यरचनेची निवड करताना अनेक दोर ताणून धरत असतात. एकीकडे तुम्हाला आत्मविश्वास असणारी व्यक्ती दिसायचे असते, तर दुसऱ्या बाजूला सतत आपल्या चारित्र्याची कळत-नकळत परीक्षा होऊ नये, अशीही मनापासून इच्छा असते. विशेषत: कामाचे ठिकाण पुरुषप्रधान असेल किंवा घरात पुरुषांचा वरचष्मा असेल तर आपण स्त्री 'असूनही' कमी नाही, हे सिद्ध करण्यातली अपरिहार्यता असते. हा ताण सगळ्या स्त्रियांसाठी सारखा नसतो. जर का स्त्री उच्चजातीय, उच्चवर्गीय असेल तर तिच्या बोलण्याला, शब्दनिवडीला होणारा विरोध, कुचेष्टा, अपमान तुलनेने कमी असतो. अर्थात, व्यावसायिक-वैयक्तिक अशा बदलत जाणाऱ्या संदर्भानुसारही मिळणारी वागणूक बदलत जाते. ज्या जाती/वर्गांमध्ये स्त्री ही संस्कृतीची रक्षणकर्ती मानली जाते, तिथे तिच्या भाषिक अभिव्यक्तीवर जास्त बंधन असते असे दिसते. यामध्ये कमी-जास्त प्रमाणात हिंदू धर्मातल्या सर्व जाती आपापल्या भूमिकांवर ठाम असताना दिसून येते. उच्चजातीय स्त्री म्हणजे सर्व स्वातंत्र्य बहाल केलेली, अशी भोळसट समजूत आहे. जाट, रजपूत, मराठा अशा अनेक जातीतल्या स्त्रियांच्या भाषिक अभिव्यक्तीवर अतिशय कडक बंधनं दिसून येतात. स्त्रीची अभिव्यक्ती, तिचा पेहराव, तिची भाषा यावर बंधन घातले की संस्कृतिरक्षण होते, या धारणेमागे काय विचार असतो? नुसतं 'पुरुषप्रधानता' असं ढोबळ उत्तर देऊन भागणार नाही.

मानवी आयुष्याच्या ठराविक आयामांमधून स्त्रीला वगळलं तर त्याचा परिणाम म्हणून तिचं दुय्यमत्व बळकट होत जातं. अनेक पिढ्यांतून झिरपत आलेल्या या दुय्यमत्वाचा सामना करताना स्त्रियांची जी दमछाक होते, कधी पिछेहाट होते, त्यातून 'ठराविक गोष्टी नाहीच जमत बायकांना' हा समज आणखी दृढ होत जातो. याचे भाषेसंबंधी उदाहरण पहायचे झाल्यास, आपल्याकडे व्यासपीठांवर होणाऱ्या कार्यक्रमांचे विश्लेषण करावे, लगेच मुद्दा लक्षात येईल. 'महान वक्ते' हे केवळ पुरुषच घडून गेले आहेत, अशा उदात्तीकरणामुळे पुरुष सहज व्यासपीठ व्यापून असतात. हे सूत्रसंचालकापासून ते प्रमुख वक्त्यांपर्यंत घडतं. कार्यक्रमाच्या आयोजनात सहभागी स्त्रिया (बहुतेकदा साडी नेसून, नटून) हार-तुऱ्यांची ताटं सांभाळताना दिसतात. कुणी म्हणेल, 'छे, असतात की आजकाल स्त्रिया सगळीकडे. भाषणं देतात, सूत्रसंचालन करतात, माईकमधून बोलतात.' असा विचार मनात आलेल्या सगळ्यांनी, असं घडण्याचं प्रमाण काय आहे, या प्रश्नाचंही प्रामाणिक उत्तर शोधावं. अशा कार्यक्रमाची आपल्याला आठवण आहे का, जिथे स्त्रियाच संयोजक आहेत, व्यासपीठावरच्या संभाषण-संवादाची सूत्रे स्त्रियांच्याच हाती आहेत, प्रमुख वक्तीही स्त्रीच आहे आणि प्रेक्षक मात्र बहुसंख्येने पुरुष आहेत? हा झाला मुद्दा स्त्रियांना सार्वजनिक संवादात पुरेशी संधी मिळण्याची. त्यापुढे जाऊन जिथे काही प्रमाणात स्त्रियांना संधी मिळते, तिथेही त्या स्त्रिया कोण असतात? तर ज्यांचं बोलणं प्रमाण मराठीच्या जवळ जाणारं असेल, किंवा 'शुद्ध' असेल आणि शक्यतो दिसण्यात उजवेपण अशाच स्त्रियांना प्रामुख्याने संधी मिळताना आपण पाहिलं आहे.

भारताच्या संदर्भात तीन वेगवेगळ्या अक्षांवर स्त्रियांच्या भाषेचा प्रश्न तपासता येतो. जात, वर्ग आणि लिंगभाव यांच्या विविध मांडण्या होतात. भारताच्या संदर्भात दलित स्त्रीकडे triple disadvantage आहे, ही जी मांडणी आहे ती भाषेच्या बाबतीतही तंतोतंत लागू पडते. श्रीमंत-गरीब या फरकामुळे जे फरक भाषेत दिसतात, त्यातही जास्त कठोर समीक्षाही आर्थिक दृष्ट्या कमकुवत व्यक्तीच्या वाट्याला येते. पश्चिमेकडे वर्गभेद जुन्या काळापासून चालत आलेला आहे. Pygmalion नाटकावर आधारित My fair lady या गाजलेल्या हॉलिवुड सिनेमाचे उदाहरण आठवून पाहा. गरीब, फुलं विकणाऱ्या मुलीची भाषाशुद्धी केली की, तिला राणीच्या दरबारीही मान मिळेल, असा दावा आणि मग प्रयोग करणाऱ्या भाषाशास्त्रज्ञाची ही गोष्ट आहे.

Pygmalion या मूळ नाटकाचा पु.ल. देशपांडे यांनी केलेला अनुवाद– 'ती फुलराणी' हा नाट्यप्रयोग म्हणूनही तुफान गाजला. गरीब व्यक्तीने श्रीमंतांसारखे बोलणे शिकून आपली समाजातली पत सुधारावी हे गृहीतक आपल्याला अगदी साधे, सहज वाटते. यातच वर्गभेदातून आलेला भाषिक भेदभाव किती खोलवर रुजला आहे, हे लक्षात येते. विशेषत: भारताच्या संदर्भात, वर्गवास्तव हे जातवास्तवाशी जोडलेले आहे. वंचित जातीगटांतील व्यक्ती आर्थिक दृष्ट्या दुर्बल असण्याची शक्यता खूपच जास्त आहे, हे आकडेवारीनं अनेकदा सिद्ध केलं आहे. त्यात जर तुम्ही स्त्री असाल तर पुरुषांच्या तुलनेत येणारे दुय्यमत्वही तुम्हाला सहन करावे लागणारच आहे, आणि म्हणून उच्चजातीय, उच्चवर्गीय पुरुष जी प्रमाण भाषा वापरेल त्याच्या जवळ जाणारी भाषा आत्मसात करण्यात अनेक स्त्रियांना शक्ती खर्च करावी लागते.

भाषेची स्थित्यंतरं शेकडो वर्षांपासून होत आलेली आहेत, पुढची शेकडो वर्षे होणार आहेत. आपल्याला उपलब्ध असलेली भाषा, त्या भाषेचे केवळ एक प्रारूप (version) आहे. ज्या शुद्ध–अशुद्धच्या संकल्पनांना कवटाळण्यात इतकी ऊर्जा खर्च होते आहे, ते संदर्भ काही काळाने अप्रस्तुत ठरणार आहेत. अर्थात पैसा, मालमत्ता, नावलौकिक या सगळ्यांप्रमाणे भाषाही एक सत्तेचं रूप आहे. त्यामुळे भाषेबद्दलची कितीही व्यापक समज अंगिकारली तरी हे सत्तासंघर्ष अटळ आहेत. विशेषत: कोणते तरी एक वंचितपण ज्यांच्या वाट्याला आले आहे, त्यांना या लढाईत भाग घेण्याशिवाय पर्याय नाही. आज स्त्रिया आणि पुरुष यांच्या भाषेच्या वापराचे, त्यातल्या सूक्ष्म फरकांचा अभ्यास करणाऱ्या पहिल्या पिढीतल्या स्त्री–अभ्यासकांचा प्रवास पाहिल्यावर हे लगेच लक्षात येते. ऑस्ट्रियन भाषातज्ज्ञ डेल स्पेंडर यांनी 'मॅन मेड लँग्वेज' लिहिले तर 'लँग्वेज अँड विमेन्स प्लेस' हे पुस्तक लिहिणाऱ्या अमेरिकी भाषातज्ज्ञ रॉबिन लेकॉफ या अभ्यासकांनी या विषयाला खरी वाचा फोडली. डेल स्पेंडर त्यांनी स्वत:च्या पीएच.डी. प्रबंधासाठी हा विषय निवडला, तेव्हा त्यांना मार्गदर्शन करायला कोणीही राजी होईना. कारण विद्यापीठांमध्ये भाषाशास्त्राचे विभाग आणि अभ्यास हे केवळ पुरुषांचे क्षेत्र होते. अशा परिस्थितीत हा कसा सिरियस अभ्यासाचा विषयच होऊ शकत नाही, इथंपासून हा सगळा स्त्रीवादी विचारांचा धूर्तपणा आहे इथपर्यंतच्या शेरेबाजीचा सामना त्यांना करावा लागला. विविध प्रकारच्या चेष्टा व अपमान या सगळ्यांतून मार्ग काढत त्यांनी आपला अभ्यास पूर्ण केला आणि पुस्तक नावारूपाला आणले. त्यानंतर अनेक जणींनी हा अभ्यास, निरीक्षणं नेटाने पुढे नेली. त्याचा परिणाम म्हणजे आपली भाषेबद्दलची समज आणि जाणीव प्रगल्भ होत जाते आहे. गेली ७०–८० वर्षे जगभरात या विषयावर सखोल अभ्यास आणि मांडणी करणाऱ्या या सगळ्यांना सलाम!

**अपर्णा दीक्षित,** पुणे
aparna.a.dixit@gmail.com
Mob.9881670840

(मागील वर्षभर महिन्यातून एक लेख याप्रमाणे प्रसिद्ध झालेली ही लेखमाला समाप्त झाली आहे.
– **संपादक**)



अब्दुल बिस्मिल्लाह

# ‘दंतकथा’मधील माझा कथानायक

कालांतराने या नालीत घुसून बसलेल्या या असाहाय्य कोंबड्याची दिनचर्या-अगदी त्याच्या मृत्यूपर्यंतची-माझ्या नजरेसमोर तरळू लागली. हे जणू एखादं दुःस्वप्नच होतं. हेच दुःस्वप्न फँटसीचा आकार घेऊन हळूहळू ‘दंतकथा’ नामक कादंबरीच्या स्वरूपात उतरू लागलं. ‘दंतकथा’ याच फँटसीतून निघालेलं पुस्तक आहे. कोण्या महान लेखकाने असं म्हटल्याचं मी वाचलं होतं की, माणसांवर लिहिण्यापेक्षा पशु-पक्ष्यांवर लिहिणं जास्त अवघड आहे. मी सहमत आहे या विधानाशी, निःसंशय. माणसाची मनोवस्था समजणं एकापरीने सोपं आहे. भाषेतूनसुद्धा माणसाचं चरित्र समजू शकतं. पण पशुपक्ष्यांच्या बाबतीत हे समजणं अवघड, कदाचित असंभवच. म्हणून जेव्हा मी ‘दंतकथा’ लिहिण्याचं ठरवित होतो तेव्हा या कोंबड्याची कथा मांडणं माझ्यासाठी एक आव्हान होतं.

तो धावत होता. तो उडत होता धडपडत आणि इकडे तिकडे लपायचा प्रयत्न करीत होता. तो भयग्रस्त होता, आतंकित दिसत होता. आपला जीव वाचविण्यासाठी तो कोणती तरी सुरक्षित जागा शोधत असावा. पण का? कदाचित त्याने एखादा धोका हेरला असावा? त्याला कशाबद्दल एवढी भीती वाटते आहे? तेवढ्यात, त्याला गटारीचं भोक दिसलं आणि तो त्या गटारीत घुसून बसला. घराचं सांडपाणी, घाण पाणी वाहून नेण्याची ती नाली होती. नालीच्या भोकावर लोखंडी जाळी असते लावलेली खरंतर. पण इथे ती नव्हती. तुटली असेल. काढून ठेवली असेल.

असं दृश्य मी पाहिलं. या दृश्यात मी माझ्या कथा-नायकाला ‘अभिनय’ करताना पाहिलं. नायक म्हणजे एक कोंबडा. देशी कोंबडा. देशी कोंबडा पोल्ट्रीफार्मच्या कोंबड्यांपेक्षा वेगळा असतो. पोल्ट्रीफार्मच्या कोंबड्याला लहान मुलगासुद्धा सहज पकडू शकतो. पण देशी मुर्गा? तो चपळ असतो. तेज असतो. त्याला भलेभलेही सहज पकडू शकत नाहीत. होऽ, तर हा माझा कथा-नायक होता-देशी कोंबडा!

उपरोक्त घटना जेव्हा मी पाहिली तेव्हा मला वाटलं नव्हतं की मी काही लिहीन यावर, म्हणून. खरं तर त्या कोंबड्याला मी नायकरूपात पाहिलंच नव्हतं. त्या वेळेस तो एक सामान्य कोंबडाच होता. पण हळूहळू त्या कोंबड्याशी संबंधित अशा काही गोष्टी मला समजत गेल्या; आठवत गेल्या. त्याला त्या गटारीतून बाहेर काढण्यासाठी खूप प्रयत्न केले गेले होते. म्हणजे, लोखंडी गज आत घुसवणे, कोंबड्याला हुसकावण्यासाठी आवाज करणे इत्यादी. पण काही उपयोग झाला नाही. मग नालीच्या दुसऱ्या बाजूला जाऊन तिथल्या भोकातसुद्धा गज घुसवून कोंबड्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न झाला. ही सगळी खटपट दोन-तीन दिवस चालली होती. पण कोंबडा काही हाती आला नाही. कोंबडा इकडूनही निघाला नाही आणि

तिकडूनही. मग तो गेला तरी कुठे?

हा प्रश्न मला भेडसावत राहिला. कोंबडा गेला तरी कुठे? आणि मग या प्रश्नाशी संबंधित असे अनेक मुद्दे, अनेक प्रश्न माझ्या मनात निर्माण होऊ लागले. गटारीत घुसल्यानंतर त्याला काय वाटलं असेल? तिथे तर अंधार असणार. अंधारात तो कोंबडा काय करीत राहिला असेल? त्याला भूक लागली तर त्याने काय केलं असेल? काय विचार केला असेल? भूक किती सहन केली असेल? त्याला भीती वाटत होती. आणि म्हणून तर तो धावत इथे येऊन लपला होता. मग या भीतीतून तो मुक्त झाला असेल का? भयमुक्त झाला असेल तर त्याने बाहेर येण्याचा प्रयत्न का केला नाही? तो पुढे किंवा मागे, कुठे तरी निघालाच पाहिजे होता. पण तसं झालेलं नव्हतं. मग तो गेला कुठे? तो एखाद्या जादूगाराचा कोंबडा होता का? जादूगार रूमालातून कबूतर बाहेर काढतात. आणि कबूतरातून नाणं बाहेर काढतात. पण हा तर कोंबडा होता, कबूतर नाही.

हे सगळे विचार माझ्या मनात फेर धरून नाचू लागले. कालांतराने या नालीत घुसून बसलेल्या या असाहाय्य कोंबड्याची दिनचर्या–अगदी त्याच्या मृत्यूपर्यंतची–माझ्या नजरेसमोर तरळू लागली. हे जणू एखादं दुःस्वप्नच होतं. हेच दुःस्वप्न फँटसीचा आकार घेऊन हळूहळू 'दंतकथा' नामक कादंबरीच्या स्वरूपात उतरू लागलं. 'दंतकथा' याच फँटसीतून निघालेलं पुस्तक आहे.

कोण्या महान लेखकाने असं म्हटल्याचं मी वाचलं होतं की, माणसांवर लिहिण्यापेक्षा पशु–पक्ष्यांवर लिहिणं जास्त अवघड आहे. मी सहमत आहे या विधानाशी, निःसंशय. माणसाची मनोवस्था समजणं एकापरीने सोपं आहे. भाषेतूनसुद्धा माणसाचं चरित्र समजू शकतं. पण पशुपक्ष्यांच्या बाबतीत हे समजणं अवघड, कदाचित असंभवच. म्हणून जेव्हा मी 'दंतकथा' लिहिण्याचं ठरवित होतो तेव्हा या कोंबड्याची कथा मांडणं माझ्यासाठी एक आव्हान होतं. पण तरीही, हताश न होता या विषयावर मी विचार करू लागलो.

मला माझ्या बालपणीच्या आठवणींचा खूप उपयोग झालेला आहे. माझं बालपण मध्य प्रदेशच्या जंगलात, पहाड–पर्वतात, आणि लहान–मोठ्या नद्यांनी घेरलेल्या गावात गेलेलं आहे. तिथे पशु–पक्षी जणू मनुष्यांच्या बरोबरीनेच राहत असत. पाळलेलेसुद्धा आणि जंगलीसुद्धा. पक्ष्यांच्या कलकलाटाने पहाटे जाग यायची. पशु–पक्ष्यांचे




व्यवहार पाहत दिवस मावळायचा. आणि संध्याकाळी पुन्हा पक्ष्यांच्या कोलाहालात रात्र व्हायची. पहाटे कोंबड्याचं आरवणं कानावर पडायचं. कोंबडा आरवला म्हणजे पहाट झाली हे समीकरण त्यावेळेस मनावर ठसलं होतं. आमच्या घरी कोंबड्या पाळलेल्या असायच्या. माझी आई त्यांची काळजी घेई, त्यांना सांभाळी. मी कोंबडीच्या पिल्लांसोबत खेळत असे. एखादं पिल्लू हरवलं, मांजरीने किंवा घारीने पळवलं तर मी व्याकूळ होत असे, रडत असे. आमच्या घरी त्यावेळेला एक सुंदर कोंबडा होता. मी त्याच्या बरोबरीने फिरत असे. त्याला फेरफटका मारण्याची सवय असावी. म्हणून मीदेखील त्याच्या सोबतीने फिरत असे. तो नेहमीच कोंबड्यांच्या मागे धावत राहायचा. मीसुद्धा त्याच्या बरोबरीने धावत राही. हाच कोंबडा माझ्या नजरेसमोर तरळत राहिला, दृश्यमान होत राहिला. नालीत घुसलेला कोंबडा असाच होता. मग तर सगळी कोंबड्यांची दुनिया माझ्या नजरेसमोर दृग्गोचर झाली. अगदी पिल्लू असण्यापासूनचा त्याचा प्रवास, त्याचं तारुण्यात पदार्पण, त्याचं चालणं आणि वागणं, सवयी, त्याचा आनंद आणि दुःख, आजारपण हे सगळं माझ्या नजरेसमोर स्पष्ट होत गेलं. म्हणजे कोंबड्यांच्या मृत्यूपर्यंतची कथा. आणि नंतर जीवनाचं एक नवं रूपच साकार होऊन माझ्या समोर उपस्थित झालं. त्यानंतर मी खग–कुळाच्या एकूण व्यवहाराबद्दल समजून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. माणसाप्रमाणे पक्षी मागच्या दिशेने उलटपावली चालू शकत

नाहीत. हे तथ्य समजल्यानंतर नालीत घुसलेला कोंबडा उलट्या गतीने मागे मागे सरकत बाहेर का निघाला नाही, हे समजून आलं. पुढे तर नाली अरूंदच असणार. पण तरीही जोपर्यंत तो जिवंत राहिला तोपर्यंत कसा राहिला असेल हा विचार माझ्या मनाला टोचत राहिला. याच विलक्षण अनुभूतीतून मी 'दंतकथा' लिहून टाकली. या सगळ्या लेखनप्रक्रियेत बालपणीच्या त्या पशु-पक्ष्यांच्या आठवणी आणि अनुभव उपयोगी सिद्ध झाले आहेत.

पहिल्यांदा मला वाटलं की, ही एक कोंबड्याची आत्मकथा होईल. पण लिहिता लिहिता पुढे मनुष्यत्व आणि अमनुष्यत्व यांचं द्वंद्व लेखनातून स्पष्ट व्हायला लागलं. माणसाच्या मनात, त्याच्या आतमध्ये पशुता तर विद्यमान असतेच. म्हणून तर ही पशुता कधी कधी बाहेर प्रकटते आणि माणूस हिंस्र बनतो. हत्या करतो. खून करतो. प्राणहरण करतो. भय आणि आतंक या अमूर्त भावनेचा अविष्कार करून माणूस स्वतःला सृष्टीमधला सर्वश्रेष्ठ प्राणी समजतो. हा विचार मला उत्तेजित करीत आला. आणि मग हे लिखाण कुठच्या कुठे पोहोचलं आहे असं मला वाटत राहिलं. माणूस माणसाच्या विरोधात आहे हेही स्पष्ट होत गेलं. जेव्हा मी लिहीत होतो तेव्हा आतंकवाद समाजामध्ये तितकासा पसरला नव्हता पण सांप्रदायिकता अनेक रूपाने समाजामध्ये अस्तित्त्वात असल्याचं दिसत होतं. या सांप्रदायिकतेमध्ये हिंसा दडलेली मला दिसत होती. समाजातली ही हिंसा भयानक रूप घेताना मला दिसली. हीच हिंसा आणि हिंसेतून प्रकट होणारा आतंक आणि भीती 'दंतकथे'च्या लेखनाच्या केंद्रस्थानी जाऊन बसली आहे.

शाकाहार की मांसाहार हा प्रश्न इथे व्यर्थ आहे. या कथेमध्ये या प्रश्नाला विशेष असं स्थान नाही. मनुष्याच्या अंतर्मनात दडलेली हिंसा आणि अमनुष्यता किंवा अमानुषता या लेखनाचा केंद्रबिंदू झाला. ही अमानुषता संपूर्ण मानवजातीवर कलंक आहे. माणूस बलवान आहे आणि निर्बल पशु-पक्ष्यांवर मात्र अन्याय आणि अत्याचार करतो आहे. पशुपक्ष्यांना पीडा देतो, त्रास देतो आणि हिंस्रपणे त्यांना ठार मारतो. निर्बल पशु-पक्ष्यांना कोंदट वातावरणात ठेवताना त्याला खंत वाटत नाही. मनामध्ये करूणा उत्पन्न होत नाही. कदाचित असं करताना माणसाला परपीडनाचा आनंद मिळत असणार.

आज सर्वत्र, चारी दिशांना भय आणि आतंकाचा वावर वाढलेला आहे. हा वावर विचित्र आहे आणि भयभीत वातावरण त्यामुळे निर्माण होतं आहे. ही कथा लिहिताना एक विचित्र अशी भयाची भावनादेखील मला जाणवत राहिली. आज सर्वत्र, खून-खराबा आहे. इंच इंच जमिनीसाठी खून पडतायत. स्वार्थ आणि लोलुपता वाढते आहे. शारीरिकच नाही तर मानसिक अत्याचारदेखील वाढले आहेत. आणि ही दुर्दशा सगळ्या समाजाची झालेली आहे. जणू आतंक एखादं श्वापद आहे आणि हे श्वापद आपल्या विशाल पावलांखाली माणुसकीला आणि मानवजातीला पायदळी तुडवतं आहे. हे सगळं चित्र विदारक आहे. हे चित्र आपल्याला पुढे कोणत्या दिशेने नेणार आहे असा सवाल आहे. खरं तर हा प्रश्न सामान्य प्रश्न नाही. ही सामान्य समस्या नाही. या समस्येत चिंतेचे अनेक पदर लपलेले आहेत. हे पदर विस्कटले, ओढले, मोकळे केले तर त्यातून बरंच काही भयावह असं प्रकट होणार आहे.

परंतु, चिंता किंवा निराशा यातून कोणत्याही समस्येचं निराकरण होऊ शकत नाही. जिजीविषा-जीवनेच्छा ही दुर्दम्य आहे. याच जिजीविषेला माझ्यातल्या लेखकाने कदाचित स्वप्नात पाहिलं असणार. हेच स्वप्न 'दंतकथे'च्या रूपाने प्रकटलेलं आहे. कदाचित असं स्वप्न म्हणजे जीवनाची सार्थकता असावी. या रचनेत अशाच सार्थकतेचा शोध मी घेतला. माणसाला आणि मनुष्यत्वाला जिवंत ठेवण्याच्या प्रयत्नात ही कादंबरी थोडीशी साहय्यभूत ठरू शकेल असा मला विश्वास वाटतो.

'दंतकथा' पहिल्यांदा 'हिंदी इंडिया टुडे'मध्ये क्रमशः छापली गेली. नंतर तिचा उर्दू अनुवाद 'आजकल'मध्ये प्रकाशित झाला. 'दंतकथे'चा मराठी आणि बंगालीमध्येदेखील अनुवाद झालेला आहे. मित्र श्री.भारत सासणे यांनी 'दंतकथे'चा केलेला अनुवाद मराठीमध्ये पुस्तकरूपाने प्रकाशित झाला आणि आता नवी आवृत्ती प्रकाशित होते आहे. अनुवादक आणि प्रकाशक यांचा मी अतिशय आभारी आहे.

**अब्दुल बिस्मिल्लाह,** दिल्ली
अनुवाद : **भारत सासणे**

(२००२ च्या साधना दिवाळी अंकात 'दंतकथा' या लघुकादंबरीचा अनुवाद प्रसिद्ध झाला होता. तो अनुवाद आता नव्या आवृत्तीच्याद्वारे पुस्तकरूपात साधना प्रकाशनाकडून आले आहे. या आवृत्तीसाठी लिहिलेले हे मनोगत.)

अभिवादन

महेश्वर लव्हेकर

# स्मृती का कोई अतीत नहीं होता...

कुछ शब्द चीखते है
कुछ कपडे उतार कर
घुस जाते हैं इतिहास में
कुछ हो जाते हैं खामोश...

नऊ डिसेंबरला सकाळपासूनच वातावरण कुंद होते. अत्यंत निरुत्साही. ऑडेनने येट्‌सच्या स्मृत्यर्थ लिहिलेल्या कवितेत आहे त्याप्रमाणे. आजचा दिवसच वाईट आहे, याविषयी साऱ्या उपकरणांचं एकमत झालं असावं. आणि संध्याकाळी ती बातमी कळली– प्रिय कवी मंगलेश डबराल यांनी अखेरचा श्वास घेतल्याची. हे अनपेक्षित नव्हते. त्यांचे निकटचे मित्र असद झैदी यांच्या फेसबुकवरील पोस्ट वाचून मंगलेशजींची प्रकृती चिंताजनक असल्याचे आणि शरीराचे जटिल यंत्र अटळ, ठाम निर्धाराने अंताच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे जाणवत होते. एका लेखात वाचले की, सारं संपण्यापूर्वी मंगलेशजी म्हणत होते, 'मी थकलोय. घरी जाऊ या.'

त्यांच्या कवितेचा प्रथम परिचय झाला सहा-सात वर्षांपूर्वी एका मराठी नियतकालिकात त्यांच्या 'अच्छाई का पाठ' या कवितेच्याा अनुवादातून. या साध्या-सरळ कवितेचा आशय मनाला थेट भिडला. नंतर त्यांच्या कविता-कोशवरील कविता वाचल्या. विशेष आवडल्या त्या संगीतविषयक कविता. नंतर त्यांचे सर्व काव्यसंग्रह, 'घर का रास्ता' वगळता, वाचून काढले. एका नव्या, तरल विश्वाशी ओळख झाल्याची जाणीव झाली. प्रकर्षाने जाणवलं की– चांगली कविता आपल्याला माहीत असते तेच सांगते, मात्र त्या वेळी आत जे उतरतं ते साक्षात्कारी असतं. अमिट असतं.

त्यांच्याशी तीन-चार वेळा फोनवर बोललो होतो. एकूण बोलणे सात-आठ मिनिटांपेक्षा जास्त झाले नसणार. प्रत्येक संभाषणावेळी जाणवला तो त्यांचा सौम्य, ऋजू स्वर- ऐकून खूप बरं, आश्वस्त वाटणारा. त्यांच्या बऱ्याच

> मंगलेशींची मला आणखी एक अत्यंत आवडणारी कविता आहे– पंचम. या कवितेतल्या कथेत अब्दुल करीम खाँसाहेबांचा शिष्य त्यांना म्हणतो– ''गुरुजी, सातही सूरांवर, तिन्ही सप्तकांवर आपली संपूर्ण हुकूमत आहे. हे कसे साध्य होते?'' यावर खाँसाहेब उदास स्वरात म्हणतात– ''अरे बेटा, आता कुठे पंचमाचं थोडंफार आकलन होतंय.'' ही ऐकीव कथा वाचकांना सांगून मंगलेशजी कवितेच्या अखेरीस लिहितात– 'ही कथा ऐकल्यापासून जेव्हाही मी कविता लिहिण्यासाठी लेखणी हाती घेतो, तेव्हा क्षणभर हात थबकतो– लिहिण्यापूर्वी.' एका मुलाखतीत त्यांना विचारण्यात आलं की, 'तुमच्या कुठल्या कवितांविषयी तुम्ही समाधानी आहात?' यावर त्यांचे उत्तर होतं, ''एकाही नाही. सगळ्याच कविता पुन्हा लिहून काढाव्यात असं वाटतं.''



कवितांतून ऐकू येणारा. राजकीय आशय असणाऱ्या त्यांच्या कवितांतून मात्र ऐकू येतो त्यांचा ठाम, कणखर आणि कधी कधी घणाघाती स्वर... पण नेहमीच संयत असणारा.

मंगलेशजींशी पहिल्यांदा फोनवर बोललो ते त्यांची 'राग मारवा' ही कविता वाचून. अगदीच न राहवून. रागांविषयी सात-आठ कविता मी लिहिल्या आहेत, असे ते म्हणाले. त्यांची प्रसिद्ध कविता 'संगतकार' जी मी तोवर वाचली नव्हती, 'वाचा' म्हणाले. राग मारवा ही एक अप्रतिम कविता आहे. उस्ताद अमीर खाँ आणि पन्नालाल घोष यांच्या गायन-वादनाला स्मरून लिहिलेली. मंगलेशजी लिहितात- 'कुठल्याशा दूरवरच्या, अज्ञात वस्तीच्या दिशेकडून येतायत मारव्याचे सूर. एकांतात अमीर खाँच्या कंठातून स्रवणारे. पन्नालाल घोष यांच्या लांबलचक बासरीतून पाझरणारे. आसमंतातील एकही वस्तू अस्पर्श न ठेवणारे. ज्याला स्पर्श केला, त्याचा आकार धारण करणारे. सावकाश साऱ्या आलापांचे अद्वैत साधणारे. या सुरात एक भाषा तडफडतेय शब्दांचा शोध घेत. या सुरात माधुर्य आहे का औदासीन्य- हे ठरतं तुम्ही त्यात शोध कशाचा घेताय, यावरून. तिन्हीसांजेला हा राग आळवतात. तेव्हा लयाला जाणारा दिवस आणि येऊ घातलेली रात्र यांची भेट होते. काही काळ हा असतो अंत आणि आरंभ या दरम्यानचा धूसर प्रदेश. जन्म आणि मृत्यूची भेट होते ते ठिकाण. त्या वेळी दिसतात प्रकाश आणि अंधकाराचे ओळखू न येणारे चेहरे. दिसतो डोळ्यांआड होणारा एक असहाय हात, घरंगळून खाली पडण्याआधी थबकलेला एक अश्रू. या रागाच्या सुरांना एक ठरावीक आकार कवेत घेईल, हे संभवत नाही. हे सूर विरघळत जातात आणि एकरूप होतात दुसऱ्या रागाच्या सूरांशी. सोपं नाही या रागाची उपज आणि विस्तार करणं. या रागाचे श्रोत्यांना यथार्थ दर्शन घडवण्यासाठी कलावंताच्या अंतरंगात असावी लागते बेचैनी, एक प्रकारचे वैराग्य. हे सूर थरथरतात आपल्याच मंद, संथ प्रकाशात.'

मंगलेशींची मला आणखी एक अत्यंत आवडणारी कविता आहे- पंचम. या कवितेतल्या कथेत अब्दुल करीम खाँसाहेबांचा शिष्य त्यांना म्हणतो- ''गुरुजी, सातही सूरांवर, तिन्ही सप्तकांवर आपली संपूर्ण हुकूमत आहे. हे कसे साध्य होते?'' यावर खाँसाहेब उदास स्वरात म्हणतात- ''अरे बेटा, आता कुठे पंचमाचं थोडंफार आकलन होतंय.'' ही ऐकीव कथा वाचकांना सांगून मंगलेशजी कवितेच्या अखेरीस लिहितात- 'ही कथा ऐकल्यापासून जेव्हाही मी कविता लिहिण्यासाठी लेखणी हाती घेतो, तेव्हा क्षणभर हात थबकतो- लिहिण्यापूर्वी.' एका मुलाखतीत त्यांना विचारण्यात आलं की, 'तुमच्या कुठल्या कवितांविषयी तुम्ही समाधानी आहात?' यावर त्यांचे उत्तर होतं, ''एकाही नाही. सगळ्याच कविता पुन्हा लिहून काढाव्यात असं वाटतं.'' एवढा मोठा कवी तरीही किंवा म्हणूनच, नेमकं जे सांगायचं आहे ते शब्दांत व्यक्त करता आलंय का, याविषयी साशंक असणारा. त्यांच्या 'अंतिम प्रारूप' या कवितेची सुरुवात अशी आहे- 'इस कविता का अंतिम प्रारूप वह नहीं है जो इस का पहला प्रारूप था.' रंडेल जुरेल या कविमित्राविषयी रॉबर्ट लॉवल लिहितो, 'यू डिड नॉट राइट. यू रिरोट.' शब्दांच्या-रचनेच्या परिपूर्णतेविषयीची असोशी, अस्वस्थता जागरूक- संवेदनशील कवीला किती क्लेश देत असते, याची ही उदाहरणे. इथे आठवते चेस्लॉ मिलॉशच्या कवितेतील ही ओळ- मनाच्या संभ्रमावस्थेत जन्म होतो

कवितेचा आणि कविता कबुलीजबाब देते आपल्यातील वैगुण्यांचा, उणिवांचा.

मंगलेशजींच्या 'शहनाईयों के बारे में बिस्मिल्ला खाँ' या कवितेत या महान शहनाईवादकाचं निरागस, संगीतात चिंब भिजलेलं, बनारसच्या मातीची अनावर ओढ असलेलं, 'इस्लामला संगीत निषिद्ध असेल तर पन्नासेक उस्ताद निपजलेच कसे?' असा रोखठोक सवाल विचारणारं, झपाट्याने बदलत चाललेल्या बनारसला पाहून खिन्न होणारं रूप दिसतं. त्यांच्या 'क्षणिका' ही त्यांच्या इतर कवितांप्रमाणे साक्षात्कारी आहेत. शब्दरूप मिळालेल्या क्षणाला, अनुभवाला लख्ख उजळवणाऱ्या. शब्दांची महती आणि तोकडेपणाकडे लक्ष वेधणाऱ्या. शरीर आणि मनाच्या द्वैतामुळे होणाऱ्या मानसिक ओढाताणीवर भाष्य करणाऱ्या. सत्य आणि भ्रम यातील द्वंद्व अधोरेखित करणाऱ्या. त्यांची 'थरथर'ही क्षणिका वाचून विंदा करंदीकरांच्या 'माथेरान– एक आभास' या कवितेची आठवण होते. या दोन्हींत शरीराला कड्याच्या दिशेनं बोलावणारं असं काही आहे– संगीत किंवा मातीचे खुणावणे, अटळ तसंच भयावहही.

'उपकथन' या पुस्तकात मंगलेशजींच्या मुलाखती संकलित केल्या आहेत. या मुलाखतींतून घडतं एका प्रांजळ, विनम्र कवी–लेखकाचे मनोज्ञ दर्शन. एका मुलाखतीत ते आपल्या वडिलांची एक आठवण सांगतात. त्यांनी आपला काव्यसंग्रह 'घर का रास्ता' वडिलांना अर्पण केला. यावर वडिलांची प्रतिक्रिया होती– 'उस ने ये किताब लिखी और घर का रास्ता भूल गया.' मंगलेशजींना ही आठवण का सांगावी वाटली असेल? त्यांनी वडिलांविषयी अनेक कवितांतून लिहिलं आहे. त्यांचे वडील गायचे छान. 'राग दुर्गा' या कवितेत मंगलेशजी लिहितात– 'शेजारच्या खोलीत गात होते तरुण वयातले माझे वडील. आळवत होते दुर्गा रागातील बंदिश– सखी मोरी रुमझुम आणि सांगत होते– गवत, पिकं झपाट्याने मोठी होतात या रागाचे स्वर ऐकून. पिता–पुत्राचं नातंच वेगळं असतं. क्वचितच व्यक्त होणारं. सहसा अव्यक्तच राहणारं. व्यक्त झालं तरी कडवट स्वर लागण्याची शक्यता अधिक असलेलं.' पिता का चश्मा या कवितेत मंगलेशजी लिहितात– 'वडिलांची दृष्टी जवळपास निकामी झाली होती. कुठल्याच उपचारांचा उपयोग होणार नव्हता. त्यांचा अंतकाळ निकट आला होता. तेव्हा मी घरी गेलो, तर वडील म्हणाले– आता मला हे जग सोडताना कुठलं दुःख नाही. तू जरी घराकडे फार कमी लक्ष दिलंस तरी घरातल्या माणसांनी मात्र माझी व्यवस्थित काळजी घेतली. एक इच्छा मात्र पूर्ण झाली नाही– फुटपाथवर विकायला ठेवलेला आणि ज्याने मला व्यवस्थित दिसू शकले असते असा चश्मा वापरण्याची.' असं हे नातं. सहसा सल, उणीव व्यक्त करणारं. ओऱ्हान पामुकने वडिलांविषयी लिहिलेल्या लेखाच्या अखेरीस तो म्हणतो– 'आपल्या मृत्यूची सुरुवात आपल्या पित्याच्या मृत्यूपासून होते.' वडिलांविषयी मुलाखतीत, कवितेत आठवणी सांगत असताना पामुक म्हणतो तसं काही मंगलेशजींच्या मनात असेल का?

एका मुलाखतीत मंगलेशजी म्हणाले होते– 'स्मृती का कोई अतीत नहीं होता.' आपलं गाव आणि तो पहाडी प्रदेश सोडून शहरात येताना मंगलेशजी सोबत घेऊन आले होते आठ–नऊ कविता. पहाड आणि एकंदरीतच काफलपानीचा तो सारा आसमंत, नातीगोती यापासून तुटल्याची ठसठसती वेदना त्यांच्या अनेक कवितांतून व्यक्त झाली आहे. या वेदनेवरचा उतारा म्हणून मंगलेशजींनी आठवणींना भूतकाळाऐवजी वर्तमानात वस्तीला आणलं असेल का? अर्थात आयुष्यात काळाची सरमिसळ अपरिहार्य असते आणि यालाही जबाबदार असते बेभरवशाची स्मृतीच.

प्रत्येक मोठा कवी ज्या भाषेत लिखाण करतो, त्या भाषेच्या व्याकरणात भर घालत असतो. मंगलेशजींनीही हे केलंय. आता ते काळाच्या पडद्याआड गेले आहेत. 'ऑन दी डेथ ऑफ ए पोएट' या कवितेत मिलॉश म्हणतो– 'तो पाठमोरा, दृष्टिआड झाला आणि लगोलग बंद झाली व्याकरणाची प्रवेशद्वारे. आता त्याचा शोध घ्यावा लागेल शब्दकोशांच्या घनदाट रायांत, निबिड अरण्यात...'

**महेश्वर लव्हेकर,** पुणे
lavekarmaheshwar@gmail.com

---

**पुढील संपूर्ण अंक : दोन दीर्घ मुलाखतींचे** अनुवाद

**बराक ओबामा** यांची मुलाखत त्यांच्या नव्या पुस्तकाच्या निमित्ताने

**सूरज येंगडे** यांची मुलाखत हार्वर्ड विद्यापीठातील एका उपक्रमाचा भाग म्हणून.

## प्रतिसाद

### ह्या सामान्य ज्ञानामुळे सामान्य व्यक्तीही एखादी आत्महत्या टाळू शकतील

दि.९ डिसेंबरच्या साधना संपादकीयात (शोकसागरात बुडालेले आनंदवन) डॉ.शीतल आमटे यांच्या मृत्यूच्या सामाजिक परिमाणांची थोडक्यात पण साक्षेपी चर्चा करण्यात आली. डॉ.शीतल यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या घटकांचा शोध त्यांच्या-त्यांच्या परीने पोलीस व न्याययंत्रणा घेत राहतील, असे संपादकांनी म्हटले आहे.

संपादकीयात आनंदवनाबद्दल व आमटे परिवाराबद्दल आपल्या सर्वांच्याच मनातील आदरभाव व जिव्हाळा व्यक्त करताना अनेक सहृदय वाचकांच्या मनात येणाऱ्या स्वाभाविक प्रश्नांचीही चर्चा केली आहे. या संवेदनशील हाताळणीत आत्महत्येच्या एका मोठ्या पैलूकडे मात्र दुर्लक्ष केले आहे. ते म्हणजे- मानसिक आजार आणि आत्महत्या यांतील संबंध. एका विशिष्ट व्यक्तीबद्दल- विशेषतः तिच्या व्यक्तिगत वैद्यकीय इतिहासाची पुरेशी माहिती नसताना- सायकिॲट्रिस्ट म्हणून टिप्पणी करणे योग्य नसते आणि नाही. म्हणून मी येथे जे लिहितो आहे ते आत्महत्येच्या समस्येबद्दल सर्वसाधारण माहिती साधनाच्या प्रबुद्ध वाचकवर्गाला व्हावी, या हेतूने.

आत्महत्या हे जगभरात मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. जगातील सर्व मृत्यूंपैकी साधारणतः १.५ टक्के मृत्यू हे आत्महत्येमुळे होतात. ही प्रचंड मोठी संख्या आहे.

आत्महत्येच्या समस्येला वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, व्यावसायिक, धार्मिक, आर्थिक, वैद्यकीय असे अनेक पैलू आहेत. हा एक कॉम्प्लेक्स विषय आहे. पण एका बाबतीत मात्र जगभरच्या संशोधकांत एकमत आहे की, आत्महत्येमागे अनेकदा मानसिक आजार कारणीभूत असतात. जागतिक आरोग्य संघटनाही (WHO) आत्महत्येमागे मानसिक आजार हे सर्वांत महत्त्वाचे कारण मानते. ह्याबद्दल काही महत्त्वाचे मुद्दे असे-

१. डिप्रेशन, दारूचे व्यसन, स्किझोफ्रेनिया इत्यादी आजारांमध्ये आत्महत्येचे प्रमाण खूप अधिक असते. या आजारांवर जर योग्य उपाय वेळीच झाले, तर अनेक आत्महत्या थांबवल्या जाऊ शकतात.

२. डिप्रेशनचा आजार हा इतर वैद्यकीय आजारांसारखा आहे. हा मज्जासंस्थेचा आजार आहे. यात काही वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक कारणे असली तरी मूळ आजार हा मेंदूत होणाऱ्या बदलांमुळे होतो.

३. डिप्रेशन हा आजार आणि रोजच्या आयुष्यात येणारी दुःखे, नैराश्य या दोन भिन्न गोष्टी आहेत. लक्षणांच्या आधारावर डॉक्टर यांतील फरक ओळखू शकतात. पश्चिमेकडील देशांत साधारणतः जनरल प्रॅक्टिशनर्स, फॅमिली फिजिशियन्सच डिप्रेशनचे निदान व प्राथमिक उपचार करतात.

डिप्रेशनच्या आजाराला कारणीभूत पंधराएक जनुके शास्त्रज्ञांनी शोधून काढली आहेत. मधुमेहाच्या आजारावरसुद्धा आहार-विहार-जीवनशैली आदी बाबींचा परिणाम होतो. तसेच ह्या आजाराचे आहे.

४. डिप्रेशनसारखे आजार कुणालाही होऊ शकतात. त्यात व्यक्तिमत्त्व किती कणखर आहे, याचा फारसा संबंध नसतो.

डॉक्टरही समाजाचेच अंग असतात आणि त्यामुळे दुर्दैवाने काही डॉक्टरांमध्येही मानसिक आजारांबद्दल गैरसमज असतात. अत्यंत गंभीर डिप्रेशनच्या आजारातून उपचारानंतर बरे झाल्यावरही एखादा डॉक्टर म्हणतो की- मी मेंटली इतका स्ट्राँग आहे, मला हा आजार झालाच कसा?

मानसिक आजार हे स्वभावाशी-व्यक्तिमत्त्वाशी संबंधित नसतात, तर इतर वैद्यकीय आजारांसारखे असतात, ही जाणीव हळूहळू वाढीस लागली आहे. त्यामागे नवनवीन सबळ शास्त्रीय आधारही मिळत आहेत.

५. डिप्रेशन एक आजार म्हणून ओळखल्याने व त्यावर त्वरित योग्य उपाय केल्याने अनेक आत्महत्या टाळल्या जाऊ शकतात.

६. आत्महत्येचा विचार आल्यास तो जवळच्या व्यक्तींशी शेअर करणे, तसेच लगेच डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते. डॉक्टर मग त्यामागे डिप्रेशनसारखा आजार आहे का, हे तपासून बघतात.

७. आपल्या परिचितांमध्ये कुणीही 'आयुष्याला कंटाळलो/कंटाळले बघ' किंवा 'जगावेसे वाटत नाही' असे म्हटले तर त्यांना आत्महत्येच्या विचारांबद्दल जरूर विचारावे. असे प्रश्न विचारल्याने आत्महत्येची शक्यता वाढत नाही, तर कमी होते. त्या व्यक्तीला आपली स्थिती कुणी समजावून घेते आहे, असा आधार वाटतो. अशा व्यक्तीला संबंधित डॉक्टरांकडे लगेच जाण्यास प्रोत्साहित करावे.

कुणीही प्रसिद्ध व्यक्ती आत्महत्येला बळी पडली की, त्यामागे सर्व प्रकारची चर्चा सुरू होते. त्यात अनेकदा खरी कळकळ असते, दुःख असते, मानसिक धक्का असतो. कधी अनेकांना जीवनविषयक तत्त्वज्ञानावर चर्चा करायची संधी मिळते. यातील काही चर्चा सवंग असते. अनेक कॉमेंट्स तर सर्वथा अनुचित असतात. काही जण ह्याला 'ती व्यक्ती पराभूत झाली' असे जजमेंट देतात. कधी कुणी त्यावर राजकीय पोळी भाजून घेतो. अनेक प्रसिद्धिमाध्यमांना सत्यापेक्षा लोकांना काही तरी भंपक देण्यात रस असतो, कारण खऱ्या-खोट्या स्कँडल्समुळे टीआरपी वाढतो.

साधना हे विज्ञानाची कास धरणारे वैचारिक साप्ताहिक आहे. त्यामुळे त्याच्या वाचकवर्गाला आत्महत्या आणि मानसिक आजारांच्या संबंधांची माहिती असावी, असे वाटते.

पुनःश्च कुण्या एका व्यक्तीच्या मानसिक आरोग्याबद्दल कुणी सायकिॲट्रिस्ट सार्वजनिक चर्चा करत नाहीत. ते योग्यही नाही. येथे ह्या दुःखद घटनेच्या निमित्ताने आत्महत्या ह्या मानवतेपुढील एका ज्वलंत प्रश्नाच्या मेडिकल पैलूबद्दल वाचकांचे थोडे प्रबोधन व्हावे, एवढाच हेतू आहे. आशा ही की, आत्महत्येच्या मागे डिप्रेशनसारखा आजार कारणीभूत असू शकतो, ह्या ज्ञानामुळे सामान्य वाचकही एखादी आत्महत्या टाळून कुणाचा जीव वाचवू शकेल.

**डॉ. धनंजय चव्हाण**

## आत्महत्या ही केवळ त्या व्यक्तीची कृती नसते...

'तुमची सारी नैतिकता तुम्ही प्रथम कशाला प्राधान्य देता यावर अवलंबून आहे', अशी गांधींची धारणा आहे. त्यांनी सर्व शासन-शोषणांच्या विरोधात जो संघर्ष उभा केला, त्याला अहिंसेचे पथ्य संगितले. त्याला साध्य न मानता साधन मानले. ती अन्यायाच्या विरोधात संघर्षशील व सक्रिय बनते. (१२९)

महात्मा गांधींची विचारसृष्टी - काही अलक्षित पैलू, यशवंत सुमंत, साधना प्रकाशन, २०१६

Non-violence, to be a potent force, must begin with the mind. (202)

Timeless Inspirator - Reliving Gandhi, Editor : Raghunath Mashelkar (Museum of Tolerance- Gandhi : An American Perspective)

It is most possible that anyone reading these two quotes would think the following write-up would be about M.K. Gandhi and non-violence. But that is not the case, though these two quotes have guided me to process the suicide of Dr. Sheetal Amte and the subsequent editorial in weekly Sadhana.

I am not writing this to express or speculate why Sheetal committed suicide. It is beyond my knowledge sphere - Neither I knew Sheetal, never met her in fact, though I have visited Anandwan, Lokbiradari, Somnath twice (I was one of the participants of श्रम संस्कार छावणी in the year 2001 and later been there with my brother), nor am I a student of human Psychology.

But I grieve for Sheetal, not just her, for all those who commit suicide for one reason or another. ही आत्महत्या आणि साधनातला संपादकीय लेख हे एक निमित्त आहे माझ्या ह्या लिखाणाला.

I realised, suicide is the violence done by the individual to his/her mind and body. But it is not just an individual act, in this act of violence the main culprit is the individual's surrounding, the society, आपण सर्व.

आपलं काही सगळ्यांशी जमत नसतं आणि सगळ्यांचे आपण आवडतेही नसतो. तसेच आपल्या सर्वांच्या काही ना काही दुखऱ्या नसा असतात, irrespective of who we are, what we represent, etc. या दुखऱ्या नसा सहन करण्यासाठी त्यांना शांतपणे, खंबीरपणे सामोरे जाणे गरजेचे असते. त्यासाठी सगळ्यांना support system ची गरज असते. ही support system आपल्या कुटुंबाची, मित्र-मैत्रिणींची, आपल्याबरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्यांची, पुस्तकांची, काही आदर्शांची, मूल्यांची- कशाचीही असू शकते. (नकारात्मक support system बद्दल मी नाही बोलत आहे- addictions) काहीही समस्या आली, तरी एक ठिकाणा विसाव्याचा असणं फार गरजेचे आहे.

असा विसावा एखाद्या व्यक्तीला समाज जर देऊ शकत नसेल, तर ती समाजाने व्यक्तिप्रती केलेली हिंसा ठरावी.

संस्था माणसांना मोठं करतात तसेच माणसांमुळेही संस्था मोठ्या होतात. पण संस्था माणसांशिवाय कशा वाढतील, टिकतील? माणसाला सांभाळायचं काम संस्थांनी केलंच पाहिजे. Each individual counts/matter.

शीतल असो, शेतकरी असो- आपल्या हिंसेने त्यांचा बळी घेतलेला असतो; त्यांना support system आपण दिलेली नसते. कारण अहिंसा आपण आपल्यापासून सुरू केलेली नसते...

**उज्ज्वला देशपांडे,** पुणे

## ते मत वस्तुस्थिती आहे, भाबडेपणा नव्हे!

१० ऑक्टोबरच्या अंकातील अमरेंद्र धनेश्वरांच्या श्री.रामचंद्र गुहा यांच्या लेखावर टिपणणी करताना 'आंबेडकर हे टिळक किंवा गोखले यांच्याप्रमाणे उच्चवर्णीय होते, असा गांधींचा गैरसमज झाला होता...' हे मत भाबडेपमाचे असल्याचे श्री.माधव ढेकणे यांनी दि. २६ डिसेंबरच्या साधना अंकात म्हटले आहे. पण वस्तुस्थिती तशीच होती, हे डॉ.य.दि.फडके यांनीही 'डॉ.आंबेडकरांचे मारेकरी : अरुण शौरी' (लोकवाङ्मय गृह, पहिली आवृत्ती १४ एप्रिल १९९९, पृ.६३-६४) या आपल्या पुस्तकात नमूद केले आहे.

'१९३२ मध्ये गांधीजी येरवडा तुरुंगात असताना दि.१ एप्रिल रोजी डॉ.आंबेडकरांचा विषय निघाला तेव्हा गांधीजी महादेवभाई देसाईंना म्हणाले, मी इंग्लंडला जाईपर्यंत आंबेडकर हरिजन आहेत हे मला माहीत नव्हते. हरिजनांच्या प्रश्नांबद्दल विलक्षण आस्था असलेले ते एक ब्राह्मण आहेत आणि म्हणून ते असे अतिरेकी बोलतात अशी माझी समजूत होती.' य.दि. म्हणतात 'महादेवभाईंनी रोजनिशीत नोंदवलेले गांधीजींबरोबरचे संभाषण वाचले म्हणजे आंबेडकरांसारख्या मुंबई प्रांतातील नेत्याविषयीचे महात्मा गांधींसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या नेत्याचे गाढ अज्ञान पाहून धक्का बसल्याशिवाय राहत नाही.'

गांधीजी व श्रेष्ठ कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांच्यातील शाब्दिक चकमकीचीदेखील या बोलण्याला पार्श्वभूमी होती.

**वासंती फडके,** मुंबई

## डॉ. रखमाबाई यांच्यावरील अन्यायाचे परिमार्जन व्हायला हवे!

संदेश प्रभुदेसाय या शोधपत्रकाराच्या (१९ डिसें.२० च्या अंकात) 'आनंदीबाई ...ते कमला हॅरिस' या लेखात डॉ. रखमाबाई राऊत यांचा यथोचित केलेला सन्मान्य समावेश न्याय्यच, प्रथमच असे घडलेले पाहण्यात आले. हा शोधपत्रकारितेचा सन्मान म्हणायचा का?

१) डॉ. रखमाबाई राऊत यांचे वैशिष्ट्य असे की, संपूर्ण वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी तहहयात प्रॅक्टीस केली. अग्रणी स्त्री प्रॅक्टिसिंग डॉक्टर!!

२) स्वत:चा झालेला बालविवाह नाकारून प्रसंगी त्यासाठी कोर्टात लढत देऊन त्या यशस्वीही झाल्या. कर्मठ समाजाचा व नेत्यांचाही जाहीर विरोध असतानाही... बालविवाहाची क्रूर (आठ-दहा वर्षांची मुलगी नि ७० वर्षीय पुरुष) प्रथा कायदेशीररीत्या बंद करण्याचा मार्ग सुकर... हे मोठे योगदान मान्य करावेच लागते. डॉ. रखमाबाईंचे वडील मुंबईचे प्रसिद्ध डॉ. राऊत यांचा भक्कम पाठिंबा हेही त्यांचे मोठे बळ होते.

३) इतके असूनही डॉ.रखमाबाई इतक्या अनुल्लेखित उपेक्षित का राहिल्या? समाज राजकारणात, अभिजन-बहुजन या दरीतील ती एक स्ट्रॅटेजी म्हणून अशा या काळोखाच्या लेकी! गुगलने रखमाबाईंचे फोटो दिले आहेतच. 'टाइम्स आफ इंडिया'मध्ये अनेक स्त्री-प्रश्न व स्त्री-शिक्षणावर सातत्याने डॉ.रखमाबाई लेखन करीत हे लेखकाने मांडले आहेच.

परंतु आनंदीबाई केवळ एकट्याच नव्हत्या, त्यांच्याच वयाच्या रखमाबाईही.... अशी मार्मिक केलेली जोडणीतील

समर्पकता त्यांच्या लेखनशैलीत आहे.

याच अंकात 'गांधीजींचे गारुड' या सदरामध्ये 'प्रेमा काय देऊ तुला' हा सिद्धहस्त अधिकारी संजीवनी खेर यांचाही लक्षणीयच लेख. गांधीजींनी कार्यकर्त्यांची उद्दिष्टे कशी हवीत, हे परखडपणे सुस्पष्ट, प्रेरकतेने कसे मांडले हा मला यातील महत्त्वाचा भाग वाटतो. त्यानंतर प्रेमाताईंनी निरंतर सामाजिक कार्यात जीवन समर्पितच केले हे सर्वश्रुतच आहे. वैयक्तिक पातळीवर त्यांच्या सहवासात मी होतेच. पण पुढेही लग्नानंतर आम्हीही उभयतांनी त्यांच्या मायेतील मैत्र हसत-खेळत विनोदाने मुक्तपणे अनुभवले.

मला आता तर वाटते की, डॉ.रखमाबाईंवरील या प्रदीर्घ सामाजिक अन्यायाचे परिमार्जन व्हायला हवे. एखाद्या मोठ्या मेडिकल संस्थेस या सेवाव्रती डॉ.रखमाबाई राऊतयांचे नाव दिले जावे. डॉ.रखमाबाईंची लढाऊ व झंजार वृत्तीही विशेषत: मुलींना प्रोत्साहकच ठरावी.

**वृन्दाश्री दाभोलकर,** सातारा

## साधनाविषयी मित्रांना सांगताना अभिमान वाटतो...

साधनाच्या पहिल्या अंकापासून मी साधनाशी जोडलेला आहे. राष्ट्र सेवादलात एस.एम.अण्णा आणि प्रधानमास्तर यांच्या खूळ जवळ जाण्याचे भाग्य मला लाभले. मी कॉलेजात असताना संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू होता. एस.एम.अण्णांनी मला गुजराथी स्त्री-पुरुषांना बरोबर घेऊन मोर्चा काढून सत्याग्रह करण्यास सांगितले होते.

मी विवेकानंद शिक्षण संस्थेत आजन्म अध्यापन केले. त्या संस्थेच्या तीन महाविद्यालयांचा प्राचार्य होण्याचा योग माझ्या आयुष्यात आला. तळमावल्याच्या कॉलेजची सुरुवात करताना प्रधानमास्तर आणि माझे बंधुतुल्य ज्येष्ठ मित्र यदुनाथ थत्ते यांचे मला फार मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तळमावल्याच्या खडकाळ डोंगरावर आम्ही शेकडो झाडे लावली. हे सर्व 'तळमावल्याचे दिवस' या माझ्या पुस्तकात मी दिलेले आहे. मध्यंतरी 'अंतर्नाद' मासिकाने गेल्या २५ वर्षांतील सर्वोत्कृष्ट १० पुस्तकांत त्याचा समावेश केला होता.

हे सारे सांगण्याचे कारण वेगळे. त्यामुळे मी सेवानिवृत्त झाल्यावर प्रधानमास्तरांनी साधनाचे पुस्तक प्रकाशन मला बघायला सांगितले होते. काही काळ हा विभाग समर्थपणे कार्यरत ठेवल्यावर, तरुणांचा सहभाग हवा आणि साधनाचा संपादक आणि पुस्तक प्रकाशन विभाग एकाच तरुणाकडे हवा म्हणून मी प्रधानमास्तरांना सांगून नरेंद्रला तो विभाग कार्यरत ठेवण्यास सांगितले. पुढे नरेंद्रचा अचानक, अकल्पित, अवेळी झालेल्या मृत्यूनंतर साप्ताहिक व प्रकाशन यांचे काय होणार ही काळजी काही दिवस मनात होती. मात्र आपण ती जबाबदारी फार सहजपणे आणि उत्कृष्टपणे सांभाळली. आता तर साधनाने कात टाकली आहे असे वाटते. आपण एकापाठोपाठ सरस अंक काढत आहात. आपण साधनाला एक नवी उंची प्राप्त करून दिली आहे. 'लोकशाही समाजवाद' म्हणजे 'शंभर फुले फुलू देत' हा विचार राष्ट्र सेवादलात आमच्या मनावर वज्रलेप करण्यात आला होता. मला सध्याच्या अंकातील सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे आपण वेगळ्या विचारांना योग्य तेवढी जागा देता, त्यामुळे ते विचार अस्पृश्य न मानता समजावून घेऊन त्यांचा प्रतिवाद आपण करतो. त्यानंतर योग्य, संयमित शब्दांत त्यांचा प्रतिवाद करून आपली वैचारिक बैएक त्यांना समजावून देऊ शकतो. प्रभाकर देवधर यांच्या लेखावरची तीन पत्रे आणि विनय हर्डीकर यांना सडेतोड पण संयमी शब्दांत आमचे ज्येष्ठ नेते पन्नालाल सुराणा यांनी दिलेले उत्तर हे याचे वस्तुपाठ आहेत. लोकशाही समाजवाद हा झापडबंद प्रवास नाही. 'शंभर फुले फुलू दे' हे आज साधनाच्या व्यासपीठावर दिसतंय, याचा खूप आनंद होतो.

आणखी एक सांगावेसे वाटते. आणीबाणीत साधना सुरू होती, कोविड-१९ च्या टाळेबंदीतही आपण साधना सुरू ठेवलीत. त्यामुळे वयाची नव्वदी गाठण्यासाठीचा प्रवास सुरू असलेल्या माझ्यासारख्या अनेकांनी संगणक समजावून घेऊन अंक वाचायला सुरुवात केली. आम्ही संगणकसाक्षर झालो! आणि त्यानंतर आपण पुन्हा अंक छापून आमच्याकडे पाठवलेत. अर्थातच, अंक हातात घेऊन वाचण्याचा आनंद काही वेगळाच असतो. ज्या समर्थपणे या काळात आपण अंक काढलेत त्याचा खूप खूप आनंद झाला. साधना म्हणजे काय हे मित्रांना सांगताना अभिमानही वाटला. बालअंक, कुमारअंक, दिवाळी अंक एकाहून एक सरस. त्रिवेणी संगम. 'आंतरभारतीय' असे हे तीन अंक हिंदीत जावयास हवेतच.

**प्रा.पुरुषोत्तम शेठ,** सातारा

## महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) साहित्य व समाजकार्य पुरस्कार : २०२०

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) या संस्थेच्या वतीने मागील २६ वर्षांपासून साहित्य व समाजकार्य पुरस्कार दिले जातात. २०२० या वर्षाचे साहित्यातील पाच, समाज कार्यातील पाच आणि डॉ. नरेंद्र दाभोळकर स्मृतिपुरस्कार असे एकूण ११ पुरस्कार दिले जाणार आहेत.

### – साहित्य पुरस्कार –

**महेश एलकुंचवार** (नागपूर), यांना दिलीप वि. चित्रे स्मृति–साहित्य जीवनगौरव सन्मान.
**सुबोध जावडेकर** (मुंबई), यांना वाङ्मयप्रकार पुरस्कार–'विज्ञानकथा' या वाङ्मय प्रकारासाठी.
**किरण येले** (मुंबई), यांना 'तिसरा डुळा' या कथासंग्रहासाठी ललित ग्रंथ पुरस्कार.
**प्रदीप पुरंदरे** (पुणे), यांना 'पाण्याशप्पथ' या ग्रंथासाठी वैचारिक ग्रंथ पुरस्कार.
**श्याम पेठकर** (नागपूर), यांना 'तेरवं' नाटकासाठी रा. शं. दातार नाट्य पुरस्कार.

### – समाजकार्य पुरस्कार –

**गजानन खातू** (वाशी, नवी मुंबई) यांना समाजकार्य जीवनगौरव सन्मान.
**जतीन देसाई** (मुंबई), यांना विशेष कृतज्ञता पुरस्कार.
**के. वीरमणी** (चेन्नई, तमिळनाडू) यांना डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिपुरस्कार
**अरुणा सबाने** (नागपूर), यांना कार्यकर्ता (प्रबोधन) पुरस्कार
**सुधीर अनवले** (उदगीर), यांना कार्यकर्ता (संघर्ष) पुरस्कार
**चेतन साळवे** (धडगाव, नंदुरबार), यांना युवा कार्यकर्ता पुरस्कार

सध्याचा करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता या महाराष्ट्र फाउंडेशनचे अध्यक्ष राजीव भालेराव, या पुरस्कारांचे प्रवर्तक सुनील देशमुख यांच्यासह फाउंडेशनचे अमेरिकेतील सदस्य यांना भारतात येणे अवघड आहे. महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांची लोकप्रियता पाहता समारंभस्थळी होणारी गर्दी टाळणे हेही अशक्य आहे. त्यामुळे नाइलाजाने या वर्षीचा पुरस्कार प्रदान समारंभ रद्द करणे भाग पडत आहे. या ११ पुरस्कारांचे वितरण कसे करता येईल, तसेच पुरस्कार सन्मानित व्यक्तींची माहिती ऑनलाइन पद्धतीने आणि स्मरणिकेद्वारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत कशी पोहोचवता येईल, यावर संयोजन समिती विचार–विनिमय करीत आहे. यथावकाश त्याची घोषणा करण्यात येईल. महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांचे हे २७ वे वर्ष असून, आतापर्यंत ३३६ पुरस्कार दिले गेले आहेत. या वर्षीच्या पुरस्कारांचे संयोजन महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम), पुणे आणि साधना ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने केले जात आहे. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागत नाहीत. हे पुरस्कार निवडण्यासाठी भारतात व अमेरिकेत स्वतंत्र निवड समित्या असतात.

**महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका)**
द्वारा : **महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**, पुणे
४२, कुबेरा विहार, बी–१, गाडीतळ हडपसर, पुणे ४११०५२ / दूरध्वनी क्र. 91-20-26995625/33
E-mail : masum.puneindia@gmail.com


SkinSense
Skin & Laser Clinic
Using science to enhance youth and delay ageing.
Dr. Abhijit Desai
Cosmetic Dermatologist and Laser Specialist
Dr. Gauri Desai
MD, Laser Specialist
Skin Toning
Face Lift & Skin Tightening
Reduction of Snoring
Texturing
Permanent Hair Reduction
Pore Minimisation
Medical State of the Art
LASERS
Acne Scar Reduction
Spot Fat Reduction and Body Sculpting
Tattoo Removal
Vaginal Tightening
Pigmentation Treatment
Tel no.:
02224331099 / +919920977940
Address:
2nd floor, Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai – 400028
Email: dr.skinsense@gmail.com | Website: www.yourskinsense.com

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting :31-12-2020 / Date of Publication : 31-12-2020


# ३१ डिसेंबर रोजी प्रकाशित होत आहे




पाने १५२+१२ (रंगीत छायाचित्रे)
किंमत : २०० रुपये
सवलतीत १५० रुपये
(ट.ख. वेगळा)

२०२०या वर्षात साधना साप्ताहिकातून
प्रसिद्ध झालेल्या नवे ऋतुचक्र
या बारा भागांच्या लेखमालेचे पुस्तक

# ऋतु बरवा

## विश्वास वसेकर

आज कोणती तिथी आहे,
हे हजारातल्या नऊशे नव्याण्णव लोकांना
सांगता येणार नाही. इतकेच काय–
सध्या कोणता भारतीय महिना चालू आहे,
मार्गशीर्ष की पौष की माघ–
हेही पुष्कळांना माहीत नसते.
व्यवहारात आपण इंग्रजी महिने
स्वीकारले आहेत ना? झालं तर मग!
त्या–त्या (इंग्रजी) महिन्यात आपण
घराबाहेर पडलो की, अंगणापासून
परसापर्यंत आणि शेतापासून जंगलापर्यंत
वनश्रीसृष्टीत कोणते चेतोहारी बदल
पाहायला मिळतात याकडे
मला लक्ष वेधायचे आहे– बस्स.
त्यातही आकाशापेक्षा जमिनीकडे
माझे जास्त लक्ष आहे. जमिनीवर घडणारे
'सहा ऋतूंचे सहा सोहळे बघुनी भान हरावे'
एवढेच मला अभिप्रेत आहे.

संपर्क

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635
mediasadhana@gmail.com

also available at amazon.in

इ–बुक स्वरुपात किंडलवर उपलब्ध